

आदिकवी

श्री वाल्मिकी

विरचित

मूळ संस्कृत


# रामायण

४

मराठी श्लोक

श्री. श्याम

कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# -श्रीवाल्मिकी रामायण-

## खंड ४

## मूळ संस्कृत व मराठी श्लोकमय अनुवाद-श्री.श्याम कुलकर्णी

# -श्रीवाल्मिकी रामायण – खंड ४

## मराठी समश्लोकी अनुवाद : श्री. श्याम कुलकर्णी

पत्ता : द्वाराश्री. जयवंत कुलकर्णी, ''गन्धार'' फ़्लॅटक्र. ५/४
आयडियल कॉलनी, कोथरूड पुणे४११०२९
संपर्क – व्हॉट्सऍपक्र. ९७६५४५६५८१
Email : sgk६६४२@gmail. com

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act १९५७ provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

प्रकाशक: : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १८ फेब्रुवारी २०२३ (महाशिवरात्री)

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# श्री श्याम कुलकर्णी (काव्यानुवादक)



यंत्र अभियांत्रिकी मास्टर्स पदवी M. E. १९७५ अभियांत्रिकी महाविद्यालयातून प्राध्यापक म्हणून निवृत्त. लेखनाची लहानपणापासून आवड. किर्लोस्कर, मनोहर, वसंत, प्रपंच, लोकसत्ता अशा अनेक नियतकालिकांमधून स्फुटलेखन प्रकाशित

# प्रास्ताविक

ग्रन्थ पूर्ण होण्यापूर्वीच प्रस्तावना लिहिणे हा मर्यादातिभङ्ग आहे आणि 24,000 श्लोकांच्या "वाल्मीकीय रामायण" या ग्रन्थातील 350-400 श्लोकांचे रूपान्तरण हे तर मूळ ग्रन्थाचा साठावा भाग पूर्ण करण्यासारखे आहे. त्यामुळे हे दोन शब्द केवळ ईसाहित्य चे श्री. सुनिळ सामन्त यांचे ऋण मान्य करण्यासाठी लिहीत आहे. केवळ त्यांच्या आग्रहामुळेच मी हे मोठे काम अंगावर घेतले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

या ग्रन्थास डॉ. रविन थत्ते यांच्यासारख्या महान व्यक्तीचा आशीर्वाद लाभणे हे माझे महद्भाग्य!

हे काम माझ्या हातून पूर्ण होण्याचे भाग्य मला लाभो येवढीच ईश्वरचरणी प्रार्थना !

श्याम कुलकर्णी



Dr. Ravin Thatte

श्याम कुलकर्णी ह्यांची आणि माझी ओळख खरे तर माझ्या व्यवसायामुळे (प्लास्टिक सर्जन \ सुघटन शल्य) झाली होती ह्याची त्यांनी मला हल्लीच ह्या त्यांच्या प्रकल्पाबद्दल चर्चा करतांना करून दिली . पुढे मी ज्ञानेश्वरीवर लिहिण्यास सुरुवात केल्या नंतर देखील आमची भेट झाली होती हे मात्र आठवते. हा रामायणावरचा त्यांचा प्रयत्न \प्रकल्प बघून आणि वाचून मी थक्क झालो आहे . केवढे प्रचंड काम आहे हे! ह्या पूर्वी त्यांनी भगवत गीतेवर, रामरक्षेवर आणि मेघदूतावर अशीच समश्लोकी लिहिण्याची कामगिरी केली आहे हे कळल्यावर तर मी अवाक झालो . असला माणूस माझ्या परिचयाचा

आहे हे कळून धन्य वाटले. त्यांनी हे सगळे काम "मी स्वानंदासाठी करत आहे" असे लिहिले आहे . सगळ्या मोठ्या कृती ह्या स्वानंदातूनच निर्माण होतात हे फार जुने सत्य इथे परत उजळले आहे. ही हल्लीची समश्लोकी , रामायणाची, आताच वाचली. ती फार छान उतरली आहे आणि वाचतांना खिळवून ठेवते. प्रकल्प अजून पूर्ण व्हायचा आहे तो नक्कीच पूर्ण होईल अशी खात्री आहे आणि त्यासाठी माझ्या सारख्या अनेकांच्या शुभेच्छा पोहोचवण्याचे काम मी आनंदाने करतो आहे.

Dr. रविन थत्ते

**(प्लॅस्टिक सर्जन व संस्कृत पंडित. अध्यात्मावर ११ पुस्तके प्रकाशित)**

# श्रीवाल्मिकी रामायण- १ वा २ (सर्ग १ ते ३७) वाचण्यासाठी खालील मुखपृष्ठांवर क्लिक करावे



# - अथ श्रीवाल्मिकी रामायण- ४

# बालकाण्ड सर्ग 38

तां कथां कौशिको रामे निवेद्य मधुराक्षराम् ।
पुनरेवापरं वाक्यं काकुत्स्थमिदमब्रवीत ॥1॥

कथा मधुर सांगून रामास विश्वामित्र ती ।
प्रसंग दुसरा ऐसा त्यानंतर त्यास सांगती ॥1॥

अयोध्याधिपतिर्वीर पूर्वमासीन्नराधिपः।
सगरो नाम धर्मात्मा प्रजाकामः स चाप्रजः॥2॥

# बालकाण्ड सर्ग 57

ततः संतप्तहृदयः स्मरन्निग्रहमात्मनः।
विनिःश्वस्य विनिःश्वस्य कृतवैरो महात्मना॥1॥
स दक्षिणां दिशं गत्वा महिष्या सह राघव ।
तताम परमं थोरं विश्वामित्रो महातपाः॥2॥

तदनन्तर श्रीरामा स्वपराजय स्मरूनिया।
संतप्त हृदये वैर वसिष्ठ महात्म्यासवे॥1॥

मनी ठेउनिया दीर्घ श्वास घेत पुन:पुन्हा ।
दक्षिणी सपत्नि जाऊन उग्र तप करीतसे ॥2॥

फलमूलाशनो दान्तश्चचार परमं तप:।
अथास्य जज्ञिरे पुत्रा: सत्यधर्मपरायणा:॥3॥
हविष्पदो मधुष्पदो दृढनेत्रो महारथ:।

भक्षूनिया फलमूल परम तप करीतसे ।
चार पुत्र तिथे त्याला होती धर्मपरायण ॥3॥
हविष्पन्द,मधुष्पन्द ,दृढनेत्र, महारथ ।

पूर्णे वर्षसहस्रे तु ब्रह्मा लोकपितामह:।।4।।
अब्रवीन्मधुरं वाक्यं विश्वामित्रं तपोधनम् ।
जिता राजर्षिलोकास्ते तपसा कुशिकात्मज।।5।।
अनेन तपसा त्वां हि राजर्षिरिति विद्महे।

सहस्र वर्षे होता पूर्ण ब्रह्मा पितामह;।।4।।
तपोधन विश्वामित्रा वाक्य मधुर बोलती ।
तपाने राजर्षिलोक जिंकसी कुशिकात्मजा ।।5।।
तपाने खरा राजर्षि ओळखला जाशील तू ।

एवमुक्त्वा महातेजा जगाम सह दैवतै:॥6॥
त्रिविष्टयं ब्रह्मलोकं लोकानां परमेश्वर:।

एवढे बोलुनि ब्रह्मा लोकांचे परमेश्वर ॥6॥
देवतांसह निघुनी ब्रह्मलोकी प्रवेशती ।

विश्वामित्रोऽपि तत्छ्रुत्वा हिया किंचिदवाङ्ग्मख: ॥7॥
दु:खेन महताविष्ट: समन्युरिदमब्रवीत ।
तपश्च सुमहं तप्तं राजर्षिरिति मा विदु:॥8॥
देवा: सर्षिगणा: सर्वे नास्ति मन्ये तप: फलम ।

ऐकुनिया विश्वामित्र लज्जेने पाहि खालती ॥7॥
करि विचार मनी तो दु:खाने म्हणु लागला ।
एवढे तप मी केले परी सम्पूर्ण देवता ॥8॥
मानती मज राजर्षी तपा फळ नसे मम ।

एवं निश्चित्य मनसा भूय एव महातपा:॥9॥
तपश्चचार धर्मात्मा काकुत्स्थ परमात्मवान् ।

विचार करुनी रामा शान्त करुनीया मना ॥9॥
महातपस्वी करू लागे पुन्हा तीव्र तपास तो ।

एतस्मिन्नेव काले तु सत्यवादी जितेन्द्रिय:॥10॥
त्रिशङ्करिति विख्यात इक्ष्वाकुकुलवर्धन:।

त्याच काळी करी राज्य सत्यवादी जितेन्द्रिय ॥10॥
त्रिशङ्कु नाम इक्ष्वाकु कुलाची कीर्ती वाढवी ।

तस्य बुद्धि: समुत्पन्न यजेयमिति राघव ॥11॥
गच्छेयं स्वशरीरेण देवतायां परां गतिम् ।

मनी त्याच्या असे येई करावा यज्ञ ज्यामुळे ॥11॥
सशरीर व्हावे शक्य जाण्या सुरलोकामधी ।

वसिष्ठं च समाहूय कथयामास चिन्तितम्॥12॥
अशक्यमिति चाप्युक्तो वसिष्ठेन महात्मना ।

आवाहुनि वसिष्ठांना सांगे विचार आपुला ॥12॥
त्यावरी हे नसे शक्य वसिष्ठ तया सांगती ।

प्रत्याख्यातो वसिष्ठेन स ययौ दक्षिणां दिशम् ॥13॥
ततस्तत्कर्मसिध्यर्थं पुत्रांस्तस्य गतो नृपः।

सांगता हे वसिष्ठांनी कर्मसिध्यर्थ जाइ तो ॥13॥
दक्षिण दिशेस जेथे तयाचे पुत्र जेथ ते ।

वासिष्ठा दीर्घतपसस्तपो यत्र हि तेपिरे॥14॥
त्रिशङ्कुस्तु महातेजा: शतं परमभास्वरम्।
वसिष्ठपुत्रान् ददृशे तप्यमानान6 मनस्विन: ॥15॥

करती वसिष्ठपुत्र दीर्घकाल जिथे तप ॥14॥
महातेजस्वि त्या स्थानी त्रिशङ्कू पाहि जाउनी ।
शत पुत्र वसिष्ठांचे मनस्वी मग्न तपामध्ये ॥15॥

सोऽभिगम्य महात्मान: सर्वानेव गुरो: सुतान्।
अभिवाद्यानुपूर्वेण ह्रिया किंचिदवाङ्मुख:॥16॥

अब्रवीत स महात्मान: सर्वानेव कृताञ्जलि:।

तयांप्रति जाऊनिया गुरूंच्या सर्वां सुतां ।
प्रणाम क्रमे करुनी सलज्ज मुख घेऊनी॥16॥
बोलती हात जोडुन महात्म्याना ते असे ।

शरणं व: प्रपन्नोऽहं शरण्यान् शरणं गत:॥17॥
प्रत्याख्यातो हि भद्रं वो वसिष्ठेन महात्मना।
यष्टकामो महायज्ञं तदनुज्ञातुमर्हथ ॥18॥

शरणागतवत्सल हे आलो शरण आपणा ॥17॥

अस्विकार वसिष्ठांनी यज्ञ करण्या ज्ञात हे।
चिंतिला यज्ञ जो मी करा आपण विनवितो ॥18॥

गुरुपुत्रान् सर्वान् नमस्कृत्य प्रसादये ।
शिरसा प्रणतो याचे ब्राह्मणांस्तपसि स्थितान् ॥19॥
ते मां भवन्त: सिध्य्यर्थं याजयन्तु समाहिता:।
सशरीरो यथाहं वै देवलोकमवाप्नुयाम् ॥20॥

आपणा गुरुपुत्रांस नमस्कार प्रसन्न व्हा ।
तपस्यामग्न आपणास सिरसाष्टांग वंदन ॥19॥

आपण सर्व एकाग्र अभीष्ट यज्ञा करूनिया ।
ज्यामुळे मज सशरीर जाणे देवलोकी जमे ॥20॥

प्रत्याख्यातो वसिष्ठेन गतिमन्यां तपोधना:।
गुरुपुत्रानृते सर्वान्‌ नाहं पश्यामि काञ्चन ॥21॥

नाकारिता वसिष्ठांनी गुरुपुत्राविना दुजी ।
मला न गति दिसते त्या शरण जाण्याविना ॥21॥

इक्ष्वाकूणां हि सर्वेषां पुरोधा: परमां गति:।
तस्मादननतरं सर्वे भवन्तो दैवतं मम ॥22॥

इक्ष्वाकूंसाठी सगळ्या वसिष्ठच महागति ।
त्यांच्यानन्तर मजला आपणचि परमदैवत ॥22॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे सप्तपञ्चाशः सर्गः ॥57॥**

# बालकाण्ड सर्ग 58

ततस्त्रिशङ्कोर्वचनं श्रुत्वा क्रोधसमन्वितम् ।
ऋषिपुत्रशतं राम राजनमिदमब्रवीत ॥1॥
प्रत्याख्यातोऽसि दुर्मेधो गुरुणा सत्यवादिना।
तं कथं समतिक्रम्य शाखान्तरमुपेयिवान् ॥2॥

बोल ऐकून त्रिशंकूचे वसिष्ठपुत्रां शत ।
क्रोध येउनि ते रामा राजाला बोलती असे ॥1॥

सत्यवादी गुरु जेव्हां सांगती तुज अशक्य हे ।
उल्लंघुनि तया कैसे येसि शाखेकडे परा ॥2॥

इक्ष्वाकूणां हि सर्वेषां पुरोधा: परमा गति:।
न चातिक्रमितुं शक्यं वचनं सत्यवादिन: ॥3॥

इक्ष्वाकुंच्या कुळा सर्व वसिष्ठचि पुरोहित ।
उल्लंघणे वचा त्यांच्या नसे शक्य कुणासही ॥3॥

अशक्यमिति सोवाच वसिष्ठो भगवानृषि: ।
तं वयं वै समाहर्तुं क्रतुं शक्ता: कथंचन ॥4॥

यज्ञकर्म वसिष्ठांनी सांगितले अशक्य जे ।
तेच करणे आम्हाला शक्य वाटे कसे तुला ॥4॥

बालिशस्त्वं नरश्रेष्ठ गम्यतां स्वपुरं पुनः।
याजने भगवान् शक्तस्त्रैलोक्यस्यापि पार्थिव ॥5॥
अवमानं कथं कर्तुं तस्य शक्ष्यामहे वयम् ।

अजाण तू नरश्रेष्ठा परत जा तू स्वगृही ।
समर्थ करण्या यज्ञ तिन्ही लोकी वसिष्ठ ते॥5॥
अपमान कसा त्यांचा करणे शक्य हो आम्हा ।

तेषां तद् वचनं श्रुत्वा क्रोधपर्याकुलाक्षरम् ॥6॥
स राजा पुनरेवैतानिदं वचनमब्रवीत ।
प्रत्याख्यातो भगवता गुरुपुत्रैस्तथैव हि ॥7॥
अन्यां गतिं गमिष्यामि स्वस्ति वोऽस्तु तपोधनाः।

त्यांचे वचन ऐकून क्रोधे उच्चारले असे ॥6॥
राजा पुन्हा तयां बोले होवो कल्याण आपुले ।
प्रार्थना वसिष्ठांनी त्यांच्या पुत्रानीही मम ॥7॥
अव्हेरली तरी अन्या जातो शरण मी आता ।

ऋषिपुत्रास्तु तच्छ्रुत्वा वाक्यं घोराभिसंहितम् ॥8॥
शेपु: परमसंक्रुद्धाश्चंडालत्वं गमिष्यसि ।
इत्युक्त्वा ते महात्मानो विविशु: स्वं स्वमाश्रमम् ॥9॥

अपमानजनक ते त्रिशंकूचे बोल ऐकुनी ॥८॥
संतापून ऋषीपुत्र शाप चान्डाळ होशिल
असा देउनिया जाती आपल्या आश्रमी पुन्हा ॥9॥

अथ रात्र्यां व्यतीतायां राजा चन्डालतां गत:।
नीलवस्त्रधरो नील: पुरुषो ध्वस्तमूर्धज ॥10॥

चित्यमाल्यांगरागश्च आयसाभरणोऽभवत ।

जाता रात्र बने राजा चांडाळ नीलांबरधर ।
नीलवर्ण बने त्याचा त्वचा रुक्ष शिर मुंडित ॥10॥
शरीरास चिताभस्म वरी लोह आभूषणे ।

तं दृष्ट्वा मंत्रिण: सर्वे त्यज्य चण्डालरूपिणम् ॥11॥
प्राद्रवन् सहिता राम पौरा येऽस्यानुगामिन:।
एको हि राजा काकुत्स्थ जगाम परमात्मवान् ॥12॥
दह्यमानो दिवारानं विश्वामित्रं तपोधनम् ।

चण्डालरूपि राजाला मन्त्रीजन प्रजाजन ॥११॥
तयासंगे असती जे पाहुनी जाति सोडुनी ।
चिन्ताग्नीत जळे राजा चिन्ताक्रान्त असे सदा॥१२॥
तपोधन विश्वामित्रा जाई शरण एकटा ।

विश्वामित्रस्तु तं दृष्ट्वा राजानं विफलीकृतम् ॥13॥
चण्डालरूपिणं राम मुनि: कारुण्यमागत:।
कारुण्यात स महातेजा वाक्यं परमधार्मिक:॥14॥
इदं जगाद भद्रं ते राजानं घोरदर्शनम् ।

किमागमनकार्यं ते राजपुत्र महाबल ॥15॥
अयोध्याधिपते वीर शापाच्चाण्डालतां गतः ।

वैफल्यग्रस्त राजास पाहुनी विश्वामित्र ते॥13॥
चंडालरूप पाहूनी कारुण्ये मुनि दुःखित ।
करुणेने महातेज बोलती परमधार्मिक ॥14॥
भयंकर दिसणाऱ्या नृपा कल्याण चिन्तुनी ।
बोलती राजपुत्रा हे येतसी तू कश्यास्तव ॥15॥
चान्डालस्वरूपा प्राप्त शापाने दिसते असे ।

अथ तद्वाक्यमाकर्ण्य राजा चण्डालतां गत: ॥16॥
अब्रवीत प्राञ्जलिर्वाक्यं वाक्यज्ञो वाक्यकोविदम् ।
प्रत्याख्यातोऽस्मि गुरुणा गुरुपुत्रैस्तथैव च ॥17॥
अनवाप्यैव तं कामं मया प्राप्तो विपर्यय:।

वाक्य ऐकुनिया त्यांचे नृप चांडाळरूपि तो ॥१६।
हात जोडुनि वाक्यार्थ कोविद मुनिंना म्हणे
गुरु नि गुरुपुत्रांनी अव्हेर करुनी मला ॥17॥
अभीष्टा ऐवजी मजला विपरीत स्थिति येत ही ।

सशरीरो दिवं यायामिति मे सौम्यदर्शन ॥18॥
मया चेष्टं क्रतुशतं तच्च नावाप्यते फलम् ।

स्वर्गी सशरीरे जावे इच्छा मम सौम्यदर्शन ॥18॥
पूर्ण ना होतसे केले जरी यज्ञ शतावधी ।

अनृतं नोक्तपूर्वं मे न च यक्ष्ये कदाचन ॥19॥
कृच्छ्रेष्वपि गत: सौम्य क्षत्रधर्मेण ते शपे ।

शपथ क्षात्रधर्माची घेउनी सांगतो असे ॥19॥
असत्य वदलो नाही बोलणारहि नाहि मी।

यज्ञैर्बहुविधैरिष्ट प्रजां धर्मेण पालिता: ॥20॥
गुरवश्च महात्मान: शीलवृत्तेन तोषिता:।
धर्मे प्रयतमानस्य यज्ञं चाहर्तुमिच्छत: ॥21॥
परितोषं न गच्छन्ति गुरवो मुनिपुङ्गव ।
दैवमेव परं मन्ये पौरुषं तु निरर्थकम् ॥22॥

विविध यज्ञ केले मी प्रजेस धर्मे पाळिले ॥20॥
गुरुजन महात्म्यांना तोषविले सद्वर्तने ।
धर्म म्हणुनीच यज्ञ यावेळीहि करु इच्छितो ॥21॥

गुरुजन परि न संतुष्ट मजवरी मुनिपुङ्गव ।
दैव श्रेष्ठ असे वाटे पुरुषार्थ तो निष्फळ ॥22॥

दैवेनाक्रम्यते सर्व दैवं हि परमा गतिः।
तस्य मे परमार्तस्य प्रसादमभिकांक्षितः ।
कर्तुमर्हसि भद्रं ते दैवोपहतकर्मणः॥23॥

सर्वत्र आक्रमे दैव दैवची परमागति ।
त्यामुळे मी परमार्त दैवे पुरुषार्थ झाकिला ।
कल्याण असो आपुले कृपा करावी आपली ॥23॥

नान्यां गतिं गमिष्यामि नान्यच्छरणमस्ति मे ।
दैवं पुरुषकारेण निवर्तयितुमर्हसि ॥24॥

आपल्याविण ना कोणा आता शरण जाइन ।
पुरुषार्थे आपणची दैवा मम पालटू शका ॥24॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डेऽष्टपञ्चाशः सर्गः ॥58॥**

# बालकाण्ड सर्ग 59

उक्तवाक्यं तु राजानं कृपया कुशिकात्मजा ।
अब्रवीन्मधुरं वाक्यं साक्षाच्चण्डालतां गतम् ॥1॥

साक्षात चांडालरूप राजाचे पूर्वोक्त वच ऐकता ।
कुशिकात्मज दयार्द्र स्वरे मधुर बोलती ॥1॥

इक्ष्वाको स्वागतं वत्स जानामि त्वां सुधार्मिकं।
शरणं ते प्रदास्यामि मा भैषीनूपपुङ्गव ॥2॥

असो स्वागत इक्ष्वाको धार्मिक तुज जाणतो ।
आश्रय मी तुजला देतो नृपश्रेष्ठा भिऊ नको ॥2॥

अहमामन्त्रये सर्वान् महर्षीन् पुण्यकर्मण: ।
यज्ञसाह्यकरान् राजांस्ततो यक्ष्यसि निर्वृत: ॥3॥

पुण्यकर्म ऋषींना मी आमन्त्रित करीतसे ।
यज्ञी साह्य करायाला करी यज्ञ सुखे नृप ॥3॥

गुरूशापकृतं रूपं यदिदं त्वयि वर्तते।
अनेन सह रूपेण सशरीरो गमिष्यसि ॥4॥

हस्तप्राप्तमहं मन्ये स्वर्गं तव नराधिप।
यस्त्वं कौशिकमागम्य शरण्यं शरणागत: ॥5॥

लाभले गुरुशापाने रूपाने त्याच जाशिल ।
सशरीरी स्वर्गलोकी तू जो शरण कौशिका ॥4॥
हाती स्वर्ग तुझ्या आला ऐसे समजून चाल तू ।
जो तू शरण आलास कौशिका शरणवत्सला॥5॥

एवमुक्त्वा महातेजा: पुत्रान् परमधार्मिकान् ।
व्यादिदेश महाप्राज्ञान् यज्ञसम्भारकारणात ॥6॥

असे बोलुनि पुत्रांना ज्ञानी जे परमधार्मिक ।
यज्ञसामग्री जुळणी करण्याची आज्ञा करी ॥6॥

सर्वान् शिष्यान् समाहूय वाक्यमेतदुवाच ह ।
सर्वानृषीन् सवासिष्ठानानयध्वं ममाज्ञया॥7॥
ससिष्यान् सुहृदश्चैव सर्विज: सुबहुश्रुतान् ।

आपल्या सर्व शिष्यांना बोलावून ते सांगती ।
ऋषि जाणकार यज्ञाचे वसिष्ठ पुत्रांसह ॥7॥
ऋत्विजां ,शिष्या,सुहृदां आज्ञेने मम बोलवा ।

यदन्यो वचनं ब्रूयान्मवाक्यबलचोदित: ॥8॥
तत सर्वमखिलेनोक्तं ममाख्येयमनादृतम् ।

मम संदेश घेणारा किंवा दुसरा कोणिही ॥8॥
अवहेलित यज्ञास सांगणे मजला तसे ।

तस्य तद्वचनं श्रुत्वा दिशो जग्मुस्तदाज्ञया ॥९॥
आजग्मुरथ देशेभ्य: सर्वेभ्यो ब्रह्मवादिन: ।
ते च शिष्या: समागम्य मुनिं ज्वलिततेजसम् ॥10॥
ऊचुश्च वचनं सर्वं सर्वेषां ब्रह्मवादिनाम् ।

त्यांचे वचन ऐकून शिष्य जाती दिशांतरी।९॥
देशातुनि येण्या सर्व ब्रह्मवादीहि लागती
तेजस्वी मुनींना शिष्य भेटलेले येत जे ॥10॥
सर्व जे बोलले ते ते विश्वामित्रांस सांगती ।

श्रुत्वा ते वचनं सर्वे समायान्ति द्विजातय:॥11॥
सर्वदेशेषु चागच्छन् वर्जयित्वा महोदयम् ।

आदेशे आपुल्या येती सर्वदेशीय ब्राह्मण ॥११॥
महोदय नाम फक्त येत ना सांगती असे ।

वासिष्ठं यच्छतं सर्वं क्रोधपर्याकुलाक्षरम्॥१२॥
यथाह वचनं सर्वं श्रुणु त्वं मुनिपुङ्गव।

मुनिश्रेष्ठ वसिष्ठाचे पुत्र होउनि कोपित ॥12॥
बोलले काय हे ऐका सर्व ते मुनिपुङ्गव।

क्षत्रियो याजको यस्य चण्डालस्य विशेषत: ॥13॥
कथं सदसि भोक्तारो हविस्तस्य सुरर्षय:।
ब्राह्मणा वा महात्मानो भुक्त्वा चाण्डालभोजनम्॥14॥
कथं स्वर्गं गमिष्यन्ति विश्वामित्रेण पालिता:।

करी क्षत्रिय आचार्य यज्ञ चण्डाल याजक ॥13॥
हविष्यभोजन कैसे घेति देवर्षि ब्राह्मण ।
चण्डाल अन्न खाऊनी कसे स्वर्गात जातिल ॥14॥
ब्राह्मण वा जे महात्मे विश्वामित्रांचे आश्रित ।

एतद् वचननैष्ठर्यभूचु: संरक्तलोचना:॥15॥
वासिष्ठा मुनिशार्दूल सर्वे सहमहोदया:।

वसिष्ठपुत्र ते सर्व आरक्तलोचन होउनी॥1५॥
वचने निष्ठुर ऐसे बोलले मुनिशार्दुला ।

तेषां तद् वचनं श्रुत्वा सर्वेषां मुनिपुङ्गव:॥16॥
क्रोधसंरक्तनयन: सरोषमिदमब्रवीत ।

सर्वांचे ऐकुनी बोल विश्वामित्र मुनीवर ॥16॥
होउनी लाल रागाने रोषपूर्वक बोलले ।

यद् दूषयन्त्यदुष्टं मां तप उग्रं समास्थितम्॥17॥
भस्मीभूता दुरात्मानो भविष्यन्ति न संशय:।

तपस्या उग्र करणाऱ्या निर्दोष मज दूषणे ॥1७॥
दुरात्मे देति होतील भस्मीभूतच निश्चित ।

अथ ते कालपाशेन नीता वैवस्वतक्षयम॥18॥
सप्तजातिशतान्येव मृतपा: सम्भवन्तु ते ।
श्वमांसनियताहारा मुष्टिका नाम निर्घृणा:॥19॥

होत कालपाशी बद्ध पोचती यमलोकि ते ॥18॥
सातशे जन्मासाठी होतील ते मृतरक्षक ।
श्वान मांस भक्षक ते चण्डाल नाम मुष्टिका॥19॥

विकृताश्च विरूपाश्च लोकाननुचर्न्तिवमान।
महोदयश्च दुर्बुद्धिर्मामदूष्यं ह्यदूषयत ॥20॥

दूषित: सर्वलोकेषु निषादत्वं गमिष्यति।
प्राणातिपातनिरतो निरनुक्रोशतां गत:॥21॥
दीर्घकालं मम क्रोधाद् दुर्गतिं वर्तयिष्यति ।

विकृत विरूप होत लोकांत फिरतील ते ।
दूषिती मज निर्दोषा दुर्बुद्धि होति महोदय ॥20॥
दीर्घकाल मम क्रोधे लोके निन्दित होतिल ।
करुनि अन्य प्राण्यांची हिंसा निर्घ्रुणतेसह ॥21॥
अश्या निषादयोनीत दुर्गती भोगतील ते

एतावदुक्त्वा वचनं विश्वामित्रो महातपाः।
विरराम महातेजा ऋषिमध्ये महामुनिः॥22॥

बोलुनी वचना ऐशा ऋषींमध्ये महातप ।
विश्वामित्र मुनिश्रेष्ठ बसती स्तब्ध नंतर ॥2२॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे एकोनषष्टितमः सर्गः॥59॥**

# बालकाण्ड सर्ग 60

तपोबलहतान् ज्ञात्वा वासिष्ठान् समहोदयान् ।
ऋषिमध्ये महातेजा विश्वामित्रोऽभ्यभाषत ॥1॥

शतानन्द म्हणतात,हे श्रीरामा,
होती तपोबले नष्ट वसिष्ठपुत्र जाणुनी ।
ऋषींमध्ये विश्वामित्र तेजस्वी म्हणती असे ॥1॥

अयमिक्ष्वाकुदायादस्त्रिशङ्‌करिति विश्रुत:।
धर्मिष्ठश्च वदान्यश्च मां चैव शरणं मम ॥2॥

इक्ष्वाकुकुल उत्पन्न त्रिशंकू नृप धार्मिक ।
तैसा दानी असे आज शरणागत तो मज ॥2॥

स्वेनानेन शरीरेण देवलोकजिगीषिया ।
यथायं स्वशरीरेण देवलोकं गमिष्यति ॥3॥
तथा प्रवर्त्यतां यज्ञो भवद्भिश्च मया सह ।

सशरीर देवलोकी जावे इच्छा असे तया ।

म्हणून आपण यज्ञ मजसंगे असा करा ॥3॥
ज्यामुळे तो देवलोकी शरीरासह जाइल ।

विश्वामित्रवच: श्रुत्वा सर्व एव महर्षय:॥4॥
ऊचु: समेता: सहसा धर्मज्ञा धर्मसंहितम् ।
अयं कुशिकदायादो मुनि: परमकोपन:॥5॥
यदाहं वचनं सम्यगेतत कार्यं न संशय:।

विश्वामित्राच्या ऐकुनी वचना सर्व महर्षि ते ॥4॥
एकत्र येउनी चर्चा करूनी धर्मयुक्त ते ।

म्हणती हे विश्वामित्र अतिकोपिष्ट मुनीवर ॥5॥
सांगतील तसे करणे योग्य यात न संशय ।

अग्निकल्पो हि भगवान् शापं दास्यति रोषत: ॥6॥
तस्मात प्रवर्त्यतां यज्ञ: सशरीरो यथा दिवि ।
गच्छेदिक्ष्वाकुदायादो विश्वामित्रस्य तेजसा ॥7॥

अग्नीसम तेजस्वी ते रागाने शाप देतिल ।
म्हणून करणे यज्ञ ज्यामुळे शरिरासह ।
इक्ष्वाकुवंशज तेजे विश्वामित्राच्या जाइल ॥7॥

ततः प्रवर्त्यतां यज्ञः सर्वे समधितिष्ठत ।
एवमुक्त्वा महर्षयः संजह्वस्ताः क्रियास्तदा ॥8॥

म्हणुनी यज्ञ आरंभ करणे निश्चय होउनी ।
आपल्याआपल्या कार्या मुनी ते सर्व लागती ॥8॥

याजकश्च महातेजा विश्वामित्रोऽ भवत क्रतौ।
ऋत्विजाश्चानुपूर्वेण मन्त्रवन्मन्त्रकोविदाः ॥9॥
चक्रुः सर्वाणि कर्माणि यथाकल्पं यथाविधि ।

होती अध्वर्यु यज्ञाचे विश्वामित्र महातपी ।

क्रमश: ऋत्विज होती मन्त्रवेत्ते ब्राह्मण ॥9॥
यथाविधी यथाकल्प कार्य संपन्न होतसे ।

ततः कालेन महता विश्वामित्रो महातपा:॥10॥
चकारावाहनं तत्र भागार्थं सर्वदेवता:।
नाभ्यागमंस्तदा तत्र भागार्थ सर्वदेवता: ॥11॥

मन्त्रपाठ पूर्ण होता विश्वामित्र महातप ॥10॥
आवाहति देवां सर्व भागार्थ आपआपल्या ।
परंतु कोणि न येती समयी भागार्थ देवता ॥11॥

ततः कोपसमाविष्टो विश्वामित्रो महामुनिः।
स्रुवमुद्यम्य सक्रोधस्त्रिदशङ्कमिदमब्रवीत ॥12॥

त्यामुळे क्रोधित होत विश्वामित्र महामुनी।
स्रुवा उचलुनी कोपे वदती त्रिशन्कूस ते ॥13॥
स्रुवा म्हणजे अग्नीत तूप टाकण्याची लाकडी पळी

पश्य मे तपसो वीर्यं स्वार्जितस्य नरेश्वर।
एष त्वां स्वशरीरेण नयामि स्वर्गमोजसा ॥13॥

पहा सामर्थ्य तू माझ्या तपाचे जे मिळे मला ।
पोचवेन तुला स्वर्गी सशरीर जया बळे ॥13॥

दुष्प्रापं स्वशरीरेण स्वर्गं गच्छ नरेश्वर ।
स्वार्जित किंचिदप्यस्ति मया हि तपस: फलम् ॥14॥
राजंस्त्वं तेजसा तस्य सशरीरो दिवं व्रज ।

सशरीर स्वर्गी जाशी दुष्प्राप्य जे नरेश्वर ।
तपाने जर मी काही केलेले अर्जित फल ॥14॥
सशरीर प्रभावे त्या स्वर्गलोकात जाशिल ।

उक्तवाक्ये मुनौ तस्मिन् सशरीरो नरेश्वर:॥15॥
दिवं जगाम काकुत्स्थ मुनीनां पश्यतां तदा ।

मुनींनी वदता वाक्य त्रिशंकू शरीरासह ॥15॥
जातसे स्वर्गलोकात मुनीजन पाहती तदा ।

स्वर्गलोकं गतं दृष्ट्वा त्रिशंकं पाकशासन:॥16॥
सह सर्वै: सुरगणैरिदं वचनमब्रवीत ॥

स्वर्गलोकी त्रिशंकूस पाहुनी पाकशासन ॥16॥
इंद्र देवांसवे सर्व यापरी वदला तया ॥

त्रिशङ्को गच्छ भूयस्त्वं नासि स्वर्गकृतालय:॥17॥
गुरुशापहतो मूढ पत भूमिमवाक्शिरा:।

त्रिशङ्कू मूर्ख जा मागे स्वर्गी स्थान नसे तुला ॥17॥
गुरुशापे नष्ट झालेला खाली पड अवनत मुखे ।

एवमुक्तो महेन्द्रेण त्रिशङ्करपतत पुन:॥18॥
विक्रोशमानस्त्राहीति विश्वामित्रं तपोधनम् ।

महेन्द्रे बोलता ऐसे विश्वामित्रा पुकारत ॥18॥
त्रिशंकु म्हणत त्राहि स्वर्गातूनि पडे पुन्हा ।

तच्छ्त्वा वचनं तस्य क्रोशमानस्य कौशिक:॥19॥
रोषमाहारयत तीव्र तिष्ठ तिष्ठति चाब्रवीत ।

ऐकुनि त्याचा आक्रोश कृद्ध होउनि कौशिक ॥19॥
थांब थांब म्हणे त्याला त्रिशंकु लटके मध्ये ।

ऋषिमध्ये स तेजस्वी प्रजापतिरिवापर: ॥20॥
सृजन् दक्षिणमारगस्थान् सप्तर्षीनपरान् पुन: ।
नक्षत्रवंशमपरमसृजत् क्रोधमूर्च्छित: ॥21॥

विश्वामित्र तेजस्वी जणु दुसरे प्रजापती ॥20॥
निर्मिती दक्षिण मार्गे अन्य सप्तर्षि सृष्टिस ।
तैसी नवीन नक्षत्रे क्रोधाने निर्मिती पुन्हा ॥21॥

दक्षिणां दिशमास्थाय ऋषिमध्ये महायशा:।
सृष्ट्वा नक्षत्रवंशं च क्रोधेन कलुषीकृत:॥22॥
अन्यमिद्रं करिष्यामि लोको वा स्यादनिन्द्रक:।
दैवतान्यपि स क्रोधात स्त्रष्टं समुपचक्रमे ॥23॥

दक्षिण दिशेस राहून ऋषींतील महायश ।
क्रोधे कलुषित झालेले नक्षत्रे नव निर्मिती ॥22॥
इन्द्रही दुसरा करु की इन्द्राविण सृष्टि ही मम ।
देवसृष्टिहि ते अन्य क्रोधाने निर्मु लागती ॥23॥

ततः परमसंभ्रान्ताः सर्षिसङ्गाः सुरासुराः।
विश्वामित्रं महात्मानमूचुः सानुनयं वचः ॥24॥

त्यामुळे होत भयभीत सुरासुर ऋषीगण ।
बोलती येउनि तेथे विश्वामित्रास आदरे ॥24॥

अयं राजा महाभाग गुरुशापपरिक्षतः।
सशरीरो दिवं यातुं नार्हत्येव तपोधन ॥25॥

हा राजा हे महाभाग चांडाळ गुरुशापे बने ।
सशरीर स्वर्गी जाण्या त्यामुळे पात्र तो नसे ॥25॥

तेषां तद् वचनं श्रुत्वा देवानां मुनिपुङ्गव: ।
अब्रवीत सुमहद् वाक्यं कौशिक: सर्वदेवता: ॥26॥

त्यां देवतांचे ऐकून वाक्य मुनिवर कौशिक।
त्यां सम्पूर्ण देवांना आपले वचन ऐकवी॥26॥

सशरीरं भद्रं वस्त्रिशङ्कोरस्य भूपते:।
आरोहणं प्रतिज्ञातं नानृतं कर्तुमुत्सहे ॥27॥

सशरीर त्रिशंकूला स्वर्गी पाठवण्याची मी।
प्रतिज्ञा असे केली असत्य ती न करू शके ॥27॥

स्वर्गोऽस्तु सशरीरस्य त्रिशङ्कोरस्य शाश्वत:।
नक्षत्राणि च सर्वाणि मामकानि ध्रुवाण्यथ ॥28॥
यावल्लोका धरिष्यन्ति तिष्ठन्त्वेतानि सरवश:।
यत्‌ कृतानि सुरा: सर्वे तदज्ञातुमर्हथ ॥29॥

स्वर्गसुख त्रिशंकास सदेह लाभो सदैव।
नक्षत्रे निर्मिली जी मी राहतील तशीच ती ॥28॥
अन्तापर्यंत पृथ्वीच्या सृष्टि मी निर्मिलेली जी।
तशी राहील देवांनो अनुज्ञा मज द्या तुम्ही ॥29॥

एवमुक्ता: सुरा: सर्वे प्रत्यूचुर्मुनिपुंगवम् ।
एवं भवतु भद्रंते तिष्ठन्त्वेतानि सर्वश:॥30॥
गगने तान्यनेकानि वैश्वानरपथाद् बहि:।
मक्षत्राणि मुनिश्रेष्ठ तेषु ज्योति:षु जाज्वलन् ॥31॥
अवाक्षिरास्त्रिशङ्कुश्च तिष्ठत्वमरसंनिभ: ।
अनुयास्यन्ति चैतानि ज्योतींषि नृपसत्तमम् ॥32॥
कृतार्थ कीर्तिमन्तं च स्वर्गलोकगतं यथा ।

ऐसे म्हणता त्यांनी प्रत्युत्तर देती देव ते।

कल्याण असो तुमचे असे सर्वच राहील ॥30॥
नक्षत्रे तुम्ही केलेली वैश्वानर पथांतरी ।
प्रकाशित होतील त्यात एक त्रिशन्कुही ॥31॥
अधोशिर प्रकाशेल देवतासमान स्थित ।
अनुसरतील नक्षत्रे नृपश्रेष्ठा कृतार्थ जो ॥32॥
स्वर्गीय पुरुष म्हणुनी मान्यताप्राप्त त्या ।

विश्वामित्रस्तु धर्मात्मा सर्वदेवैरभिष्टत:॥33॥
ऋषिमध्ये महातेजा बाढमित्येव देवता ।

ऋषिमध्ये महातेज विश्वामित्र प्रशंसित ॥33॥
देवता करिती त्याचा स्वीकार करती मुनी ।

ततो देवा महात्मानो ऋषयश्च तपोधना:।
जग्मुर्यथागतं यज्ञस्यान्ते नरोत्तम ॥34॥

त्यानन्तर यज्ञान्ती देवता आणि तपोधन ।
आले तसे गेले स्वस्थानी आप आपल्या ॥34॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे षष्टितम: सर्ग: ॥60॥**

# बालकाण्ड सर्ग 61

विश्वामित्रो महातेजा: प्रस्थितान्‍ वीक्ष्य तानृषीन्‍ ।
अब्रवीन्नरशार्दूल सर्वास्तान्‍ वनवासिन: ॥1

यज्ञास्तव ऋषीं आले जाताना पाहुनी तयां ।
विश्वामित्र महातेज म्हणे हे नरशार्दुला ॥1॥

महाविघ्न: प्रवृतोऽयं दक्षिणामास्थितो दिशम्‍ ।
दिशमन्यां प्रपत्स्यामस्तत्र तप्स्यामहे तप: ॥2॥

माझ्या तपी महाविघ्न येतसे दक्षिणेकडे ।
दिशेस अन्य जाऊनी तप तेथ करेन मी ॥2॥

पश्चिमायां विशालायां पुष्करेषु महात्मनः।
सुखं तपश्चरिष्यामः सुखं तद्धि तपोवनम् ॥3॥

ब्रह्माजींचे पश्चिमेस असती तीन पुष्कर ।
सुखद ते तपोवन सुखे तप तेथ मी करी ॥3॥

एवमुक्त्वा महातेजाः पुष्करेषु महामुनिः।
तप उग्रं दुराधर्षं तेपे मूलफलाशनः॥4॥

असे म्हणुनिया जाती पुष्करी ते महामुनी ।
आरंभति तपा उग्र फल मूलास भक्षुनी ॥4॥

एतस्मिन्नेव काले तु अयोध्याधिपतिर्महान् ।
अम्बरीष इति ख्यातो यष्टुं समुपचक्रमे ॥5॥

त्यावेळी याच समयास अयोध्यापति जो महान् ।
अम्बरीष नामे ख्यात यज्ञा उद्युक्त होतसे ॥5॥

तस्य वै यजमानस्य पशुमिन्द्रो जहार ह ।
प्रणष्टे तु पशौ विप्रो राजानमिदमब्रवीत ॥6॥

यज्ञपशूस तयांच्या इन्द्र चोरुनि नेतसे ।
त्यानंतर पुरोहीत म्हणे राजास यापरी ॥6॥

पशुरभ्याहृतो राजन् प्रणष्टस्तव दुर्नयात ।
अरक्षितारं राजानं जन्ति दोषा नरेश्वर ॥7॥

यज्ञपशु येथुनि जाई दुर्नीति तव कारण ।
रक्षण त्याचे ना होणे तुझ्या नाशास कारण ॥7॥

प्रायश्चित्तं महद्भ्येतन्नरं वा पुरुषर्षभ ।
आनयस्व पशुं शीघ्रं यावत कर्म प्रवर्तते ॥8॥

शोधुनी पशु वा त्याचा प्रतिनिधि दुसरा नर ।
मिळवुनी शीघ्र आण पाप प्रायश्चितास्तव ॥8॥

उपाध्यायवच: श्रुत्वा स राजा पुरुषर्षभ:।
अन्वियेष महाबुद्धि: यशं गोभि सहस्रश: ॥9॥

त्याचे वचन ऐकून सहस्र धेनू देउनी ।
मिळतो का तसा शोधी होण्या यज्ञबली नर ॥9॥

देशाञ्जनपदांस्तांस्तान् नगराणि वनानि च ।
आश्रमाणि च पुण्यानि मार्हमाणो महीपति: ॥10॥

स पुत्रसहितं तात सभार्यं रघुनन्दन ।
भृगतुंगे समासीममृचीकं संददर्श ह ॥11॥

विभिन्न देशी नगरे वनी आश्रमातही।
शोधताना अम्बरीष भृगतुङ्ग गिरीवरी ॥10॥
पोचता त्यास श्रीरामा तेथे बसलेला दिसे ।
ऋचीक मुनी सवे भार्या पुत्रांसह आपल्या ॥11॥

तमुवाच महातेजा: प्रणम्याभिप्रसाद्य च ।
महर्षि: तपसा दीप्तं राजर्षिरमितप्रभ: ॥12॥

अम्बरीष महातेज तपदीप्त मुनीवरां ।
प्रणाम करुनी त्याना प्रसन्न करुनी म्हणे ॥12॥

पृष्ट्वा सर्वत्र कुशलमृचीकं तमिदं वचः।
गवां शतसहस्रेण विक्रीणीषे सुतं यदि ॥13॥
पशोरर्थे महाभाग कृतकृत्योऽस्मि भार्गव ।

ऋचीकां कुशल पुसूनि पुढील वच बोलला ।
विकसी का एका पुत्रा शतसहस्र धेनूंस्तव ॥13॥
पशु होण्यास्तव यज्ञी कृतकृत्य होईन मी ।

सर्वे परिगता देशा यज्ञियं न लभे पशुम् ॥14॥
दातुमर्हसि मूल्येन सतमेकमितो मम ।

सर्व देशी फिरलो मी यज्ञीय पशु ना मिळे ॥14॥
मूल्य योग्य असे देत जर पुत्र मज देशिल ।

एवमुक्तो महातेजा ऋचीकस्त्वब्रवीत् वच:॥15॥
नाहं ज्येष्ठं नरश्रेष्ठ विक्रीणीयां कथंचन ।

ऐकुनी हे महातेज ऋचीक वच बोलले ॥15॥
ज्येष्ठास न मी देई नरश्रेष्ठा विकूनिया ।

ऋचीकस्य वचः श्रुत्वा तेषां माता महात्मनाम् ॥16॥
उवाच नरशार्दूलम्म्बरीषमिदं वचः।

वच ऐकुनि ऋचिकांचे पुत्रमाता महान त्या ॥16॥
अम्बरीषा नरशार्दूला असे वचन बोलली ।

अविक्रेयं सुतं ज्येष्ठं भगवानाह भार्गव ॥17॥
ममापि दयितं विद्धि कनिष्ठं शुनकं प्रभो ।
तस्मात कनीयसं पुत्रं न दास्ये तव पार्थिव ॥18॥

विकणे न ज्येष्ठ पुत्र म्हणती भगवान् भार्गव ॥17॥

मलाही शुनक कनिष्ठ असे तो बहुत प्रिय ।
म्हणूनी हे पृथ्वीनाथ तया न विकणे मला ॥18॥

प्रायेण हि नरश्रेष्ठ ज्येष्ठा: पितृषु वल्लभा:।
मातृणां च कनीयांसस्तस्माद् रक्ष्ये कनीयसम् ॥19॥

प्राय: ज्येष्ठ असे पुत्र नरश्रेष्ठ पित्या प्रिय ।
कनिष्ठ तसा मातेस म्हणुनी त्या न विकेन मी ॥19॥

उक्तवाक्ये मुनौ तस्मिन् मुनिपत्न्यां तथैव च ।
शुन:शेप: स्वयं राम मध्यमो वाक्यमब्रवीत ॥20॥

मुनींनी, मुनिपत्नीने आपले मत सांगता ।
शुन:शेप स्वत: रामा मधला जो ऐसे म्हणे ॥20॥

पिता ज्येष्ठमविक्रेयं माता चाह कनीयसम् ।
विक्रेयं मध्यमं मन्ये राजपुत्र नयस्व माम् ॥21॥

ज्येष्ठास पिता न विके तशी माता कनिष्ठासही ।
असे मध्यम विक्रीस राजपुत्रा मलाच ने ॥21॥

अथ राजा महाबाहो वाक्यान्ते ब्रह्मवादिन:।
हिरण्यस्य सुवर्णस्य कोटिभी रत्नराशिभि:॥22॥

गवां शतसहस्रेण शुन:शेपं नरेश्वर:।
गृहीत्वा परमप्रीतो जगाम रघुनन्दन ॥23॥

त्या ब्रह्मवादी पुत्राच्या वचने परमहर्षित ।
नृप महाबाहू कोटी सुवर्णमुद्रांसवे ॥22॥
रत्नांची रास तश्या गाई शतसहस्र देउनी ।
शुन:शेपास घेऊन हे रामा जातसे गृही ॥23॥

अम्बरीषस्तु राजर्षी रथमारोप्य सत्वर:।
शुन:शेपं महातेजा जगामाशु महायशा:॥24॥

अम्बरीश राजर्षि तो शुन:शेपा रथामध्ये ।
तत्काल घालुनी जाई त्वरेने तो महायश ॥24॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे एकषष्टितम: सर्ग:॥61॥**

# बालकाण्ड सर्ग 62

शुन:शेपं नरश्रेष्ठ गृहीत्वा तु महायशा:।
व्यश्रमत पुष्करे राजा मध्याह्ने रघुनन्दन ॥1॥

शतानन्द म्हणाले
नरश्रेष्ठ महाराजा शुन:शेपास घेउनी ।
पुष्कर तीर्थी येऊनी विश्राम करु लागले ॥1॥

तस्य विश्राममाणस्य शुन:शेपो महायशा:।
पुष्करं ज्येष्ठमागम्य विश्वामित्रं ददर्श ह ॥2॥
तप्यन्तमृषिभि: सार्धं मातुलं परमातुर:।
विषण्णवदनो दीनतृष्णया च श्रमेण च ॥3॥
पपाताङ्गे मुने राम वाक्यं चेदमुवाच ह।

विश्रान्ति ते घेताना शुन:शेप महायश ।
पुष्करी ज्येष्ठ येऊनी विश्वामित्रांस पाहुनी ॥2॥
ऋषींसह तपमग्न विश्वामित्रास मातुला ।

खिन्न मुद्रा दमलेला तहानेला श्रमामुळे ॥3॥
मुनीच्या पडुनी अंकी बोले ऐसा तयांस तो ।

न मेऽस्ति माता न पिता ज्ञातयो बान्धवा: कुत:॥4॥
ज्ञातुमर्हसि मां सौम्य धर्मेण मुनिपुङ्गव ।

माता न पिता मजला ज्ञातिबान्धव कोठुन ॥4॥
रक्षावे मजला सौम्य धर्माधारेच आपण ।

त्रात्वा त्वं हि नरश्रेष्ठ सर्वेषां त्वं हि भावन:॥5॥
राजा च कृतकार्य: स्यादहं दीर्घयुरव्यय:।

स्वर्गलोकमुपाश्नीयां तपस्तप्त्वा ह्यनुत्तमम् ॥6॥

रक्षक आपण सर्वा नरश्रेष्ठा सर्व जाणती ॥5॥
कृपेने आपल्या जावो राजाचे कार्य सिद्धिस ।
दीर्घायु मज लाभून स्वर्ग प्राप्त तपामुळे ॥6॥

स मे नाथो ह्यनाथस्य भव भव्येन चेतसा।
पितेव पुत्रं धर्मात्मंस्त्रातुमर्हसि किल्विषात ॥7॥

मज अनाथास नाथ उदार मन आपण ।
वाचवा संकटातून जसा पुत्रास या पिता ॥7॥

तस्य तद्वचनं श्रुत्वा विश्वामित्रो महातपा:।
सान्त्वयित्वा बहविधं पुत्रानिदमुवाच ह ॥8॥

ऐकुनी वचना त्याच्या विश्वामित्र महातप ।
सांत्वन करुनी त्याचे स्वपुत्रां बोलती असे ॥8॥

यत्कृते पितर: पुत्राञ्जनयन्ति शुभार्थिन:।
परलोकहितार्थाय तस्य कालोऽयमागत:॥9॥

परलोकहितास्तव ज्या पुत्रां जन्म दे पिता ।
शुभार्थि जो त्या पूर्तीचा येतसे काल आज तो ॥9॥

अयं मुनिसुतो बालो मत्त: शरणमिच्छति ।
अस्य जीवितमात्रेण प्रियं कुरुत पुत्रका:॥10॥

हा बालक मुनिपुत्र मजला शरण येतसे ।
आपल्या जीवनमात्रे कल्याण त्याचे करा ॥10॥

सर्वे सुकृतकर्माण: सर्वे धर्मपरायणा: ।
पशुभूता नरेंद्रस्य तृप्तिमग्ने: प्रयच्छत ॥11॥

धर्मपरायण पुण्यात्मे तुम्हीच बनुनी पशु ।
राजाच्या यज्ञि अग्नीची प्रदान तृप्ति करा ॥11॥

नाथवांश्च शुन:शेपो यज्ञश्चाविघ्नतो भवेत्।
देवतास्तर्पिताश्च स्युर्मम चापि कृतं वच: ॥12॥

ज्यामुळे हो शुन:शेप सनाथ यज्ञपूर्ति हो ।
देवता तृप्त तुम्हाद्वारे ममाज्ञा होत पालन ॥12॥

मुनेस्तद्वचनं श्रुत्वा मधुच्छन्दादय: सुता:।
साभिमानं नरश्रेष्ठ सलीलमिदमब्रुवन् ॥13॥

मुनींचे बोल ऐकोनी मधुच्छंदादि पुत्र ते।
उपहासे अभिमाने अश्या प्रकारे बोलती ॥13॥

कथमात्मसुतान्‌ हित्वा त्रायसेऽन्यसुतं विभो।
अकार्यमिव पश्याम: श्वमांसमिव भोजने ॥14॥

स्वपुत्रां त्यागुनी कैसे परक्या पुत्रास रक्षसी ।
अयोग्य ते जसे अग्राह्य मांस पडले भोजनी ॥14॥

तेषां तद्‌ वचनं श्रुत्वा पुत्राणां मुनिपुंगव:।
क्रोधसंरक्तनयनो व्याहर्तुमुपचक्रमे ॥15॥

पुत्रांचे वचन ऐकूनी रक्तलोचन होऊनी ।
मुनिपुंगव क्रोधाने ऐसे त्यां म्हणु लागले ॥15॥

नि:साध्वसमिदं प्रोक्तं धर्मादपि विगर्हितम् ।
अतिक्रम्य तु मद्वाक्यं दारुणं रोमहर्षिणम ॥16॥
श्वमांसभोजिन: सर्वे वासिष्ठा इव जातिषु ।
पूर्ण वर्षसहस्त्रं तु पृथिव्यामनुवत्स्यथ ॥17॥

बोलला निर्भये तुम्ही निंद्य जे धर्म सोडुन ।
उल्लंघून मम आज्ञा ते दारूण भयानक॥16॥
वसिष्ठांच्या पुत्रापरि जन्माल श्वमांसभक्षक ।
सहस्त्र वर्षे संपूर्ण रहाल तैसे धरेवरी ॥17॥

कृत्वा शापसमायुक्तान् पुत्रान् मुनिवरस्तदा ।
शुन:शेपमुवाचार्तं कृत्वा रक्षां निरामयाम् ॥18॥

पुत्रांना शाप देऊन शुन:शेपास आर्त त्या ।
निरामय रक्षुनि त्याला वदती त्यास पुढे असे ॥18॥

पवित्रपाशैराबद्धो रक्तमाल्यानुलेपन:।
वैष्णवं यूपमासाद्य वाग्भिरग्निमुदाहर ॥19॥
इमे च गाथे दे दिव्ये गायेथा मुनिपुत्रक ।
अम्बरीषस्य यज्ञेऽस्मिंस्तत: सिद्धिमवाप्स्यसि॥20॥

यज्ञात अम्बरीषाच्या पवित्र पाशे बान्धुनी ।
फुले लाल तसे लाल चन्दने अवलेपिता ॥19॥
यूपाप्रति विष्णूच्या जाउनी दिव्य गायने ।
स्तविता अग्निदेवास सिद्धि प्राप्त हो तुज ॥20॥

शुन:शेपे गृहीत्वा ते द्वे गाथे सुसमाहित:।
त्वरया राजसिंहं तमम्बरीषमुवाच ह ॥21॥

सुन:शेप करि गाथांचे ग्रहण एकाग्र होउनी ।
अम्बरीषाकडे जात त्वरेने बोलतो तया ॥21॥

राजसिंह महाबुद्धे शीघ्रं गच्छावहे वयम् ।
निवर्तयस्व राजेन्द्र दीक्षां च समुदाहर ॥22॥

हे बुद्धिमान राजसिंह त्वरेने जाउनी आम्ही ।
दीक्षा घेउनि यज्ञाची तुम्ही संपन्न त्या करा ॥22॥

तद् वाक्यमृषिपुत्रस्य श्रुत्वा हर्षसमन्वितः।
जगाम नृपतिः शीघ्रं यज्ञवाटमतन्द्रितः॥23॥

वाक्य ते ऋषिपुत्राचे ऐकुनी अत्यानन्दित ।
त्वरेने नृपती जाई यज्ञशाळेत स्फूर्तिने ॥23॥

सदस्यानुमते राजा पवित्रकृतलक्षणम् ।
पशुं रक्ताम्बरं कृत्वा यूपे तं समबन्धयत ॥24॥

सर्वानुमते पाशे पवित्र यूपास बांधती ।
शुन:शेपा आवृत्त रक्ताम्बरे करूनिया ॥24॥

स बद्धो वाग्भिरग्र्याभिरभितुष्टाय वै सुरौ ।
इन्द्रमिन्द्रानुजं चैव यथावन्मुनिपुत्रक: ॥25॥

बांधलेला मुनीपुत्र वाणीने उत्तम करी ।
स्तुति इन्द्र उपेन्द्रांची यथावत देवतांचि त्या ॥25॥

ततः प्रीतः सहस्राक्षो रहस्यस्तुतितोषितः।
दीर्घमायुस्तदा प्रादाच्छुनःशेपाय वासवः।।26।।

रहस्यमय स्तुतीने संतुष्ट सहस्राक्ष त्या ।
दीर्घायु हो आशीर्वाद शुनःशेपास देतसे ।।26।।

स च राजा नरश्रेष्ठ यज्ञस्य च समाप्तवान्।
फलं बहुगुणं राम सहस्राक्षप्रसादजम् ।।27।।

नरश्रेष्ठ श्रीरामा राजा यज्ञास संपवी ।
प्रसादे प्राप्त इंद्राच्या संपन्न उत्तम फल ।।27।।

विश्वामित्रोऽपि धर्मात्मा भूयस्तेपे महातपा:।
पुष्करेषु नरश्रेष्ठ दशवर्षशतानि च ॥28॥

विश्वामित्रहि धर्मात्मा पुष्कर तीर्थास जाउनी ।
करी तपा नरश्रेष्ठा सहस्र वर्षांस्तव ॥28॥

**इति श्रीरामायणे वाल्मिकीये आदिकाव्ये बालकाण्डे द्विषष्टितम: सर्ग: ॥62॥**

# बालकाण्ड सर्ग 63

पूर्णे वर्षसहस्रे तु व्रतस्नातं महामुनिम्।
अभ्यगच्छन् सुरा: सर्वे तप: फलचिकीर्षव:॥1॥

पूर्ण सहस्र वर्षान्ती करी स्नान महामुनी।
सर्व देव येती तया इष्ट फल विचारण्या ॥1॥

अब्रवीत सुमहातेजा ब्रह्मा सुरुचिरं वच:।
ऋषिस्त्वमसि भद्रं ते स्वार्जितै: कर्मभि: शुभै: ॥2॥

ब्रह्मा महातेजस्वी बोलती मधुर स्वरे ।
कल्याण हो तव होसी ऋषि शुभ कर्मे तव ॥2॥

तमेवमुक्त्वा देवेश स्त्रिदिवं पुनरभ्यगात ।
विश्वामित्रो महातेजा भूयस्तेपे महत तप: ॥3॥

ऐसे म्हणुनि देवेश स्वर्गा परतती पुन्हा ।
विश्वामित्र महातेज आरंभति पुन्हा तप ॥३॥

तत: कालेन महता मेनका परमाप्सरा ।
पुष्करेषु नरश्रेष्ठ स्नातुं समुपचक्रमे ॥४॥

नंतर बहु कालाने अतिसुन्दर मेनका ।
अप्सरा येइ स्नानास हे नरश्रेष्ठा पुष्करी ॥४॥

तां ददर्श महातेजा मेनकां कुशिकात्मजः।
रूपेणाप्रतिमां तत्र विद्युतं जलदे यथा ॥५॥

अप्रतिम रूपवती वीज मेघातुनि जशी ।
विश्वामित्र महातेज पाहती मेनकेस त्या ॥५॥

कन्दर्पदर्पवशगो मुनिस्तामिदमब्रवीत ।
अप्सरः स्वागतं तेऽस्तु वस चेह ममाश्रमे ॥6॥

पाहुनी तिज होऊनी कामातुर तिजला मुनी ।
तुझे स्वागत म्हणती रहा मम आश्रमात तू ॥6॥

अनुगृहीष्व भद्रं ते मदनेन विमोहितम् ।
इत्युक्ता सा वरारोहा तत्र वासमथाकरोत ॥7॥

कल्याण तव मी झालो कामातुर कृपा करी ।
वच ऐकुनिया त्यांचे मेनका तेथ राहिली ॥7॥

तपसो हि महाविघ्नो विश्वामित्रमुपागमत ।
तस्यां वसन्त्यां वर्षाणि पञ्च पङ्च च राघव ॥8॥

विश्वामित्रेण सौम्ये सुखेन व्यतिचक्रम:।

महाविघ्न तपामध्ये मुनींप्रत उपस्थित ।
मेनका आश्रमी राहे दश वर्षे तिच्यासवे ॥8॥
विश्वामित्र सुखे काल व्यतीत करति राघवा ।

अथ काले गते तस्मिन विश्वामित्रो महामुनि:॥9॥
सव्रीड इव संवृत्तश्चिन्ताशोकपरायण:।

लोटता इतका काळ विश्वामित्र महामुनी ॥९॥
लज्जित ते होऊनीया चिंता शोकात मग्नही ।

बुद्धिर्मुने: समुत्पन्ना सामर्षा रघुनन्दन ॥10॥
सर्वं सुराणाम्‌ कर्मैतत तपोऽहरणं महत ।

मुनींना सुचे रोषाने देवांचा कट हा असे ॥10॥
तपात मम आणाया विघ्न सर्व प्रयत्न हा ।

अहोरात्रापदेशेन गता: संवत्सरा दश ॥11॥
काममोहाभिभूतस्य विनोऽयं प्रत्युपस्थित:।

काममोहित दश वर्षे एका दिन रात्रीपरी ॥11॥
घालवी मी असे येई विघ्न माझ्या तपामध्ये ।

स निःश्वसन् मुनिवरः पश्चात्तापेन दुःखितः॥12॥

दीर्घ श्वास घेउनिया दुःखी पश्चात्तापे मुनी ॥12॥

भीतामप्सरसं दृष्ट्वा वेपन्ती प्राञ्जलिं स्थिताम्।
मेनकां मधुरैर्वाक्यैर्विसृज्य कुशिकात्मजः॥13॥
उत्तरं पर्वतं राम विश्वमित्रो जगाम ह।

मेनका भिउनी तेव्हां हात जोडुनि कांपत।
राहे उभी तिज देती निरोप मधुरस्वरे ॥13॥
निघोनिया स्वतां जाती पर्वती उत्तरेकडे॥

स कृत्वा नैष्ठिकी बुद्धिं जेतुकामो महायशा:॥14॥
कौशिकीतीरमासाद्य तपस्तेपे सुरासदम् ।

निश्चयात्मक बुद्धीने कामदेवास जिंकण्या ॥14॥
येउनी कौशिकी तीरी तप आरंभति दुर्धर ।

तस्य वर्षसहस्राणि घोरं तप उपासत:॥15॥
उत्तरे पर्वते राम देवतानामभूद् भयम् ।

उत्तरी पर्वती तेव्हां करती ते घोर तपा ॥15॥
लोटती सहस्र वर्षे देवांनाही वाटे भय ।

आमन्त्रयन समागम्य सर्वे सर्षिगणा: सुरा:॥16॥
महर्षिशब्दं लभतां साध्वयं कुशिकात्मज:।

देवता ऋषिवर सर्व चर्चा करुनी ठरविती ॥16॥
पद देणे महर्षीचे विश्वामित्रास योग्य हे ।

देवतानां वच: श्रुत्वा सर्वलोकपितामह:॥17॥
अब्रवीन्मधुरं वाक्यं विश्वामित्रं तपोधनम् ।
महर्षे स्वागतं वत्स तपसोग्रेण तोषित:॥18॥
महत्त्वमृषिमुख्यत्वं ददामि तव कौशिक ।

वचना ऐकुनि देवांच्या ब्रह्मदेव पितामह ॥17॥
मधुर बोलती वाक्य विश्वामित्रा तपोधना ।
महर्षे तुझे स्वागत संतुष्ट तव उग्र तपे ॥18॥
महर्षिपद तुज देत महत्वाचे कुशिकात्मजा ।

ब्रह्मणस्तु वच: श्रुत्वा विश्वामित्रस्तपोधन:॥19॥
प्राञ्जलि: प्रणतो भूत्वा प्रत्युवाच पितामहम् ।
ब्रह्मर्षिशब्दमतुलं स्वार्जितै: कर्मभि: शुभै:॥20॥
यदि मे भगवन्नाह ततोऽहं विजितेन्द्रिय:।

ऐकुनी वचन ब्रह्म्याचे विश्वामित्र तपोधन ।19।।
नमुनी हात जोडून बोलती हे पितामह ।
शुभ कर्मे करण्याने ब्रह्मर्षिपद अर्जित ।।20।।
भगवान बोलती ऐसे तेव्हांच मी विजितेंद्रिय।

तमुवाच ततो ब्रह्मा न तावत त्वं जितेंद्रिय: ।।21।।
यतस्व मुनिशार्दूल इत्युक्त्वा त्रिदिवं गत:।

ब्रह्माजी म्हणती तेव्हां अजून न जितेंद्रिय ।।21।।
करी प्रयत्न अजुनीही म्हणुनी स्वर्गि जात ते ।

विप्रस्थितेषु देवेषु विश्वामित्रो महामुनि:॥22॥
ऊर्ध्वबाहुर्निरालम्बो वायुभक्षस्तपश्चरन्।

जाता देव उभारून बाहू आधाराविण ॥22॥
भक्षुनी करती वायु तप उग्र महामुनी ।

घर्मे पञ्चतपा भूत्वा वर्षस्वाकाशसंश्रय:॥23॥
शिशिरे सलिलेशायी रात्र्यहानि तपोधन:।
एवं वर्षसहस्रं हि तपो घोरमुपागतम्॥24॥

गर्मीत पञ्चाग्नि सेवी वर्षाकाळि खुल्या स्थळी ॥23॥

थंडीत थंड पाण्यात रात्रंदिन राहती ॥
सहस्र वर्षे करती तप उग्र तपोनिधी ॥24॥

तस्मिन् संतप्यमाने तु विश्वामित्रे महामुनौ ।
संतापः सुमहानासीत् सुराणां वासवस्य च ॥25॥

महामुनि विश्वामित्र करिता उग्र तप ।
देवांसवे इन्द्राच्या मनी संताप दाटतो ॥25॥

रम्भामप्सरसं शक्रः सर्वैः सह मरुद्गणैः।
उवाचात्महितं वाक्यमहितं कौशिकस्य च ॥26॥

मरुद्गणांसह इंद्र अप्सरा रम्भेस सांगि जे ।
असे हितकर देवांस अहितकर कौशिका ॥26॥

**इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे त्रिषष्टितमः सर्गः ॥63॥**

# बालकाण्ड सर्ग64

सुरकार्यमिदं रम्भे कर्तव्यं सुमहत् त्वया ।
लोभनं कौशिकस्येह काममोहसमन्वितम् ॥1॥

देवांचे कार्य हे रम्भे महत्वाचे करणे तुज ।
लोभवी कौशिका ऐसे काम मोह वशीभुत ॥१॥

तथोक्ता साप्सरा राम सहस्राक्षेण धीमता ।
वीडिता प्राञ्जलिर्वाक्यं प्रत्युवाच सुरेश्वरम् ॥2॥

अप्सरेस वदता त्या बुद्धिमान इंद्र राघवा ।
लज्जिता हात जोडून इंद्रास असे म्हणे ॥2॥

अयं सुरपते घोरो विश्वामित्रो महामुनिः।
क्रोधमस्त्रक्षते घोरं मयि देव न संशयः॥3॥

सुरपते विश्वामित्र क्रोधयुक्त भयंकर ।
शिक्षा करील मज क्रोधे मुळि ना मज संशय ॥3॥

ततो हि मे भयं देव प्रसाद कर्तुमर्हसि ।
एवमुक्तस्तया राम सभयं भीतया तदा ॥4॥

तामुवाच सहस्राक्षो वेपमानां कृताञ्जलिम् ।
मा भैषी रम्भे भद्रं ते कुरुष्व मम शासनम् ॥5॥

त्यामुळे मी भयभीत माझ्यावर कृपा करा ।
ऐसे ती म्हणता रामा भिऊनि हात जोडुनी ॥4॥
रम्भेस त्या कांपणाऱ्या म्हणे इंद्र भिऊ नको ।
कल्याण तव होईल आज्ञेस मम पाळता ॥5॥

कोकिलो हृदयग्राही माधवे रुचिरद्रुमे ।
अहं कंदर्पसहित: स्थास्यामि तव पार्श्वत: ॥6॥

मधुरस्वर कोकीळ हृदया भुलवीत जी ।
कामदेवहि यांसंगे पाठीस तव राहिन ॥६॥

त्वं हि रूपं बहुगुणं कृत्वा परमभास्वरम् ।
तमृर्षि कौशिकं भद्रे भेदयस्व तपस्विनम् ॥7॥

मादक करुनी रूपा हालचालि मनोहर ।
विचलित तपस्येत विश्वामित्रा मुनी करी ॥7॥

सा श्रुत्वा वचनं तस्य कृत्वा रूपनुत्तमम् ।
लोभयामास ललिता विश्वामित्रं शुचिस्मिता ॥8॥

वच ऐकुनिया त्याचे धारुनी रूप मोहक।
भुलविण्या विश्वामित्रा प्रयास सुंदरी करी ॥8॥

कोकिलस्य तु सुश्राव वल्गु व्याहरत: स्वनम्।
सम्प्रहृष्टेन मनसा स चैनामन्ववैक्षत ॥9॥

ऐकुनी प्रसन्नचित्त कोकिळेचा कलरव।
दृष्टि उघडुनी पाही समोर रम्भा दिसे ॥9॥

अथ तस्य च शब्देन गीतेनाप्रतिमेन च।
दर्शनेन रम्भाया मुनि: संदेहमागत:॥10॥

कोकिळेच्या स्वरे तैसे रम्भेच्या गीतामुळे।
आणि दर्शनाने तिच्या मुनिना संशय वाटतो ॥10॥

सहस्राक्षस्य तत्सर्वं विज्ञाय मुनिपुङ्गवः।
रम्भां क्रोधसमाविष्टः शशाप कुशिकात्मजः॥11॥

जाणती मुनि इंद्राचे कारस्थानच सर्व हे।
रागाने देति रम्भेस शाप ते कुशिकात्मज ॥11॥

यन्मां लोभयसे रम्भे कामक्रोधजयैषिणम् ।
दशवर्षसहस्राणि शैली स्थास्यसि दुर्भगे ॥12॥

कामक्रोधजयी मजला भुलवाया तू पाहसी।
वर्षे दशसहस्रे तू राहशील बनुनी शिळा ॥12॥

ब्राह्मण: सुमहातेजास्तपोबलसमन्वित:।
उद्धरिष्यति रम्भे त्वां मत्क्रोधकलुषीकृताम् ॥13॥

मत्क्रोधे शापभ्रष्टा तू रम्भे उद्धरण्या तुला ।
तपोबलयुक्त येईल महातेजस्वी ब्राह्मण ॥13॥

एवमुक्त्वा महातेजा विश्वामित्रो महामुनि:।
अशक्नुवन् धारयितुं कोपं संतापमात्मन:॥14॥

बोलल्यावर क्रोधास आवरणे शक्य होत ना।
कळुनी मनोमनी ते स्वत:वर संतापती ॥14॥

तस्य शापेन महता रम्भा शैली तदाभवत ।
वच: श्रुत्वा च कंदर्पो महर्षे: स च निर्गत:॥15॥

त्यांच्या त्या महाशापे रम्भा बनतसे शिळा ।
वच ऐकुनिया इन्द्र मदनासह जातसे ॥15॥

कोपेन च महातेजास्तपोऽ पहरणे कृते।
इन्द्रियैरजितै राम न लेभे शान्तिमात्मन:॥16॥

महातेजाचा तपोभंग श्रीरामा कोपे होतसे ।
इन्द्रिये नसति काबूत विचारे या अशान्त ते ॥16॥

बभूवास्य मनश्चिन्ता तपोऽपहरणे कृते ।
नैवं क्रोधं गमिष्यामि न च वक्ष्ये अथंचन ॥17॥

तपाचा भंग झाल्याने विचार करती मनी ।
आता करिन ना क्रोध बोलेनहि न कधीहि मी ॥17॥

अथवा नोच्छ्वसामि संवत्सरशतान्यपि।
अहं हि शोचयिष्यामि आत्मानं विजितेन्द्रिय ॥18॥

किंवा श्वास न घेईन वर्षे शंभर हो तरी ।
इन्द्रियांस जिंकुनिया सुकवीन शरिरा मम ॥18॥

तावद् यावद्धि मे प्राप्तं ब्राह्मण्यं तपसार्जितम् ।
अनुच्छ्वसन्नभुञ्जानस्तिष्ठेयं शाश्वती: समा:॥19॥

तपस्याप्राप्त ब्राह्मण्य जोवरी मज ना मिळे ।
खाणे पिणे तसा श्वास न घेई तोवरी शाश्वत ॥19॥

नहि मे तप्यमानस्य क्षयं यास्यन्ति मूर्तय:।
एवं वर्षसहस्रस्य दीक्षां स मुनिपुङ्गव:।

चकाराप्रतिमां लोके प्रतिज्ञां रघुनन्दन ॥20॥

तप मी करताना नष्ट अवयव होत ना ।
निश्चये रघुनन्दन हे सहस्र वर्षांचे तप ।
प्रतिज्ञा करती ते जी जगी अतुलनीय असे ॥२०॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डे चतु:षष्टितम: सर्ग:॥64॥**

# बालकाण्ड सर्ग 65

अथ हैमवतीं राम दिशं त्यक्त्वा महामुनिः।
पूर्वां दिशमनुप्राप्य तपस्तेते सुदारुणम् ॥1॥

शतानन्द सांगतात
दिशा उत्तर सोडून पूर्वेस जात महामुनी।
कठोर तप श्रीरामा आरम्भति त्या स्थळी ॥1॥

मौनं वर्ष सहस्रस्य कृत्वा व्रतमनुत्तमम् ।
चकाराप्रतिमं राम तप: परमदुष्करम् ॥2॥

करोनी धारण मौन सहस्र वर्षे उत्तम ।
अतुलनीय असे रामा तप दुष्कर करीति ते ॥2॥

पूर्णे वर्षसहस्रे तु काष्ठभूतं महामुनिम् ।
विनर्बहुभिराधूतं क्रोधो नान्तरमाविशत ॥3॥

राहती पूर्ण निश्चेष्ट सहस्र वर्षे काष्ठवत ।
आणता विघ्ने मध्ये क्रोध येउ न देति ते ॥3॥

स कृत्वा निश्चयं राम तप आतिष्ठताव्ययम् ।
तस्य वर्षसहस्रस्य व्रते पूर्ण महाव्रत:॥4॥
भोक्तुमारब्धवानन्नं तस्मिन् काले रघूत्तम ।
इन्द्रो द्विजातिर्भूत्वा तं सिद्धमन्नमयाचयत ॥5॥

अश्या निश्चये रामा अनुष्ठति अक्षय तप ।
व्रत सहस्र वर्षांचे पूर्ण होता व्रती मुनी ॥4॥
अन्नग्रहण विचार करता इन्द्र येउनी ।
ब्राह्मणरूपे अन्नाची याचना त्या करीतसे ॥5॥

तस्मै दत्वा तदा सिद्धं सर्वं विप्राय निश्चित:।
नि:शेषितेऽन्ने भगवानभुक्त्वैव महातपा: ॥6॥

देउनी अन्न केलेले ब्राह्मणा निश्चये स्वता।
राहती विना अन्न जलाविण महातप ॥6॥

न किंचिदवदद् विप्रं मौनव्रतमुपास्थित:।
तथैवासीत पुनर्मौनमनुच्छ्वासं चकार ह ॥7॥

ब्राह्मणा न काही बोले मौनव्रत पाळुनी ।
अनुष्ठति पुन्हा मौन श्वासोच्छ्वासाविना तपा ॥7॥

अथ वर्षसहस्रं च नोच्छ्वसन् मुनिपुङ्गवः।
तस्यानुच्छ्वसमानस्य मूर्ध्नि धूमो व्यजायत ॥8॥

रोधुनी सहस्र वर्षे श्वास पुन्हा महामुनी ।
त्यामुळे मस्तकी त्यांच्या धूम्र उत्पन्न होतसे ॥8॥

त्रैलोक्यं येन सम्भ्रातमातापितमिवाभवत ।
ततो देवर्षिगन्धर्वाः पन्नगोरगराक्षसाः॥9॥
मोहितास्तपसा तस्य तेजसा मन्दरश्मयः।
कश्मलोपहताः सर्वे पितामहमथाब्रुवन् ॥10॥

त्यामुळे प्राणि त्रैलोक्यी भीत संतप्त जाहले ।
देवता ऋषि गन्धर्व नाग राक्षस सर्पही ॥9॥
तपे मोहित तेजाने कान्ति भ्रष्ट होति ते ।
दु:ख व्याकुल होऊनी ब्रह्मदेवास बोलती ॥10॥

बहुभिर्कारणैर्देव विश्वामित्रो महामुनि:।
लोभित:क्रोधितश्चैव तपसा चाभिवर्धते ॥11॥
लोभ क्रोध आणायाचे प्रयत्न करुनी बहू ।
तप चालू तरी ठेवी विश्वामित्र महामुनी ॥11॥

नह्यस्य वृजिनं किंचिद् दृश्यते सूक्ष्ममप्युत ।
न दीयते यदि तस्य मनसा यदभीप्सितम् ॥12॥
विनाशयति त्रैलोक्यं तपसा सचराचरम् ।
व्याकुलाश्च दिशः सर्वा न च किंचित प्रकाशते ॥13॥

त्यांच्यात न दिसे दोष कोणताही आता आम्हा ।
मनोवांच्छित जे काही मिळे ना जर त्याजला ॥12॥
त्रैलोक्य नाश होईल प्राण्यांसह तपोबले ।
दिशाही व्याप्त धूम्राने प्रकाशहि लोपला ॥13॥

सागरा: क्षुधिता: सर्वे विशीर्यन्ते च पर्वता:।
प्रकम्पते च वसुधा वायुर्वातीह संकुल:॥14॥

क्षुब्ध सागर ते होती विदीर्ण होति पर्वत ।
डगमगे धरती सर्व होई प्रचंड वादळ ॥14॥

ब्रम्हन् न प्रतिजानीमो नास्तिको जायते जन:।
सम्मूढमिव त्रैलोक्यं सम्प्रक्षुभितमानसम् ॥15॥

उपाय न सुचे आम्हा जन नास्तिक होति ते ।
प्राण्यांचे मन हो क्षुब्ध त्रैलोक्य संमूढ जणु ॥15॥

भास्करो निष्प्रभश्चैव महर्षेस्तस्य तेजसा ।
बुद्धिं न कुरुते यावन्नाशे देव महामुनिः ॥16॥
तावत प्रसादो भगवन्नग्निरूपो महाद्युतिः।

तेजाने महर्षींच्या त्या सूर्य निष्प्रभ भासतो ।
मुनी हे अग्नीस्वरूप जगनाशाचा जोवरी ॥16॥
करण्यापूर्वी विचार प्रसन्न करणे योग्य त्यां ।

कालाग्निना यथा पूर्वं त्रैलोक्यं दह्यतेऽखिलम् ॥17॥
देवराज्यं चिकीर्षत दीयतामस्य यन्मनः।

कालाग्निने जसे पूर्वी त्रैलोक्या पूर्ण जाळिले ॥17॥
तसे करण्यापूर्वी याने देवराज्यहि त्यास द्या ।

ततः सुरगणाः सर्वे पितामहपुरोगमाः॥18॥
विश्वामित्रं महात्मानं वाक्यं मधुरब्रुवन् ।

तेव्हा ब्रह्मदेवासह देवता सर्व जाउनी ॥18॥
विश्वामित्राच्या जवळी मधुर शब्दे बोलती ।

ब्रह्मर्षे स्वागतंतेऽस्तु तपसा स्म सुतोषिताः॥19॥
ब्राह्मण्यं तपसोग्रेण प्राप्तवानसि कौशिक ।

ब्रह्मर्षे स्वागत तुमचे अतिसंतुष्ट तपे तव ॥19॥
तपे उग्र तुम्ही केले प्राप्त ब्राह्मण्य कौशिक ।

दीर्घमायुश्च ते ब्रह्मन ददामि समरुद्गण:॥20॥
स्वस्ति प्राप्नुहि भद्रंते गच्छ सौम्यं यथासुखम ।

मरुद्गणांसह दीर्घ आयुष्य दिधले तुला॥20॥
कल्याण तव जा जेथे सुखाने जायचे तुला ।

पितामहवच: श्रुत्वा सर्वेषां त्रिदिवौकसाम ॥21॥
कृत्वा प्रणामं मुदितो व्याजहार महामुनि:।

ब्रह्माच्या ऐकुनी बोला सर्वा वंदुनिया तयां ॥21॥
आनंदित विश्वामित्र महामुनि म्हणे असे ।

ब्राह्मण्यं यदि मे प्राप्तं दीर्घमायुस्तथैव च ॥22॥
ॐकारोऽथ वषट्कारो वेदाश्च वरयन्तु माम् ।
क्षत्रवेदविदांश्रेष्ठो ब्रह्मवेदविदामपि ॥23॥
ब्रह्मपुत्रो वसिष्ठो मामेवं वदतु देवता:।
यद्येवं परम: काम: कृतो यान्तु सुरर्षभा:॥24॥:

ब्राह्मण्य जर मला प्राप्त दीर्घायुष्यहि त्यासवे ॥22॥

ॐकार,वषट्कार वरोत मज वेदही ।
क्षत्रवेद,ब्रह्मवेद असती निष्णात यामध्ये ॥23॥
वसिष्ठ जे ब्रह्मपुत्र म्हणोत तैसे येउनी ।
इच्छा मग मम पूर्ण निरोप मग द्या मज ॥24॥

ततः प्रसादितो देवैर्वसिष्ठो जपतां वरः।
सख्यं चकार ब्रह्मर्षिरेवमस्त्विति चाब्रवीत ॥25॥

देव प्रसन्न करती वसिष्ठां श्रेष्ठ जे मुनी ।
"होवो तसे" म्हणती ते सख्यत्वे कौशिकासवे ॥25॥

ब्रह्मर्षिस्त्वं न संदेह: सर्वं सम्पद्यते तव ।
इत्युक्त्वा देवताश्चापि सर्वा जग्मुर्यथागतम् ॥26॥

ब्रह्मर्षि नि:संशय तुम्ही सर्व संस्कारपूर्णही ।
देवता ऐसे वदुनी पुन्हा जाति आले तसे ॥26॥

विश्वामित्रोऽपि धर्मात्मा लब्ध्वा ब्राह्मण्यमुत्तमम् ।
पूजयामास ब्रह्मर्षिं वसिष्ठं जपतां वरम् ॥27॥

विश्वामित्रहि धर्मात्मा मिळता ब्राह्मण्य उत्तम।
मन्त्रजपि श्रेष्ठ ब्रह्मर्षि वसिष्ठांना पूजिती ॥27॥

कृतकामो महीं सर्वां चचार तपसि स्थित:।
एवं त्वनेन ब्राह्मण्यं प्राप्तं राम महात्मना॥28॥

इच्छापूर्त तपोमग्न संचरती महीवरी ।
रामा महात्मा ऐसे प्राप्त ब्राहणत्वा करी ॥28॥

एष राम मुनिश्रेष्ठ एष विग्रहांस्तप:।
एष धर्म: परो नित्यं वीर्यस्यैस्य परायणम् ॥29॥

रामा असे हे मुनींत सर्वश्रेष्ठ तप मूर्तिमान् ।
धर्माचे विग्रह साक्षात पराक्रम महानिधी ॥29॥

एवमुक्त्वा महातेजा विरराम द्विजोत्तम ।
शतानन्दवच: श्रुत्वा रामलक्ष्मणसंनिधौ ॥30॥
जनक: प्राञ्जलिर्वाक्यमुवाच कुशिकात्मजम् ।

शतानंद होती स्तब्ध सांगुनी हे द्विजोत्तम ।
ऐकुनी वचना त्यांच्या जनक हात जोडुनी ॥30॥
रामलक्ष्मणसंन्निध्ध विश्वामित्रां असे म्हणे ॥

धन्योऽस्म्यनुगृहीतोऽस्मि यस्य मे मुनिपुङ्गव ॥31॥
यज्ञं काकुत्स्थसहित: प्राप्तवानसि कौशिक ।

पावितोऽहं त्वया ब्रह्मन् दर्शनेन महामुने ॥32॥

काकुत्स्थांसह यज्ञात माझ्या आपण उपस्थित ॥31॥
त्यामुळे धन्य मी झालो कृपा मजवरि आपली ।
पवित्र दर्शने झालो आपल्या हे महामुनी ॥32॥

गुणाः बहुविधाः प्राप्तास्तव संदर्शनान्मया ।
विस्तरेण च वै ब्रह्मन् कीर्त्यमानं महत्तपः॥33॥
श्रुतं मया महातेजो रामेण महात्मना।
सदस्यैः प्राप्य च सदः श्रुतास्ते बहवो गुणाः ॥34॥

दर्शने आपुल्या आज गुण बहुविध लाभले ।
रामासवे महातेज ऐकाया मजला मिळे ॥33॥
आपल्या महातेजाचा प्रभाव कैसा वर्णन ।
शतानन्दे कथिला जो विस्तारपूर्वक ऐकुनी ॥34॥

अप्रमेयं तपस्तुभ्यमप्रमेयं च ते बलम् ।
अप्रमेया गुणाश्चैव नित्यं ते कुशिकात्मज ॥35॥

अतुलनीय तप आपुले तैसेच आपुले बल ।
अप्रमेय गुणही तैसे कुशिकात्मज आपुले ॥35॥

तृप्तिराश्चर्यभूतानां कथानां नास्ति मे विभो ।
कर्मकालो मुनिश्रेष्ठ लम्बते रविमण्डल ॥36॥

कथांना आश्चर्यपूर्ण नसे अन्त महानिधी ।
परि यज्ञसमय होत सूर्यही ढळु लागला ॥36॥

श्व: प्रभाते महातेजो द्रष्टुमर्हसि मां पुन:।
स्वागतं जपतां श्रेष्ठ मामनुज्ञातुमर्हसि ॥37॥

स्वागत हे मुनिश्रेष्ठ उदईक दर्शन पुन्हा ।
द्यावे आता मला द्यावी अनुज्ञा निघण्याची ही ॥37॥

एवमुक्तो मुनिवर: प्रशस्य पुरुषर्षभम्।
विससर्जासु जनकं प्रीतं प्रीतमनसास्तदा ॥38॥

ऐकुनी वच राजाचे हो प्रसन्न मनी मुनी ।
नृपासहि प्रशंसून शीघ्र देति निरोप त्या ॥38॥

एवमुक्त्वा मुनिश्रेष्ठं वैदेहो मिथिलाधिप:।
प्रदक्षिणं चकाराशु सोपाध्याय: सबान्धव:॥39॥

असे बोलुनि मुनिश्रेष्ठां वैदेह मिथिलापती ।
प्रदक्षिणा करुनी त्यांना सर्वांसवे जाति तेथुनी ॥39॥

विश्वामित्रोऽपि धर्मात्मा सहराम: सलक्ष्मण:।
स्ववासमभिचक्राम पूज्यामानो महात्मभि: ॥40॥

स्वीकारुनि पूजा त्यांची घेउनी राम लक्ष्मणां ।
विश्रामस्थानि त्यांच्या ते जाति विश्वामित्रही ॥40॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डे पञ्चषष्टितम: सर्ग: ॥65॥**

# बालकाण्ड सर्ग 66

ततः प्रभाते विमले कृतकर्मा नराधिपः।
विश्वामित्रं महात्मानमाजुहाय सराघवम् ॥1॥
तमर्चयित्वा धर्मात्मा शास्त्रदृष्टेन कर्मणा ।
राघवौ च महात्मानौ तदा वाक्यमुवाह ह ॥2॥

प्रसन्न प्रभात होता प्रात:कर्मे करूनिया ।
विश्वामित्रां बोलावुनि रामासह नराधिप ॥1॥

पूजुनिया धर्मात्मा विधिपूर्वक त्यांजला ।
रामलक्ष्मणासंगे त्यांना वचन बोलती ॥2॥

भगवन् स्वागतं तेऽस्तु किं करोमि तवानघ।
भवानाज्ञापयितु मामाज्ञाप्यो भवता ह्यहम् ॥3॥

सांगा सेवा भगवान असो स्वागत आपुले ।
आज्ञा आपण करावी आज्ञापालक आपुला ॥3॥

एवमुक्त: स धर्मात्मा जनकेन महात्मना ।
प्रत्युवाच मुनिश्रेष्ठो वाक्यं वाक्यविशारद: ॥4॥

जनकाने म्हणता ऐसे धर्मात्मा ते महामुनी ।
महात्म्या वदती ऐसे संभाषणकुशल ते ॥4॥

पुत्रौ दशरथस्येमौ क्षत्रियौ लोकविश्रुतौ ।
द्रष्टुकामौ धनु:श्रेष्ठं यदेतत्त्वयि तिष्ठति ॥5॥

हे पुत्र दशरथाचे विश्वविख्यात क्षत्रिय ।
धनु आपणाकडील श्रेष्ठ जे पाहु इच्छिती ॥5॥

एतद् दर्शय भद्रं ते कृतकामौ नृपात्मजौ ।
दर्शनादस्य धनुषो यथेष्टं प्रतियास्यत:॥6॥

दाखवी त्यांस होऊनी इच्छापूर्ति तयांचि ते ।
पाहुनी संतुष्ट होता परत जातिल स्वगृही ॥6॥

एवमुक्तस्तु जनकः प्रत्युवाच महामुनिम् ।
श्रूयतामस्य धनुषो यदर्थमिह तिष्ठति ॥7॥

जनक हे ऐकुनिया उत्तरती मुनिश्रेष्ठां ।
कशास्तव धनु येथे हे तेहि ऐका सांगतो ॥7॥

देवरात इति ख्यातो निमेर्ज्येष्ठो महीपतिः।
न्यासोऽयं तस्य भगवन् हस्ते दत्तो महात्मनः ॥8॥

देवरात पुत्र ज्येष्ठ निमिचे विख्यात नृप ।
महात्म्यास त्या दिधले असे भेट म्हणुनिया ॥8॥

दक्षयज्ञवधे पूर्व धनुरायम्य वीर्यवान् ।
विध्वंस्य त्रिदशान् रोषात सलीलमिदमब्रवीत ॥9॥
यस्माद् भागार्थिनो भागं नाकल्पयत मे सुरा: ।
वरांगानि महार्हाणि धनुषा शातयामि व: ॥10॥

विध्वंस दक्षयज्ञाचा केल्यानंतर पराक्रमी ।
खेळ म्हणुनि शंकर धनुष्य उचलुनि बोलले ॥9॥

मला यज्ञात घेण्याला भाग अडवियले तुम्ही ।
म्हणुनी धनुष्ये तुमचे छेदितो उत्तमांग मी॥10॥

ततो विमनस: सर्वे देवा वै मुनिपुङ्गव ।
प्रसादयन्त देवेशं तेषां प्रीतोऽभवद् भव: ॥11॥

विमनस्क होत देव स्तुति करुनी शंकरा ।
लागती प्रसन्न करण्या शिव संतुष्ट होत ते ॥11॥

प्रीतियुक्तस्तु सर्वेषां ददौ तेषां महात्मनाम् ।
तदेतद् देवदेवस्य धनूरत्नं महात्मन:॥12॥

न्यासभूतं तदा न्यस्तमस्माकं पूर्वजे विभौ ।

प्रसन्न होत सर्वांना करती धनु अर्पण ।
तेच हे धनुष्य रत्न भगवान शिवाचे असे ॥12॥
पूर्वजाजवळीं माझ्या जपले ठेव म्हणुनिया ।

अथ मे कृषत: क्षेत्रं लांगलादुत्विता तत:।१३॥
क्षेत्रं शोधयता लब्धा नाम्ना सीतेति विश्रुता ।
भूतलादुत्थिता सा तु व्यवर्धत ममात्मजा ॥14॥

दिनी एक यज्ञासाठी भूमि खणता नांगरे ॥॥13॥

प्रकटे त्या सीतेतुनि कन्या म्हणुनी तिला ॥
(खणली गेलेली जमिनीची रेषा म्हणजे सीता}
सीता नाम भूमिकन्या मम जी वाढली इथे॥14॥

वीर्यशुल्केति मे कन्या स्थापितेयमयोनिजा ।
भूतलादुत्थितां तां तु वर्धमानां ममात्मजाम् ॥15॥
वरयामासुरागत्य राजानो मुनिपुङ्गव ।

अयोनिजा या कन्येला पराक्रमि वीर चाप जो ।
चढवेल धनुष्या या वरण्या योग्य तो असा ॥15॥
पण मी केला कित्येक नृप तिज मागती मज ।

तेषां वरयतां कन्यां सर्वेषां पृथिवीक्षिताम् ॥16॥
वीर्यशुल्केति भगवन् न ददामि सुतामहम् ।

नृपां सर्व कथिले मी वरण्या तिज येति जे ॥16॥
वीर्यशुल्का असे कन्या म्हणुनी न दिधले कुणा ।

ततः सर्वे नृपतयः समेत्य मुनिपुङ्गव:॥17॥
मिथिलामप्युपागम्य वीर्यं जिज्ञासवस्तदा ।

नृपांसह मुनिपुङ्गव पुसती मिथिलेस येउनी ॥17॥
पराक्रम कोणता करता सीताप्राप्त होतसे ॥

तेषां जिज्ञासमानानाम् शैवं धनुरुपाहृतम् ॥18॥
न शेकुर्ग्रहणे तस्य धनुषस्तोलनेऽपि या ॥

ठेविता जिज्ञासूंपुढे शिवधनुष्य ते पेलण्या ॥18॥
परंतु उचलाया वा हलवायाहि न शक्य त्यां ।

तेषां वीर्यवतां वीर्यमल्पं ज्ञात्वा महामुने ॥19॥
प्रत्याख्याता नृपतयस्तन्निबोध तपोधन ।

तयांच्या अल्पवीर्यत्वे कन्येस न दिले तयां ॥१९॥
त्यानंतर घडे काय ऐका तेही तपोधना ।

ततः परमकोपेन राजानो मुनिपुङ्गव ॥20॥
अरुन्धन मिथिलां सर्वे वीर्यसंदेहमागताः ।

नकार तयां देता सर्व क्रोधित होति ते ॥20॥
पराक्रमसंशय घेता वेढा मिथिलेस घालती ।

आत्मानमवधूतं मे विज्ञाय नृपपुङ्गवाः॥21॥
रोषेण महताविष्टाः पीडयन् मिथिलां पुरीम् ।

अपमान तयांचा मी केला मानुनि नृपवर ॥21॥
क्रोधे पीडति सर्वत्र मिथिला नगरीस ते ।

ततः संवत्सरे पूर्णे क्षयं यातानि सर्वशः॥22॥
साधनानि मुनिश्रेष्ठ ततोऽहं भृशदु:खितः ।

मुनिश्रेष्ठ ते ऐसे करती वर्षभरी तदा ॥22॥
सैन्य क्षीण मम झाले फार दु:खित होत मी ।

ततो देवगणान् सर्वांस्तपसाहं प्रसादयम् ॥23॥
ददुश्च परमप्रीताश्चतुरंगबलं सुराः।

तेव्हां तप करुनीया प्रसन्न करण्या सुरां ॥23॥
प्रयत्न करता देती चतुरंग दल प्रीतिने ।

ततो भग्ना नृपतयो हन्यमाना दिशो ययु:॥24॥
अवीर्या वीर्यसंदिग्धा: सामात्या: पापकारिण:।

सैन्याकडुनि त्या होती पराभूत पळ काढती॥24॥
असे पराक्रमि ज्यांच्या संशय ते पापकारि जे।

तदेतन्मुनिशार्दूल धनु: परमभास्वरम्॥25॥
रामलक्ष्मणयोश्चापि दर्शयिष्यामि सुव्रत ।

तेजस्वी धनु ते ऐसे तेच हे मुनिशार्दुल ॥25॥
श्रीराम लक्ष्मणा उभयां दाखवेन हे सुव्रता ।

यद्यस्य धनुषो राम: कुर्यादारोपणं मुने ।
सुतामयोनिजां सीतां दद्यां दाशरथेरहम् ॥26॥

प्रत्यंचा यावरी राम चढवेल तर हे मुनी ।
कन्या अयोनिजा त्याला दाशरथाला अर्पिन ॥26॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डे षट्षष्टितम: सर्ग: ॥66॥**

# बालकाण्ड सर्ग 67

जनकस्य वच: श्रुत्वा विश्वामित्रो महामुनि:।
धनुर्दर्शय रामाय इति होवाच पार्थिवम् ॥1॥

जनकाचे बोल ऐकून विश्वामित्र महामुनि ।
"धनुष्य दाखवा रामा आपले " म्हणती असे ॥1॥

तत: स राजा जनक: सचिवान् व्यादिदेश ह ।
धनुरानीयतां दिव्यं गन्धमाल्यानुलेपितम् ॥2॥

तेव्हां जनक राजाने आदेश सचिवां दिला ।
शोभित चंदन माळांनी धनुष्य आणवा इथे ॥2॥

जनकेन समादिष्टा: सचिवा: प्रविशन् पुरम्।
तद्धनु: पुरत: कृत्वा निर्जग्मुरमितौजस:॥3॥

जनकाज्ञेने जाती तेजस्वी सचीव ते ।
धनुष्या पुढती घेत परत येति पुरीतुनि ॥3॥

नृणां शतानि पञ्चाशद् व्यायतानां महात्मनाम् ।
मञ्जूषामष्टचक्रां तां समूहस्ते कथंचन ॥4॥

आठ चाकी लोहपेटीत ठेवलेले धनुष्य ते।
पंच सहस्र महाबाहु प्रयासे ओढुनि आणती ॥4॥

तामादाय सुमञ्जूषामायसी यत्र तद्धनु:।
सुरोपमं ते जनकमूचुर्नृपतिमन्त्रिण: ॥5॥

आणुनी लोहमंजुषा देवोपम जिच्यामध्ये ।
असे धनु नृपा जनका मन्त्रिगण सांगती असे ॥5॥

इदं धनुर्वरं राजन्‍ पूजितं सर्वराजभि:।
मिथिलाधिप राजेन्द्र दर्शनीयं यदीच्छसि ॥6॥

श्रेष्ठ धनु सर्वराजांनी सन्मानित जे हे असे ।
मिथिलाधिपती योग्य वाटले तर दाखवा ॥6॥

तेषां नृपो वच: श्रुत्वा कृताञ्जलिरभाषत ।
विश्वामित्रं महात्मानं तावुभौ रामलक्ष्मणौ ॥7॥

त्यांचे वचन ऐकून हात जोडुनिया नृप ।
महात्मा विश्वामित्रां तसे रामलक्ष्मणां म्हणे ॥7॥

इदं धनुर्वरं ब्रह्मन जनकैरभिपूजितम ।
राजभिश्च महावीरशक्तै: पूरितं तदा ॥8॥

जनकवंशी पूजिती तेच श्रेष्ठ धनुष्य हे ।
सन्मानित महावीरे उचलू शकति त्या न जे ॥8॥

नैतत सुरगणा: सर्वे सासुरा न च राक्षसा:।
गन्धर्वयक्षप्रवरा: सकिन्नरमहोरगा:॥9॥

सुरासुर राक्षस यक्ष किन्नर महानागही ।
गन्धर्व असे सगळे उचलू न शकले तया ॥9॥

क्व गतिर्मानुषाणां च धनुषोऽस्य प्रपूरणे ।
आरोपणे समायोगे वेपने तोलने तथा ॥10॥

मनुष्या कसले शक्य उचलूनी त्या ओढुनी ।
प्रत्यंचा लावणे बाण भार त्याचा तोलणे ॥10॥

तदेतद् धनुषां श्रेष्ठमानीतं मुनिपुंगव।
दर्शयेतन्महाभाग अनयो राजपुत्रयो:॥11॥

श्रेष्ठ त्याच धनुष्याला आणिले मुनिश्रेष्ठ ह्या ।
दोन या राजपुत्रांना महर्षि दाखवा तुम्ही ॥11॥

विश्वामित्र: सरामस्तु श्रुत्वा जनकभाषितम्।
वत्स राम धनु: पश्य इति राघवमब्रवीत ॥12॥

रामासह विश्वामित्र जनकवचना ऐकुनी ।
रामास म्हणती वत्सा धनुष्या पाहि श्रेष्ठ या ॥12॥

महर्षेर्वचनाद् रामो यत्र तिष्ठति तद्धनु:।
मञ्जूषां तामपावृत्य दृष्टा धनुरथाब्रवीत ॥13॥

महर्षींच्या आज्ञेने राम उघडून मञ्जुषा ।
न्याहाळी तो धनुष्यास आणि नंतर बोलला ॥13॥

इदं धनुर्वरं दिव्यं संस्पृशामीह पाणिना ।
यत्नवांश्च भविष्यामि तोलने पूरणेऽपि वा ॥14॥

धनुष्या श्रेष्ठ या दिव्य पाहतो हाति घेउनी ।
उचलून खेचण्याचा प्रयत्न करुनी पाहतो ॥14॥

बाढमित्यब्रवीद् राजा मुनिश्च समभाषत ।
लीलया स धनुर्मध्ये जग्राह वचनान्मुने:॥15॥
पश्यतां नृसहस्राणां बहूनां रघुनन्दन:।
आरोपयत स धर्मात्मा सलीलमिव तद्धनु:॥16॥

राजा आणि मुनी त्याला तसेच कर सांगती ।
मुनिंची मानुनी आज्ञा रघुनन्दन राम तो ॥15॥

धरुनी मध्यभागात उचली लीलया धनु ।
समोर जनसहस्रांच्या प्रत्यंचा चढवि त्यावर ॥16॥

आरोपयित्वा मौर्वीं च पूरयामास तद्धनु:।
तद् बभन्ज धनुर्मध्ये नरश्रेष्ठो महायशा:॥17॥

प्रत्यन्चा चढवी राम नरश्रेष्ठ महायश ।
मध्येच तुटुनी जाई आकर्ण धनु खेचता ॥17॥

तस्य शब्दो महानासीन्निर्घातसमनि:स्वन:।
भूमिकम्पश्च सुमहान पर्वतस्येव दीर्यत: ॥18॥

त्यावेळी होइ जो नाद वज्रपातच भासला ।
दुभंगे पर्वत मध्ये की भूकंपच होतसे ॥18॥

निपेतुश्च नरा: सर्वे तेन शब्देन मोहिता:।
वर्जयित्वा मुनिवरं राजानं तौ च राघवौ ॥19॥

सोडूनि मुनिवर राजा आणि लक्ष्मण राघव ।
निश्चेष्ट सगळे होती लोक नादे भयंकर ॥19॥

प्रत्याश्वस्ते जने तस्मिन् राजा विगतसाध्वस:।
उवाच प्राञ्जलिर्वाक्यं वाक्यज्ञो मुनिपुंगवम् ॥20॥

जन सावध ते होता राजा निर्भय होउनी ।
हात जोडुनिया बोले मर्मज्ञ मुनिपुङ्गवा ॥20॥

भगवन् दृष्टवीर्यो मे रामो दशरथात्मजः।
अत्यद्भुतमचिन्त्यं च आतर्कितमिदं मया ॥21॥

दशरथसुत रामाचा पराक्रम प्रत्यक्ष पाहिला ।
अचिन्त्य अद्भुत वाटे तर्क करणेहि शक्य ना ॥21॥

जनकानां कुले कीर्तिमाहरिष्यति मे सुता ।
सीता भर्तारमासाद्य रामं दशरथात्मजम् ॥22॥

दशरथसुत जो राम पति सीतेस लाभुनी ।
कीर्ती जनकवंशाची वाढवील सुता मम ॥22॥

मम सत्या प्रतिज्ञा सा वीर्यशुल्केति कौशिक।
सीता प्राणैर्बहुमता देया रामाय मे सुता ॥23॥

होतसे प्रतिज्ञा सत्य वीर्यशुल्का सुता मम ।
प्राणाहुनि प्रिय सीता मी श्रीरामास अर्पितो ॥23॥

भवतोऽनुमते ब्रह्मन् शीघ्रं गच्छन्तु मन्त्रिणः।
मम कौशिक भद्रं ते अयोध्यां त्वरिता रथैः॥24॥

राजानं प्रश्रितैर्वाक्यैरानयन्तु पुरं मम ।
प्रदानं वीर्यशुल्कायाः कथयन्तु च सर्वशः॥25॥

आज्ञा कौशिका आपली असे तर मन्त्री मम ।
अयोध्येप्रति जातील शीघ्र बैसुनिया रथी ॥24॥
विनयपूर्वक शब्दांनी आणुनी अयोध्यापति ।
सांगतील सुता सीता मम रामास अर्पिली ॥25॥

मुनिगुप्तौ च काकुत्स्थौ कथयन्तु नृपाय वै।
पतियुक्तं तु राजानं आनयन्तु सुशीघ्रगाः॥26॥

सांगा दशरथा पुत्र विश्वामित्रे सुरक्षित ।
प्रसन्न झालेल्या त्या शीघ्र येथे आणवा ॥26॥

कौशिकस्तु तथेत्याह राजा चाभाष्य मन्त्रिण:।
अयोध्यां प्रेषयामास धर्मात्मा कृतशासनान् ।
यथावृत्तं समाख्यातुमानेतुं च नृपं तथा ॥27॥

सम्मति कौशिके देता राजा मन्त्र्यांस बोलुनी।
पाठवी त्यां अयोध्येस सांगाया नृप दशरथा ।
यथोचित सर्व वृत्त आणि आणाया तया ॥27॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे सप्तषष्टितमः सर्गः॥67॥

# बालकाण्ड सर्ग 68

जनकेन समादिष्टा दूतास्ते क्लान्तवाहना:।
त्रिरात्रमुषिता मार्गे तेऽयोध्यां प्राविशन् पुरीम्॥1॥

जनकाचे दूत वाटेत वाहने श्रान्त होउनी ।
तीन रात्रित पोचूनी अयोध्येत प्रवेशति ॥1॥

ते राजवचनाद् गत्वा राजवेश्म प्रवेशिता ।
ददृशुर्देवसंकाशं वृद्धं दशरथंनृपं ॥2॥

राजगृहि प्रवेशीत राजाज्ञा मिळताच ते।
पाहती वृद्ध तेजस्वी दशरथा देवतुल्य ते॥2॥

बद्‍ध्दांजलिपुटा: सर्वे दूता विगत साध्वसा:।
राजानं प्रश्रितं वाक्यं ब्रुवन् मधुराक्षरम् ॥3॥
मैथिलो जनको राजा साग्निहोत्रपुरस्कृत:।
मुहुर्मुर्मधुरया स्नेहसंरक्तया गिरा ॥4॥
कुशलं चाव्ययं चैव सोपाध्याय पुरोहितम्।
जनकस्त्वां महाराज पृच्छते सपुर:सरम् ॥5॥

जोडुनी हात ते दूत सर्व निर्भय होउनी ।
वार्ता मधुर वाणीने विनये राजास सांगती ॥3॥
मिथिलाधिपति राजा अग्निहोत्राग्नि साक्षिने ।
मधुर स्वरे पुन्हापुन्हा स्नेहयुक्त वाणीने ॥4॥
पुरोहित उपाध्याय सेवकांसह आपुले ।
कुशल मंगल त्यांनी विचारलेले असे ॥5॥

पृष्ट्वा कुशलमव्यग्रं वैदेहो मिथिलाधिपः।
कौशिकानुमते वाक्यं भवन्तमिदमब्रवीत ॥6॥

कुशल हे विचारून कौशिकानुमतीसवे ।
मिथिलाधिप राजाने संदेशहि दिला असे॥6॥

पूर्व प्रतिज्ञा विदिता वीयशुल्का ममात्मजा ।
राजानश्च कृतामर्षा निर्वीर्या विमुखीकृता:॥7॥

प्रतिज्ञा आपणा ज्ञात कन्या वीर्यशुल्का मम ।
राजे येती प्रतिज्ञेने अयशस्वी होउनि जात ते ॥7॥

सेयं ममसुता राजन्‍ विश्वामित्रपुरस्कृतै:।
यदृच्छयागते राजन्‍ निर्जिता तव पुत्रकै:॥8॥

विश्वामित्रांसवे येता यदृच्छया आपुल्या ।
पुत्राने पराक्रमाने श्रीरामे जिंकिले तिला ॥8॥

तच्च रत्नं धनुर्दिव्यं मध्ये भग्न महात्मना।
रामेण हि महाबाहो महत्यां जनसंसदि ॥9॥

पराक्रमी श्रीरामाने जनसमुदायापुढे महान ।
रत्नस्वरूप त्या दिव्य धनुष्या तोडिले मध्ये ॥9॥

अस्मै देया मया सीता वीर्यशुल्का महात्मने।
प्रतिज्ञां तर्तुमिच्छामि तदनुज्ञातुमर्हसि॥10॥

महात्म्यास श्रीरामास प्रदान मम कन्यका ।
प्रतिज्ञा सत्य मम होई अनुज्ञा प्रार्थि आपुली ॥10॥

सोपाध्यायो महाराज पुरोहितपुरस्कृत:।
शीघ्र आगच्छ भद्रंते द्रष्टुमर्हसि राघवौ ॥11॥

पुरोहित गुरु सह शीघ्र येउनि पाहणे ।
श्रीराम लक्ष्मणा दोघां काल्यण आपले असो ॥11॥

प्रतिज्ञां मम राजेन्द्र निवर्तयितुमर्हसि ।
पुत्रयोरुभभयोरेव प्रीतिं त्वमुपलप्स्यसे ॥12॥

राजेन्द्र येथ येऊनी प्रतिज्ञापूर्ति मम करा।
पुत्रद्वय विवाहाचा आनंदहि मिळो तुम्हा ॥12॥

एवं विदेहाधिपतिर्मधुरं वाक्यमब्रवीत।
विश्वामित्राभ्यनुज्ञात: शतानन्दमते स्थित:॥13॥

ऐसा मधुर सन्देश विश्वामित्राज्ञेसह।
शतानन्द सम्मतिने विदेहराज पाठवी ॥13॥

दूतवाक्यं तु तच्छ्रुत्वा राजा परमहर्षित:।
वसिष्ठं वामदेवं च मन्त्रिणश्चैवमब्रवीत ॥14॥

ऐकुनी वाक्य दूताचे राजा अत्यानंदित ।
वसिष्ठ नि वामदेव अन्य मंत्रिगणां वदे ॥14॥

गुप्तः कुशिकपुत्रेण कौसल्यानन्दवर्धनः।
लक्ष्मणेन सह भ्रात्रा विदेहेषु वसत्यसौ ॥15॥

सुरक्षित विश्वामित्रे कौसल्यानन्दवर्धन ।
बन्धु लक्ष्मणासंगे विदेहात आता असे ॥15॥

दृष्टवीर्येषु काकुत्स्थो जनकेन महात्मनः।
सम्प्रदानं सुतायास्तु राघवे कर्तुमिच्छति॥16॥

पाही जनक महात्मा काकुत्स्थाचा पराक्रम ।
विवाह करण्या कन्येचा त्यासवे इच्छितो असे॥16॥

यदि वो रोचते वृत्तं जनकस्य महात्मनः।
सुप्रीतश्चाब्रवीद् राजा श्वो यात्रेति च मन्त्रिणः॥17॥

आपणा जर हे मान्य महात्मा जनकाचिया।
अविलम्ब निघोनीया जाणे मिथिलापुरी ॥17॥

मन्त्रिणो बढमित्याहुः सह सर्वैर्महर्षिभिः।
सुप्रीतश्चाब्रवीद् राजा श्वो यात्रेति च मन्त्रिणः॥18॥

मन्त्री महर्षि म्हणती योग्य हे ऐकुनी तया ।
प्रसन्न राजा बोले उद्याच जावया निघू ॥18॥

मन्त्रिणस्तु नरेन्द्रस्य रात्रिं परमसत्कृता:
ऊषु: प्रमुदिता: सर्वे गुणै: सर्वे समन्विता: ॥19॥

राजाचे सद्गुणी मन्त्री रात्र प्रमुदित मने ।
कल्पनेने प्रयाणाच्या व्यतीत करतात ते ॥19॥

**इति श्रीमद्रामायणे वाल्मिकीये आदिकाव्ये बालकाण्डे अष्टषष्टितम: सर्ग:॥68॥**

# बालकाण्ड सर्ग 69

ततो रात्र्यां व्यतीतायां सोपाध्याय: सबान्धव:।
राजा दशरथो हृष्ट:सुमन्तमिदमब्रवीत ॥1॥

संपता रात्र उपाध्याय बान्धवासह दशरथ ।
आनंदित होऊनी सुमन्त्रास असे म्हणे ॥1॥

अद्य सर्वे धनाध्यक्षा धनमादाय पुष्कलम् ।
व्रजन्वग्रे सुविहिता नानारत्नसमन्विता:॥2॥

कोशाध्यक्षांनी सगळया धन पुष्कळ घेउनी ।
नानारत्ने संपन्न रक्षकांसह सर्वांपुढे ॥2॥

चतुरंगबलं चापि शीघ्रं निर्यातु सर्वशः।
ममाज्ञासमकालं च यानं युग्यमनुत्तमम् ॥3॥

चतुरंग सैन्य तेही निघावे शीघ्र येथुनी ।
आज्ञेवरुनी माझ्या न्यावीत अश्व वाहने ॥3॥

वसिष्ठो वामदेवश्च जाबालिश्च कश्यपः।
मार्कण्डेयस्तु दीर्घायुः ऋषिः कात्यायनस्तथा ॥4॥

एते द्विजाः प्रयान्त्वग्रे स्यन्दनं योजयस्व मे ।
यथा कालात्ययो न स्याद् दूता हि त्वरयन्ति माम् ॥5॥

वसिष्ठ वामदेव जाबालि कश्यपासवे ।
कात्यायन मार्कण्डेय दीर्घायु आणखी तसे ॥4॥
ब्रह्मर्षि पुढती सर्व रथ माझाहि सत्वर ।
करती दूत जनकाचे त्वरा करण्यास प्रेरित ॥5॥

वचनाच्च नरेन्द्रस्य सेना च चतुरंगिणी ।
राजानमृषिभिः सार्धं व्रजन्तं पृष्ठतोऽन्वयात ॥6॥

चतुरंग सेना सज्ज राजाज्ञेने निघोनिया ।
ऋषींसह पुढती राजा तयांमागूनि जातसे ॥6॥

गत्वा चतुरहं मार्गं विदेहानभ्युपेयिवान् ।
राजा च जनकः श्रीमान् श्रुत्वा पूजामकल्पयत् ॥7॥

जाता चार दिवस मार्ग विदेही सर्व पोचती ।
ऐकुनी जनक श्रीमान् स्वागता सज्ज होतसे ॥७॥

ततो राजानमासाद्य वृद्धं दशरथं नृपम् ।
मुदितो जनको राजा प्रहर्षं परमं ययौ ॥8॥

वृद्ध दशरथ राजाच्या जवळी जनक नृप ।
जाता होइ तया हर्ष आनंदे भेटता तयां ॥8॥

उवाच वचनं श्रेष्ठो नरश्रेष्ठं मुदान्वितम्।
स्वागतं ते नरश्रेष्ठ्दिष्ट्या प्राप्तोऽसि राघव ॥9॥

म्हणतसे नृप श्रेष्ठ आनंदित दशरथा ।
आलात हे मम भाग्य असो स्वागत आपले ॥9॥

पुत्रयोरुभयो: प्रीतिं लप्स्यसे वीर्यनिर्जिताम् ।
दिष्ट्या प्राप्तो महातेजा वसिष्ठो भगवानृषि:॥10॥

सह सर्वैर्द्विजश्रेष्ठैर्देवैरिव शतक्रतु: ।

लाभते दोन्ही पुत्रांची प्रीति पराक्रम अर्जित ।
भाग्ये प्राप्त महातेज भगवान वसिष्ठही ॥10॥
शोभती द्विजश्रेष्ठांत इन्द्र देवांसवे जसा ।

दिष्ट्या मे निर्जिता विघ्ना दिष्ट्या मे पूजितं कुलम् ॥11॥
राघवै: सह सम्बंधाद् वीर्यश्रेष्ठैर्महाबलै:।

सौभाग्ये विघ्ने नष्ट संबंधे या कुलासवे॥11॥
राघवकुलसम्बन्धे माझे कुल सन्मानित ।

श्व: प्रभाते नरेन्द्र त्वं संवर्तयितुमर्हसि ॥12॥
यज्ञस्यान्ते नरश्रेष्ठ विवाहमृषिसत्तमै: ॥

उपस्थित नरश्रेष्ठ प्रभाती राहणे उद्या ॥12॥
मुनीसवे यज्ञान्ते विवाह करण्या शुभ ।

तस्य तद्वचनं श्रुत्वा ऋषिमध्ये नराधिप:॥13॥
वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठ: प्रत्युवाच महीपतिम् ।

वचन ऐकुनी जनकाचे संभाषण चतुर दशरथ ॥13॥
मिथिलेश जनकास ऐसे देइ उत्तर ।

प्रतिग्रहो दातृवश: श्रुतमेतन्मया पुरा ॥14॥
यथा वक्ष्यसि धर्मज्ञ तत करिष्यामहे वयम् ।

प्रतिग्रह अधीन दात्याच्या ऐसे ऐकून मी आहे ॥14॥
म्हणून आपण म्हणता तसेच आपण करू ।

तद् धर्मिष्ठं यशस्यं च वचनं सत्यवादिन:॥15॥
श्रुत्वा विदेहापति: परं विस्मयमागत:।

सत्यवादी जनकाच्या वचना धर्मानुकूल जे ॥15॥
ऐकुनी विदेहाधिपति अतिविस्मित होतसे ॥

ततः सर्वे मुनिगणाः परस्परसमागमे ॥16॥
हर्षेण महता युक्तास्तां रात्रिवसन् सुखम्।

मुनिगण त्यानंतर परस्परां सर्व भेटुनी ॥16॥
घालवीती आनंदात रात्र सुख होउनी तदा ।

अथ रामो महातेजा लक्ष्मणेन समं ययौ ॥17॥
विश्वामित्रं पुरस्कृत्य पितुः पादावुपस्पृशन् ।

लक्ष्मणासह श्रीराम विश्वामित्रांच्या मागुनी ॥17॥
पित्याजवळि जाऊन पदस्पर्श करी तया ।

राजा च राघवौ पुत्रौ निशाम्य परिहर्षित:॥18॥
उवास परमप्रीतो जनकेनाभिपूजित:।

पुत्रां पाहूनिया राजा आनंदित स्वीकारुनी ॥18॥
जनकाच्या सत्कारा सुखाने रात्र घालवी ।

जनकोऽपि महातेजा: क्रिया धर्मेण तत्ववित ।
यज्ञस्य च सुताभ्यां च कृत्वा रात्रिमुवास ह ॥19॥

जनक महातेजस्वी यज्ञकार्य करोनिया।
मंगल दो कन्यांचे सम्पादित रात्री सुखी ॥19॥

# इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे एकोनसप्ततितमः सर्गः॥69॥

# बालकाण्ड सर्ग 70

ततः प्रभाते जनकः कृतकर्मा महर्षिभिः ।
उवाच वाक्यं वाक्यज्ञः शतानन्दं पुरोहितम् ॥1॥

प्रभाती महर्षींसह यज्ञकर्म करोनिया ।
पुरोहित शतानन्दा जनक नृप बोलती ॥1॥

भ्राता मम महातेजा वीर्यवानतिधार्मिकः।
कुशध्वज इति ख्यातः पुरीमध्यवसच्छुभाम् ॥2॥

वार्याफलकपर्यन्तां पिबनिक्षुमती नदीम् ।
सांकाश्यां पुण्यसंकाशां विमानमिव पुष्पकौ ॥3॥

पराक्रमी बन्धु माझा तेजस्वी अतिधार्मिक।
राहे कुशध्वज नामे इक्षुमती नदी तीरे ॥2॥
सांकाश्या नगरीमध्ये सुरक्षित सर्व बाजुनी।
पुष्पक यान सदृशा स्वर्गापिरि मनोहर ॥3॥

तमहं द्रष्टुमिच्छामि यज्ञगोप्ता स मे मत:।
प्रीतिं सोऽपि महातेजा इमां भोक्ता मया सह ॥4॥

इच्छितो भेटण्या त्याला यज्ञ संरक्षक तो असे।
घेण्या आनंद कार्याचा यावे त्याने गमे मज ॥4॥

एवमुक्तो तु वचने शतानन्दस्य संन्निधौ।
आगता: केचिद्व्यग्रा जनकस्तान्‌ समादिशत ॥5॥

शतानन्दा बोलता राजा येती काही समीप त्यां ।
पुरुष धीर जनक त्यां पूर्वोक्त इच्छा सांगत ॥5॥

शासनात तु नरेन्द्रस्य प्रययु: शीघ्रवाजिभि:।
समानेतुं नरव्याघ्रं विष्णुमिन्द्राज्ञया यथा ॥6॥

राजाज्ञेने दूत जाती अश्वावर वेगवान।
जणु इन्द्राचे दूत बोलाविण्या विष्णुस॥6॥

सांकाश्यां ते समागम्य ददृशुश्च कुशध्वजम्।
न्यवेदयन् यथावृत्तं जनकस्य च चिन्तितम्॥7॥

सांकाश्या पोचुनी ते भेटुनीया कुशध्वजा।
यथोचित सांगती त्यासी जनकाचे निवेदन॥7॥

तद्वृत्तं नृपतिः श्रुत्वा दूतश्रेष्ठैर्महाजवैः।
आज्ञया तु नरेन्द्रस्य आजगाम कुशध्वज॥8॥

ऐकुनी मिथिलावृत्त सांगती दूत वेगवान ।
कुशध्वज मिथिलेस जनकाज्ञेने येतसे ॥8॥

स ददर्श महात्मानं जनकं धर्मवत्सलं।
सोऽभिवाद्य शतानन्दं जनकं चातिधार्मिकम् ॥9॥
राजार्हं परमं दिव्यमासनं सोऽध्यरोहत ।

तो पाहुनि जनकास महात्मा धर्मवत्सल।
जनकास शतानन्दा प्रणाम उभयां करी ॥9॥

राजास योग्य जे दिव्य करी ग्रहण आसना।

उपविष्टावुभौ तौ तु भ्रातरावमितद्युती ॥10॥
प्रेषयामासतुर्वीरौ मन्त्रि श्रेष्ठं सुदामनम्।
गच्छ मन्त्रिपते शीघ्रमिक्ष्वाकुमतितप्रभम्॥11॥
आत्मजैः सह दुर्धर्षमानयस्य समन्त्रिणम्।

सिंहासनी बसलेल्या तेजस्वी दोन बंधुनी ॥10॥
सुदामन मन्त्रिप्रवरा पाठविले हे सांगुनी।
शीघ्र जाऊनि बोलावी तेजस्वी दशरथा नृपा॥11॥

मन्त्री पुत्रांसह दुर्धर्ष इक्ष्वाकु कुलउत्तमा ।

औपकार्या स गत्वा तु रघूणां कुलवर्धनम् ॥12॥
ददर्श शिरसा चैनमभिवाद्येदमब्रवीत ।

ऐकुनि आज्ञा तो जाई रघूंच्या कीर्तिवर्धना ॥12॥
प्रणाम करि पाहूनी आणि बोले यापरी ।

अयोध्याधिपते वीर वैदेहो मिथिलाधिप: ॥13॥
स त्वां द्रष्टं व्यवसित: सोपाध्यायपुरोहितम् ।

हे अयोध्यापति वीर जनक जे मिथिलापति ॥13॥

सपुरोहित उपाध्याय आपणा भेटु इच्छिती ।

मन्त्रि श्रेष्ठवच: श्रुत्वा राजा सर्षिगणस्तथा ॥14॥
सबन्धुरगमत तत्र जनको यत्र वर्तते ।

ऐकुनी मन्त्री वचना ऋषि आणि बन्धूंसवे ॥14॥
राजा दशरथ जाई स्थानी ज्या जनक स्थित ।

राजा च मन्त्रिसहित: सोपाध्याय: सबान्धव:॥15॥
वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठो वैदेहमिदमब्रवीत ।

मन्त्री उपाध्याय बान्धव यांसह राजा दशरथ ॥15॥

सम्भाषण कुशल तो बोले जनकास असे ।

विदितं ते महाराज इक्ष्वाकुकुलदैवतम् ॥16॥
वक्ता सर्वेषु कृत्येषु वसिष्ठो भगवानृषि: ।

महाराज आपणा ज्ञात इक्ष्वाकुकुलदैवत ॥16॥
वसिष्ठ सर्व कृत्यात आम्हासी मार्गदर्शक ।

विश्वामित्राभ्यनुज्ञात: सह सर्वैर्महर्षिभि:॥17॥
एष वक्ष्यति धर्मात्मा वसिष्ठो मे यथाक्रमम् ।

महर्षींसह विश्वामित्र आज्ञापिति तर सांगती ॥17॥

परम्परा इक्ष्वाकूंची वसिष्ठ ऋषि यथाक्रम ।

तृष्णीभूते दशरथे वसिष्ठो भगवानृषि:॥18॥
उवाच वाक्यं वाक्यज्ञो वैदेहं सपुरोधसम् ।

दशरथे बोलता ऐसे वसिष्ठ पुरोहितांसह ॥18॥
जनका ते वाक्यतज्ञ सांगती योग्य जे असे ।

अव्यक्तप्रभवो ब्रहमा शाश्वतो नित्य अव्यय:॥19॥
तस्मान्मरीचि: संजज्ञे मरीचे: कश्यप: सुत:।
विवस्वान् कश्यपाज्जज्ञे मनुर्वैवस्वत: स्मृत: ॥20॥

ब्रह्मा उत्पत्ति अव्यक्त अविनाशी नित्य शाश्वत ॥१९॥
त्यातून मरीचि उत्पन्न तयाचा पुत्र कश्यप ।
कश्यप विवस्वानास त्याचा वैवस्वत मनु ॥20॥

मनुः प्रजापतिः पूर्वमिक्ष्वाकुश्च मनोः सुतः ।
तमिक्ष्वाकुमयोध्यायां राजानं विद्धि पूर्वकम् ॥21॥

मनु प्रजापति होते इक्ष्वाकु हा तयां सुत ।
इक्ष्वाकूलाच समजावे पहिला अयोध्यानृप ॥21॥

इक्ष्वाकोस्तु सुतः श्रीमान्कुक्षिरित्येव विश्रुतः।
कुक्षेरथात्मज श्रीमान् विकक्षिरुदपद्यत ॥22॥

इक्ष्वाकूस असे पुत्र तेजस्वी कुक्षि नाम त्या।
विकुक्षि नावाचा पुत्र असे कुक्षीस कान्तिमान ॥22॥

विकक्षेस्तु महातेजा बाण: पुत्र: प्रतापवान।
बानस्य तु महातेजा: अनरण्य: प्रतापवान ॥23॥

विकक्षा अतितेजस्वी बाण पुत्र प्रतापवान।
बाणासहि महातेज अनरण्य प्रतापवान ॥23॥

अनरण्यात पृथुर्जज्ञे त्रिशंकस्तु पृथोरपि।
त्रिशंकोरभवत पुत्रो धुन्धुमारो महायशा:॥24॥

अनरण्या पृथु पुत्र त्रिशंकू पृथुचा असे ।
पुत्र होई त्रिशंकूस धुन्धुमार महायश ॥24॥

धुन्धुमारान्महातेजा युवनाश्वो महारथ:।
युवनाश्वसुतश्चासीन्मान्धाता पृथिवीपति: ॥25॥

धुन्धुमारा पुत्र तेजस्वी युवनाश्व महारथी।
युवनाश्वा पुत्र मान्धाता होत जो पृथिवीपती ॥25॥

मान्धातुस्तु सुत: श्रीमान् सुसन्धिरुदपद्यत ।
सुसन्धेरपि पुत्रौ द्वौ ध्रुवसन्धि: प्रसेनजित ॥26॥

मान्धातास असे पुत्र सुसन्धि कान्तिमान जो ।
सुसन्धीसहि दो पुत्र ध्रुवसन्धि प्रसेनजित ॥26॥

यशस्वी ध्रुवसन्धेस्तु भरतो नाम नामतः।
भरतात तु महातेजा असितो नाम जायत ॥27॥

भरत नामे यशस्वी पुत्र जो ध्रुवसन्धिला ।
भरतास महातेज असित नामे आत्मज ॥27॥

यस्यैते प्रतिराजान उदपद्यन्त शत्रवः।
हैहयास्तालजङ्घाश्च शूराश्चशशबिन्दवः॥28॥,

शशबिन्दु,तालजङ्घ हैहय राजवंश हे ।
शत्रुत्व असितासंगे तीन हे करु लागती ॥28॥

तांश्च स प्रतियुद्धन् वै युद्धे राजा प्रवासित:।
हिमवन्तमुपागम्य भार्याभ्यां सहितस्तदा ॥29॥

त्यांच्याशी करता युद्ध असित प्रवासी बने।
राण्यांसह राहू लागे येउनीया हिमालयी ॥29॥

असितोऽल्पबलो राजा कालधर्मुपेविवान् ।
दे चास्य भार्ये गर्भिण्यौ बभूवतुरिति: श्रुति:॥30॥

सेना अल्प उरे तेव्हां तोही मृत्युमुखी पडे।
गर्भवती दोन्ही राण्या होत्या ऐकिवात ते ॥30॥

एका गर्भविनाशार्थ सपत्न्यै सगरं ददौ।

एक राणी विष देई गर्भनाशार्थ सवतिला ॥30॥

ततः शैलवरे रम्ये बभूवाभिरतो मुनिः॥31॥
भार्गवश्चवनो नाम हिमवन्तमुपाश्रितः।
तत्र चैका महाभागा भार्गवं देववरचसम ॥32॥
ववन्दे पद्मपत्राक्षी काक्षती सुतमुत्तमम।

तमृषीं साभ्युपागम्य कालिन्दी चाभ्यवादयत॥३३॥

त्या पर्वतावरी रम्य च्यवन भृगुकुलातिल ॥31॥
मुनि तपस्या करती आश्रमात हिमालयी
कमलदलसदृष्य नेत्र कालिन्दीस त्या॥32॥
व्हावा उत्तम पुत्र म्हणुनी वन्दे जाउनी ।
भृगुनन्दन च्यवना त्या ऋषीप्रति आदरे ॥33॥

स तामभ्यवदत विप्रं पुत्रेप्सुं पुत्रजन्मनि।
तव कुक्षौ महाभागे सुपुत्रः सुमहाबलः॥34॥

महावीर्यो महातेजा अविरात संजनिष्यति।
गरेण सहित: श्रीमान् मा शुच: कमलाक्षणे॥35॥

पुत्राकांक्षी कालिंदीस वदती हे पुत्रकांक्षिणी ।
सुपुत्र उदरी तुझिया तेजस्वी बलवान् असे॥34॥
विषसहित महावीर जन्मेल जो लवकरी ।
कमललोचने चिन्ता न करी त्या विषयात तू ॥35॥

च्यवनं च नमस्कृत्य राजपुत्री पतिव्रता ।
पत्या विरहिता तस्मात पुत्रं देवी व्यजायत ॥36॥

वन्दुनी च्यवना पुन्हा राजपत्नी पतिव्रता।
पतीविन योग्यकाली तिजला पुत्र होतसे ॥36॥

सपत्न्या तु गरस्तस्यै दत्तो गर्भजिघांसया।
सह तेन गरेणैव संजात: सगरोऽभवत ॥37॥

पचवुनी गर्भहत्येचे विष जन्मे तयासह ।
त्यामुळे सगर या नामे राजपुत्र विख्यात तो ॥37॥ गर म्हणजे विष

सगरस्यासमञ्जस्तु असमञ्जादथांशुमान् ।
दिलीपोऽशुमत: पुत्रो दिलीपस्य भगीरथ:॥38॥

असमञ्ज सगरास असमञ्जास अंशुमान ।
दिलीप पुत्र तयाचा दिलीपास भगीरथ ॥38॥

भगीरथात ककुत्स्थश्च ककुस्थाच्च रघुस्तथा।
रघोस्तु पुत्रतेजस्वी प्रवृद्धः पुरुषादकः॥39॥

भगीरथास ककुत्स्थ ककुत्स्थास महान रघु ।
रघूस पुत्र तेजस्वी प्रवृद्ध पुरुषादक ॥39॥

कल्माषपादोऽप्यभवत तस्माज्जास्तु शङ्खणः।
सुदर्शनः शङ्खणस्य अग्निवर्णः सुदर्शनात ॥40॥

कल्माषपाद प्रसिद्ध त्याचा पुत्र शंखण ।
सुदर्शन शंखणास अग्निवर्ण सुदर्शना ॥40॥

शीघ्रगस्त्वग्निवर्णस्य शीघ्रगस्य मरु: सुत:।
मरो: प्रशुश्रुकस्त्वासीदम्बरीष: प्रशुश्रुकात ॥41॥

शीघ्रग अग्निवर्णास शीघ्रगा पुत्र हो मरु ।
प्रशुश्रुक हो मरूला अम्बरीष तया असे ॥41॥

अम्बरीषस्य पुत्रोऽभून्नहुषश्च महीपति:।
नहुषस्य ययातिस्तु नाभागस्तु ययातिज:॥42॥

नाभागस्य बभूवाज अजाद् दशरथोऽभवत ।
अस्माद् दशरथाज्जातौ रामलक्ष्मणौ ॥43॥

नहुष अम्बरीषास पुत्र होत महीपति ।
नहुषास ययाति त्या नाभाग पुत्र होतसे॥42॥
अज हा नाभागास अजाचा पुत्र दशरथ ।
दशरथाचे त्या दोन रामलक्ष्मण पुत्र हे ॥43॥

आदिवंशविशुद्धानां राज्ञां परमधर्मिणां ।
इक्ष्वाकुकुलजातानां वीराणां सत्यवादिनाम् ॥44॥

असा इक्ष्वाकूंचा वंश विशुद्ध परमधार्मिक।
आदिकालापासून ते वीर सत्यवादी तसे ॥44॥

रामलक्ष्मणयोरर्थे त्वत्सुते व्ररये नृप:।
सदृशाभ्यां नरश्रेष्ठ सदृशौ दातुमर्हसि ॥45॥

रामालक्ष्मणांसाठी कन्या तव दोन मागतो ।
योग्य हे कन्यांसाठी योग्य कन्याही त्यांस्तव॥45॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे सप्ततितम: सर्ग:।**

# बालकाण्ड सर्ग 71

एवं ब्रुवाणं जनकः प्रत्युवाच कृताञ्जलिः।
श्रोतुमर्हसि भद्रं ते कुलं नः परिकीर्तितम् ॥1॥
प्रदाने हि मुनिश्रेष्ठ कुलं निरवशेषतः।
वक्तव्यं कुलजातेन तन्निबोध महामते:॥2॥

त्यांचे वचन ऐकून झाल्यावर हात जोडुनी ।
म्हणे जनक ऐकावा कुलपरिचय आमुचा ॥1॥

कन्यादानसमयी योग्य सांगणे मुनिश्रेष्ठ ते ।
पूर्ण परिचय कुलाचा कृपया ऐका त्यास्तव ॥2॥

राजाभूत् त्रिषु लोकेषु विश्रुत: स्वेन कर्मणा।
निमि: परमधर्मात्मा सर्वसत्त्ववतां वर:॥3॥

निमि नामक धर्मात्मा श्रेष्ठ सत्वशीलामध्ये ।
राजा तो असे विख्यात स्वकर्मे लोकी तिन्ही ॥3॥

तस्य पुत्रो मिथिर्नाम जनको मिथिपुत्रक:।
प्रथमो जनको राजा जनकादप्युदावसु:॥4॥

मिथि नामे तया पुत्र जनक त्यास पुत्र जो।
पहिला जनक तोच त्याचा पुत्र उदावसु ॥4॥

उदावसोस्तु धर्मात्मा जातो वै नन्दिवर्धन: ।
नन्दिवर्धसुत: शूर: सुकेतुर्नाम नामत: ॥5॥

उदावसाला धर्मात्मा नन्दिवर्धन होतसे।
नन्दिवर्धनास असे शूर पुत्र नामे सुकेतु जो ॥5॥

सुकेतोरपि धर्मात्मा देवरातो महाबल:।
देवरातस्य राजर्षे: बृहद्रथ इति स्मृत:॥6॥

सुकेतुलाहि धर्मात्मा देवरात पराक्रमी ।
राजर्षिचा त्या पुत्र बृहद्रथ प्रसिद्ध जो ॥6॥

बृहद्रथस्य शूरोऽभून्महावीरः प्रतापवान्।
महावीरस्य धृतिमान्सुधृतिः सत्यविक्रमः॥7॥

बृहद्रथास महावीर शूर आणि पराक्रमी ।
महावीरा धैर्यवान सत्यविक्रम सुधृति ॥7॥

सुधृतेरपि धर्मात्मा धृष्टकेतुः सुधार्मिकः।
धृष्टकेतोश्च राजर्षेर्हर्यश्व इति विश्रुतः॥8॥

धृष्टकेतु सुधृतिला धर्मात्मा पुत्र होतसे।
त्याचा पुत्र हर्यश्व नामे विख्यात होतसे ।।8।।

हर्यश्वस्य मरुः पुत्रो मरोः पुत्रः प्रतीन्धकः।
प्रतीन्धकस्य धर्मात्मा राजा कीर्तिरथः सुतः।।9।।

हर्यश्वास मरु पुत्र त्याचा पुत्र प्रतीन्धक।
प्रतीन्धकास धर्मात्मा कीर्तिरथ पुत्र नृप।।9।।

पुत्र कीर्तिरथस्यापि देवमीढ इति स्मृतः।
देवमीढस्य विबुधो विबुधस्य महीध्रकः।।10।।

सुपुत्र कीर्तिरथाचा देवमीढ नामे असे ।
विबुध देवमीढास विबुधास महीध्रक ॥10॥

महीध्रकसुतो राजा कीर्तिरातो महाबल:।
कीर्तिरातस्य राजर्षेर्महारोमा व्यजायत ॥11॥

महीध्रकपुत्र राजा कीर्तिरात महाबली ।
महारोम असे पुत्र कीर्तिराज राजर्षिला॥11॥

महारोम्णस्तु धर्मात्मा स्वर्णरोमा व्यजायत।
स्वर्णरोम्णस्तु राजर्षेर्ह्रस्वरोमा व्यजायत ॥12॥

महारोमास धर्मात्मा स्वर्णरोमा असे सुत।
स्वर्णरोमास राजर्षि ऱ्हस्वरोमा असे सुत ॥12॥

तस्य पुत्रद्वयंराज्ञो धर्मज्ञस्य महात्मन:।
ज्येष्ठोऽहमनुजो भ्राता मम विर: कुशध्वज: ॥13॥

महात्मा धर्मज्ञ जो त्यास पुत्रद्वय होतसे ।
ज्यातील ज्येष्ठ आहे मी बन्धू मम कुशध्वज ॥13॥

मां तु ज्येष्ठं पिता राज्ये सोऽभिषिच्य पिता मम ।
कुशध्वजं समावेश्य भारं मयि वनं गत:॥14॥

मजला ज्येष्ठ म्हणुनी अभिषेक करूनी पिता।
सोपवूनी कुशध्वजा मजवरी जातसे वनी ॥14॥

वृद्धे पितरि स्वर्याते धर्मेण धुरमावहम् ।
भ्रातरं देवसंकाशं स्नेहात् पश्यन् कुशध्वजम् ॥15॥

स्वर्गवासि पिता होता देवतुल्य बन्धुस मम ।
स्नेहे पाहत राज्याचा भार धर्मे वाहतो ॥15

कस्यचित्वथ कालस्य सांकाश्यादागत: पुरात् ।
सुधन्वा वीर्यवान् राजा मिथिलामवरोधक ॥16॥

कालानंतर काही सांकाश्यातून येउनी ।
पराक्रमी सुधन्व्याने मिथिला नगरी वेढली ॥16॥

स च मे प्रेषयामास शैवं धनुरनुत्तमम् ।
सीता च कन्या पद्माक्षी मह्यं वै दीयतामिति ॥17॥

दूत पाठवुनी त्याने शिवधनुष्य उत्तम ।
तशी पद्माक्षी कन्या सीता मागितली मला ॥17॥

तस्याप्रदानान्महर्षे युद्धमासीन्मया सह ।
स हतोऽभिमुखो राजा सुधन्वा तु मया रणे॥18॥

मागणी मान्य ना केली त्यामुळे युद्ध जाहले ।
समोर करता युद्ध वधिला मी तया रणी ॥18॥

निहत्य तं मुनिश्रेष्ठ सुधन्वानं नराधिपम् ।
सांकाश्ये भ्रातरं शूरमभ्यषिञ्चं कुशध्वजम् ॥19॥

वधुनी त्या मुनिश्रेष्ठ सांकाश्यी कुशध्वजा ।
शूरवीर भ्रात्या केला नगरी अभिषेक त्या ॥19॥

कनीयानेष मे भ्राता अहं ज्येष्ठो महामुने ।
ददामि परमप्रीतो वध्वौ ते मुनिपुङ्गव ॥20॥

बन्धु हा कनिष्ठ माझा ज्येष्ठ मी हे महामुनी ।
आपणास वधू दोन आनंदे करि प्रदान मी ॥20॥

सीता रामाय भद्रं ते उर्मिला लक्ष्मणाय वै।
वीर्यशुल्का मम सुतां सीतां सुरसुतोपमाम्॥21॥
द्वितीयामूर्मिलां चैव त्रिर्वदामि न संशयः।
ददामि परमप्रीतो वध्वो ते मुनिपुङ्गव ॥22॥

कल्याण तव देतो मी सीता जी देवकन्यका ।
तशी जी वीर्यशुल्काही रामास दिधली मया ॥21॥

लक्ष्मणा उर्मिला दुसरी त्रिवार म्हणतो असे ।
प्रसन्नचित्ते देतो वधूंना मुनिपुङ्गव ॥22॥

रामलक्ष्मणो राजन् गोदानं कारयस्व ह ।
पितृकार्यंच भद्रं ते ततो वैवाहिकं कुरु ॥23॥

वसिष्ठा म्हणुनी ऐसे जनका दशरथ वदे
श्रीराम लक्ष्मण यांना गोदान करण्या सांगणे ।
श्राद्धकार्यहि आटोपून विवाह कार्य सुरू करा ॥23॥

मघा ह्यद्य महाबाहो तृतीयदिवसे प्रभो।

फल्गुन्यामुत्तरे राजेस्तस्मिन् वैवाहिकं कुरु ।
रामलक्ष्मणयोरर्थे दान कार्य सुखोदयम् ॥24॥

मघा नक्षत्र आज तीन दिवसानंतर ।
उत्तराफाल्गुनि नक्षत्रे वैवाहिक कार्य ते करा ।
रामलक्ष्मण कल्याणा करा दान सुखास्तव ॥24॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे एकसप्ततितमः सर्गः॥71॥**

# बालकाण्ड सर्ग 72

तमुक्तवन्तं वैदेहं विश्वामित्रो महामुनि:।
उवाच वचनं वीरं वसिष्ठसहितो नृपम् ॥1॥

म्हणता असे वैदेह विश्वामित्र वसिष्ठहि ।
महामुनि ते दोघे नृपवीरास बोलती ॥1॥

अचिन्त्यान्यप्रमेयाणि कुलानि नरपुङ्गव ।
इक्ष्वाकूणां विदेहानां नैषा तुलोऽस्ति कश्चन ॥2॥

इक्ष्वाकु आणि वैदेह अनुपम्य दोन्ही कुळे
तुल्यबल कुळां दोन्ही राजवंश कुणी नसे ॥2॥

सदृशो धर्मसंबंधः सदृशो रूपसंपदा ।
रामलक्ष्मणयोः राजन् सीता चोर्मिलया सह ॥3॥

धर्मसंबंध हा योग्य सुयोग्य रूपवैभवे ।
रामलक्ष्मणा योग्य सीता ही उर्मिलेसह ॥3॥

वक्तव्यं च नरश्रेष्ठ श्रूयतां वचनं मम।
भ्राता यवीयान् धर्मज्ञ एष राजा कुशध्वजः॥4॥

अस्य धर्मात्मनो राजन् रूपेणाप्रतिमं भुवि।
सुताद्वयं नरश्रेष्ठ पत्न्यर्थं वरयामहे॥5॥
भरतस्य कुमारस्य शत्रुघ्नस्य च धीमतः।
यस्ये ते सुते राजंस्तयोरर्थे महात्मनौ ॥6॥

सांगणे आणखी काही मला ऐका नरोत्तमा ।
आपला बन्धु धर्मज्ञ जवळी जो कुशध्वज ॥4॥
राजास या धर्मात्मा रूपे अप्रतिम भूवरी ।
कन्या दोन नरश्रेष्ठा पत्निरूपे मागतो तयां ॥5॥

कुमार भरतासंगे शत्रुघ्नहि बुद्धिमान ।
द्या दोघांसाठि दोघींना नरश्रेष्ठा म्हणूनिया ॥6॥

पुत्रा दशरथस्येमे रूपयौवनशालिन:।
लोकपालसमा: सर्वे देवतुल्य पराक्रमा:॥7॥

पुत्र हे दशरथाचे रूप यौवनसंपन्न ।
लोकपालासम तेजस्वी देवतातुल्य पराक्रमी ॥७॥

उभयोरपि राजेन्द्र सम्बधेनानुबध्यताम ।
इक्ष्वाकुकुलमव्यग्रं भवत: पुण्यकर्मण:॥8॥

दोघांस देऊनी कन्या राजेन्द्र इक्ष्वाकुकुळी।
जोडुनि संबंध चिंता मनी न येउद्या अशी ।
की सम्राटासह चार संबंध अवघड राखणे ॥8॥

विश्वामित्रवच: श्रुत्वा वसिष्ठस्य मते तदा ।
जनक: प्राञ्जलिर्वाक्यमुवाच मुनिपुङ्गवौ ॥9॥

सम्मतीने वसिष्ठांच्या जनक हात जोडुनी ।
वचना विश्वामित्राच्या ऐकुनी उभयां वदे ॥9॥

कुलं धन्यमिदं मन्ये येषां तौ मुनिपुङ्गवौ ।
सदृशं कुलसंबन्धं यदाज्ञापयत: स्वयम् ॥10॥

कुल धन्य होतसे माझे ज्यांचे आपण मुनिवर ।
संबंध जोडण्यासाठी मज आज्ञापिती स्वत: ॥10॥

एवं भवतु भद्रं व: कुशध्वजसुते इमे ।
पत्नौ भजेतां सहितौ शत्रुघ्नभरतावुभौ ॥11॥

होवो तसेच एकत्र सदा भरतशत्रुघ्न जे ।
कुशध्वजकन्याकांना भार्यारूपे स्वीकारती ॥11॥

एकाला राजपुत्रीणां चतसृणां महामुने ।
पाणीन् गृहन्तु चत्वारो राजपुत्रो महाबला:॥12॥

राजपुत्र चौघे शूर चार राजकन्यांसवे ।
एकाच दिनि व्हावेत विवाहबद्ध त्यांसवे ॥12॥

उत्तरे दिवसे ब्रह्मन् फल्गुनीभ्यां मनीषिण: ।
वैवाहिकं प्रशंसन्ति भगो यत्र प्रजापति:॥13॥

असे फाल्गुनि नक्षत्र दोन पुढच्या दिनी ।
नक्षत्र देव अर्यमा दिन लग्नास उत्तम ॥13॥

एवमुक्त्वा वच: सौम्यं प्रत्युत्थाय कृताञ्जलि:।
उभौ मुनिवरौ राजा जनको वाक्यमब्रवीत ॥14॥

वचना मधु बोलून उठुनी जनक उभे ।
दोन्ही मुनिवरां हात जोडुनी बोलती असे ॥14॥

परो धर्मः कृतो मह्यं शिष्योऽस्मि भवतीस्तथा ।
इमान्यासनमुख्यानि आस्यतां मुनिपुङ्गवौ ॥15॥

मजसाठि धर्मकार्य केले आपण शिष्य मी ।
मुनीवरा उभयांचा, करा ग्रहण आसना ॥15॥

यथा दशरथस्येयं तयायोध्या पुरी मम।
प्रभुत्वे नास्ति संदेहो यथार्ह कर्तुमर्हसि ॥16॥

दशरथाच्या अयोध्येसम मम पुरि आपणा ।
अधिकार आपणा पूर्ण आवश्यक करण्यास्तव ॥16॥

तथा ब्रुवति वैदेहे जनके रघुनन्दनः।
राजा दशरथो हृष्टः प्रत्युवाच महीपतिम् ॥17॥

बोलता जनके ऐसे रघुकुलश्रेष्ठ दशरथ ।
मिथिलापतीस ऐसे वदती प्रसन्न होउन ॥17॥

युवामसंख्येयगुणौ भ्रातरौ मिथिलेश्वरौ ।
ऋषयो राजसङ्घाश्च भवद्भ्यामभिपूजितम् ॥18॥

गुण असंख्य मिथिलेश बंधूंचे दोन आपणा।
ऋषीं व राजसंघांस योग्य सत्कारिले तुम्ही ॥18॥

स्वस्ति प्राप्नुहि भद्रंते गमिष्याम: स्वमालयम्।
श्राद्धकर्माणि विधिवद्विधास्य इति चाब्रवीत ॥19॥

कल्याण चिन्तुनी तुम्हा निघतो स्वनिवासाप्रति।
जाउनी नांदिमुखश्राद्ध करू संपन्न ऐसे वदे॥19॥

तमापृष्ट्वा नरपतिं राजा दशरथस्तदा।
मुनीन्द्रौ तौ पुरस्कृत्य जगामाशु महायशा:॥20॥

अनुमतीने जनकाच्या विश्वामित्र वसिष्ठांसवे ।
महायशस्वी दशरथ जातसे स्वनिवासाकडे ॥20॥

स गत्वा निलयं राजा श्राध्दं कृत्वा विधानत:।
प्रभाते काल्यमुत्थाय चक्रे गोदानमुत्तमम् ॥21॥

निवासी जाउनि राजा विधिवत् श्राद्ध करीतसे ।
प्रात:कालि करी तैसे गोदान उत्तम कर्मही ॥21॥

गवां शतसहस्रं च ब्राह्मणेभ्यो नराधिप:।
एकैकशो ददौ राजा पुत्रानुद्दिश्य धर्मत: ॥22॥

लक्षावधि गाई दान ब्राह्मणांना नराधिप।
प्रत्येक पुत्रास्तव दे धर्मपूर्वक तो नृप ॥22॥

सुवर्णशृंग्य: सम्पन्ना: सवत्सा: कांस्यदोहना:।
गवां शतसहस्राणि चत्वारि पुरुषर्षभ:॥23॥
वित्तमन्यच्च सुबहु द्विजोभ्यो रघुनन्दन:।
ददौ गोदानमुद्दिश्य पुत्राणां पुत्रवत्सल:॥24॥

सवत्स दुभत्या ज्यांची शिंगे सुवर्णमंडित ।
चार लक्ष अश्या गाई करी दान पुरुषर्षभ ॥23॥

आणखी पुष्कळ द्रव्य गोदानास्तव देतसे ॥
पुत्रांस्तव करी दान रघुवीर पुत्रवत्सल ॥24॥

स सुतैः कृतगोदानैर्वृतः सन्नृपतिस्तदा ।
लोकपालैरिवाभाति वृतः सौम्यः प्रजापतिः ॥25॥

पुत्र गोदान केलेले लोकपालहि त्यांसवे ।
राजा आवृत्त सर्वांनी प्रजापति सम शोभित ॥25॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे द्विसप्ततितमः सर्गः॥72॥**

# बालकाण्ड सर्ग 73

यस्मिंस्तु दिवसे राजा चक्रे गोदानमुत्तमम् ।
तस्मिंस्तु दिवसे वीरो युधाजित्समुपेयिवान् ॥1॥
पुत्रः केकयराजस्य साक्षाद्भरत मातुलः।
दृष्ट्वा पृष्ट्वा च कुशलं राजानमिदमब्रवीत ॥2॥

गोदान ज्यादिनि राजा दशरथ करीतसे ।
उपस्थित त्या दिवशी युधाजित वीर होतसे ॥1॥

पुत्र केकयराजाचा भरता साक्षात मातुल ।
राजास भेटुनी कुशल विचारूनि म्हणे तया ॥2॥

केकयाधिपती राजा स्नेहात् कुशलमब्रवीत् ।
येषां कुशलकामोऽसि तेषां सम्प्रत्यनामयम् ॥3॥
स्वस्रीयं मम राजेन्द्र द्रष्टकामो महीपतिः।
तदर्थमुपयातोऽहमयोध्यां रघुनन्दन ॥4॥

केकयाधिपती आपले पुसुनी कुशल त्यासवे ।
आपणास आमचेही कुशल आहे कळविले ॥3॥

भाच्यास मम भेटावे इच्छा झाल्यामुळे तयां ।
अयोध्येस आलो होतो नेण्यासाठि तयास मी ॥4॥

श्रुत्वा त्वहमयोध्यायां विवाहार्थं तवात्मजम् ।
मिथिलामुपयातांस्तु त्वया सह महीपते ॥5॥
त्वरयाभ्युपयातोऽहं द्रष्टकाम: स्वसु: सुतम् ।

ऐकुनी सर्व पुत्रांच्या विवाहास्तव घेउनी ।
त्यांच्यासवे मिथिलेस आला आहात आपण ॥5॥
त्वरेने इकडे आलो पहाण्या भगिनीसुता ।

अथ राजा दशरथ: प्रियातिथिमुपस्थितम ॥6॥
दृष्ट्वा परमसत्कारै: पूजनार्हमपूजयत ।

अतिथि प्रिय आलेले राजा दशरथ पाहुनी ॥6॥
सत्कार करी योग्य त्यांचा सत्कारणीय जे ।

ततस्तामुषितो रात्रिं सह पुत्रैर्महात्मभि: ॥7॥
प्रभाते पुनरुत्थाय कृत्वा कर्माणि तत्ववित ।
ऋषींस्तदा पुरस्कृत्य यज्ञवाटमुपागतम ॥8॥

पुत्रांसवे सद्गुणी नरेश रात्र काढुनि ॥7॥

प्रात:कालि उठोनीया नित्यकर्मे करोनिया ।
ऋषींच्या मागुनिया ते यज्ञशाला प्रवेशती ॥8॥

युक्ते मुहूर्ते विजये सर्वाभरणभूषितै: ।
भ्रातृभि: सहितो राम: कृतकौतुकमंगल:॥9॥
वसिष्ठं पुरत: कृत्वा महर्षीनपरानपि ।
वसिष्ठो भगवानेत्य वैदेहमिदमब्रवीत ॥10॥

विजय नाम मुहूर्त विवाहासाठि योग्य जो।
वेषभूषा अलंकार वरा योग्य करोनिया ॥9॥

राजा दशरथो राजन् कृतकौतुकमंगलैः।
पुत्रैर्नरवर श्रेष्ठो दातारमभिकाङ्क्षते ॥11॥

विवाहपूर्व विधिसंपन्न राम बन्धुंसवे तिथे।
वसिष्ठ ऋषिगण तैसे मंडपात उपस्थित ।
वसिष्ठ जनकापाशी जाउनी वदती तया ॥10॥

राजा दशरथ येती पुत्रांसह करोनिया ।
विवाहपूर्व विधि संपन्न प्रतीक्षा करतात ते ।
आपल्या आदेशाची मंडपात प्रवेशिण्या ॥11॥

दातृप्रतिग्रहीतृभ्यां सर्वार्था: सम्भवन्ति हि।
स्वधर्मे प्रतिपद्यस्य कृत्वा वैवाह्यमुत्तमम् ॥12॥

दाता घेता संयोगेही दान सम्पन्न होतसे ।
शुभकर्मे अनुष्ठून कन्यादानास बोलवा ॥12॥

इत्युक्त: परमोदारो वसिष्ठेन महात्मना ।
प्रत्युवाच महातेजा वाक्यं परमधर्मवित ॥13॥

परमोदार महात्मा वसिष्ठे बोलता असे ।
महातेजस्वी धर्मज्ञ राजा जनक उत्तरे ॥13॥

क: स्थित: प्रतिहारो मे कस्याज्ञां सम्प्रतीक्षते ।
स्वगृहे को विचारोऽस्ति यथा राज्यमिदं मम ॥14॥
कृतकौतुकसर्वस्वा वेदिमूलमुपागता:।
मम कन्या मुनिश्रेष्ठ दीप्ता बढेरिवार्चिष:॥15॥

आडकाठी कुठे त्यांना कशास्तव आज्ञा हवी।
आपल्याच घरी येण्या मम राज्यही आपले॥14॥
कृत्यसंपन्न मम कन्या यज्ञवेदीप्रति स्थित ।
प्रकाशित असती होत प्रदीप्त अग्निशिखांपरी ॥15॥

सद्योऽहं त्वत्प्रतीक्षोऽस्मि वेद्यामस्यां प्रतिष्ठित:।
अविनं क्रियतां सर्वं किमर्थं हि विलम्ब्यते ॥16॥

आपल्याच प्रतीक्षेत वेदीवर बैसलो आहे।
करावे पूर्ण निर्विघ्न अविलम्बे कार्य सिद्ध हे॥16॥

तद् वाक्यं जनकेनोक्तं श्रुत्वा दशरथस्तदा ।
प्रवेशयामास सुतान् सर्वानृषीगणानपि ॥17॥

ऐकुनी वाक्य जनकाचे प्रवेशत दशरथ ।
ऋषिगणांसह सर्व पुत्रां घेऊनि मंडपी ॥17॥

ततो राजा विदेहानां वसिष्ठमिदमब्रवीत ।
कारयस्व ऋषे सर्वामृषिभि: सह धार्मिक ॥18॥
रामस्य लोकरामस्य क्रियां वैवाहिकी प्रभो ।

तेव्हां विदेहराज, वसिष्ठां विनवती असे ।
ऋषींना सह घेऊन लोकाभिराम रामाचे ॥18॥
विवाह कार्य सम्पूर्ण न्यावे सिद्धीस हे प्रभो ।

तथेत्युक्त्वा तु जनकं वसिष्ठो भगवानृषि:॥19॥
विश्वामित्रं पुरस्कृत्य शतानन्दं च धार्मिकम् ।

प्रपामध्ये तु विधिवत् वेदिं कृत्वा महातपाः॥20॥
अलंचकार तां वेदिं गन्धपुष्पैः समन्ततः।
सुवर्णपालिकामिश्च चित्रकुम्भैश्च साङ्करैः॥21॥
अङ्कराढ्यै शरावैश्च धूपपात्रैः सधूपकैः।
शङ्खपात्रैः स्रुवैः स्रग्भिः पात्रैरादिपूजितैः॥22॥
लाजपूर्णैश्च पात्रीभिरक्षतैरपि संस्कृतैः।
दर्भैः समैः समास्तीर्य विधिवन्मन्त्रपूर्वकम् ॥23॥
अग्निमाधाय तं वेद्यां विधिमन्त्रपुरस्कृतम् ।

जुहावाग्नौ महातेजा वसिष्ठो मुनिपुङ्गव:॥24॥

जनकास देत होकार भगवान् वसिष्ठ ऋषि ॥19॥
विश्वामित्र शतानन्दा घेउनिया बरोबरी ।
मन्डपाच्या मधोमध्ये विधिवत् रचति वेदिस ॥20॥
वेदीस गन्धपुष्पे त्या सजवती सर्व बाजुनी ।
सुवर्णपालिका तैसे चित्रकुम्भांकुरासह॥21॥
परळ अंकूरयुक्त धूपपात्रे धुपासह ।
शङ्खपात्रे स्त्रुवा दर्व्या युक्त अर्घ्यादिके तसे ॥22॥

लाह्यांनी भरली पात्रे अक्षता योग्य मंत्रुनी ।
ठेउनी दर्भ बाजूंनी मन्त्रोच्चार करूनिया ॥23॥
अग्नि स्थापित वेदीत वसिष्ठ विधिपूर्वक ।
प्रज्वलित अग्नीमध्ये करिती हवन महामुनी ॥24॥

ततः सीता समानीय सर्वाभरणभूषिताम् ।
समक्षमग्ने संस्थाप्य राघवाभिमुखे तदा ॥25॥
अब्रवीज्जनको राजा कौसल्यानन्दवर्धनम् ।
इयं सीता मम सुता सहधर्मचरी तव ॥26॥

प्रतीच्छ चैनां भद्रं ते पाणिं गृहीष्व पाणिना ।
पतिव्रता महाभागा छायेवानुगता सदा ॥27॥

सर्वाभूषण मंडीत मग सीतेस आणुनी ।
रामापुढे अग्निसाक्ष बसवी जनकनृप ॥25॥
रामास म्हणती आणि कौसल्यानन्दवर्धन।
सीता ही कन्यका माझी आता तव सहचारिणी ॥26॥
स्वीकारूनि तिला हात तिचा हातात घे तुझ्या ।
पतिव्रता महाभागा छायेसम अनुसरी तुज ॥27॥

इत्युक्त्वा प्राक्षिपत राजा मन्त्रपूतं जलं तदा ।
साधुसाध्विति देवानामृषीणां वदतां तदा ॥28॥

असे म्हणुनिया सोडी पवित्र संकल्पजल ।
धन्य धन्य असे देव ऋषीहि वदती तदा ॥28॥

देवदुन्दुभिनिर्घोषः पुण्यवर्षो महानभूत ।
एवं दत्वा सुतां सीतां मन्त्रोदकपुरस्कृताम ॥29॥
अब्रवीज्जनको राजा हर्षेणाभिपरिप्लुतः।
लक्ष्मणागच्छ भद्रं ते उर्मिलामुद्यतां मया ॥30॥

प्रतीच्छ पाणिं गृहीष्व मा भूत् कालस्य पर्यय: ।

नौबती झडति देवांच्या पुष्पवृष्टि नभातुनी ।
मन्त्रोदक पुरस्कारे सीता देउनि राघवा ॥29॥
राजा जनक आनंदे म्हणे लक्ष्मणा असे।
लक्ष्मणा तव कल्याण उर्मिला तुज अर्पितो ॥30॥
अविलंबे तिचा हात आपल्या हाति घेशि तू ।

तमेवमुक्त्वा जनको भरतं चाभ्यभाषत ॥31॥
गृहाण पाणिं माण्डव्या: पाणिना रघुनन्दन ।

शत्रुघ्नं चापि धर्मात्मा अब्रवीन्मिथिलेश्वर: ॥32॥
श्रुतकीर्तेर्महाबाहो पाणिं गृहीष्व पाणिना ।
सर्वे भवन्त: सौम्याश्च सर्वे सुचरितात्रता:॥33॥
पत्नीभि: सन्तु काकुत्स्था मा भूत् कालस्य पर्यय:।

म्हणुनी त्याला ऐसे भरतास जनक म्हणे॥31॥
हात माण्डविचा हाती आपुल्या घे रघुनन्दना ।

शत्रुघ्नासहि धर्मात्मा म्हणे मिथिलेश्वर ॥32॥
करी तू श्रुतकीर्तिचे पाणिग्रहण महाविरा ।

सुस्वभावी तुम्ही सर्व पवित्र आचरणे तसे ॥33॥
काकुत्स्थानो स्वीकारा अविलम्बे स्वपत्निस ।

जनकस्य वच: श्रुत्वा पाणीन् पाणिभिरस्पृशन् ॥34॥
चत्वारस्ते चतसृणां वसिष्ठस्य मते स्थिता:।
अग्निं प्रदक्षिणं कृत्वा वेदिं राजानमेव च ॥35॥
ऋषींश्चापि महात्मान: सहभार्या रघूद्वहा:।
यथोक्तेन ततश्चक्रुर्विवाहं विधिपूर्वकम् ॥36॥

जनक वचना ऐकून राजपुत्र वसिष्ठांपुढे ।

चारही चारजणींच्या हाती हात मिळवुनी॥34॥
प्रदक्षिणा घालताती अग्नी वेदी नृपांसवे ॥35॥
ऋषींनाही घालुनिया विवाहविधि यथोचित ।
पूर्ण करुनी होति ते विधिपूर्वक विवाहित ॥36॥

पुष्पवृष्टिर्महत्यासीदन्तरिक्षात् सुभास्वरा ।
दिव्यदुन्दुभिनिर्घोषगीतवादित्रनि:स्वनै:॥37॥
ननृतुश्चाप्सर:संघ्या गन्धर्वाश्च जगु: कलम्।
विवाहे रघुमुख्यानां तदद्भुतमदृश्यत ॥38॥

पुष्पवृष्टि नभातूनी होतसे प्रेक्षणीय ती ।
दुन्दुभींचा ध्वनी दिव्य वाद्यांचा मधु घोषही ॥37॥
करती अप्सरा नृत्य गन्धर्व गाति मंजुळ ।
रघुकुल राजपुत्रांचे विवाहदृष्य अद्भुत ॥38॥

ईदृशे वर्तमाने तु तूर्योद्घुष्टनिनादते ।
त्रिरग्निं ते परिक्रम्य उहुर्भार्या महौजसः॥39॥

अश्या मंजुळ नादात राजपुत्र महाबली ।
घालुनी तीन अग्नीस फेरे स्वीकारति वधू ॥39॥

अथोपकार्य जग्मुस्ते सभार्या रघुनन्दना:।
राजाप्यनुययौ पश्यन् सर्षिसङ्ग: सबान्धव: ॥40॥

असे रघुकुल आनन्द राजपुत्र पत्न्यांसवे ।
जनवासी जाती राजाही ऋषी बान्धव यांसवे ॥40॥

**इत्यर्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे त्रिसप्ततितम: सर्ग: ॥73॥**

# बालकाण्ड सर्ग 74

अथ रात्र्यां व्यतीतायां विश्वामित्रो महामुनिः।
आपृष्ट्वा तौ च राजानौ जगामोत्तरपर्वतम् ॥1॥

रात्र घालवुनी तेथे विश्वामित्र महामुनि ।
दोघां राजांस सांगून जाती उत्तरपर्वते ॥1॥

विश्वामित्रे गते राजा वैदेहं मिथिलाधिपम् ।
आपृष्टैव जगामाशु राजा दशरथः पुरीम् ॥2॥

गेल्यावर विश्वामित्र जनकास विचारुनी ।
राजा दशरथसुद्धा निघती अयोध्येप्रति ॥2॥

अथ राजा विदेहानां ददौ कन्याधनं बहु ।
गवां शतसहस्राणि बहूनि मिथिलेश्वरः॥3॥
कम्बलानां च मुख्यानां क्षौमान् कोट्यंबराणि च ।
हस्त्यश्वरथअपादातं दिव्यरूपं स्वलंकृतम् ॥4॥

वैदेह जनकांनीही कन्याधन म्हणूनिया।
धेनु कोट्यावधी वस्त्रे,उष्ण निवारक,रेशमी ॥3॥

सुतीहि तशी त्यासंगे अलंकृत गज अश्वही ।
रथ पायदळी सेना दिधली भेट कन्यकां ॥4॥

ददौ कन्याशतं तासां दासीदासमनुत्तमम् ।
हिरण्यस्य सुवर्णस्य मुक्तानां विद्रुमस्य च ॥5॥

शतकन्या पाठिराख्या उत्तम दास दासिही ।
सुवर्ण रौप्यमुद्राही मौक्तिके कोटी माणिके ॥5॥

ददौ राजा सुसंहृष्ट कन्याधनमनुत्तमम् ।
दत्त्वा बहुविधं राजा समनुज्ञाप्य पार्थिवम् ॥6॥

प्रविवेश स्वनिलयं मिथिलां मिथिलेश्वर: ।
राजाप्ययोध्याधिपति: सह पुत्रैर्महात्मभि: ॥7॥
ऋषीन्सर्वान्पुरस्कृत्य जगाम सबलानुग: ।

दिले हर्षित राजाने कन्याधन अतिउत्तम ।
अनेक वस्तु देऊनि दशरथास पुसूनिया ॥6॥
स्वगृही मिथिलेमध्ये प्रवेशे मिथिलेश्वर ।
अयोध्यापति राजाही अनुसरून महर्षिंना ॥7॥
ससैन्य सेवक पुत्र, राजधानीप्रति निघे ।

गच्छन्तं तु नरव्याघ्रं सर्षिसङ्गं सराघवम् ॥8॥
घोरास्त पक्षिणो वाचो व्याहरन्ति समन्ततः ।
भौमाश्चैव मृगाः सर्वे गच्छन्ति स्म प्रदक्षिणम् ॥9॥

असता दशरथ जाता ऋषीगण राघवासह ॥8॥
स्वर भयंकर पक्षी काढू लागति भोवती ।
मृग भूमिवरी जाती दक्षिणेस त्यां घालुनी ॥9॥

तान् दृष्ट्वा राजशार्दूलो वसिष्ठं पर्यपृच्छत ।
असौम्याः पक्षिणो घोरा मृगाश्चापि प्रदक्षिणाः ॥10॥

किमिदं हृदयोत्कंपि मनो मम विषीदति ।

पाहुनीया तयां राजा विचारीत मुनीवरां ।
घोर स्वर पक्ष्यांचे मृग दक्षिण घालती॥10॥
मम हृदय कांपे का विषाद मज वाटतो ।

राज्ञो दशरथस्यैतच्छ्रुत्वा वाक्यं महानृषि:॥11॥
उवाच मधुरां वाणीं श्रूयतामस्य यत फलम् ।
उपस्थितं भयं घोरं दिव्यं पक्षिमुखाच्च्युतम् ॥12॥
मृगा: प्रशमयन्त्येते संतापस्त्यज्यतामयम् ।

राजा दशरथाचे वाक्य ऐकुनि महामुनि ॥11॥
मधुर वाणीने म्हणती फळ याचे ऐक तू ॥
कलकल पक्ष्यांची ही सुचवे घोर भय पुढे॥12॥
सुचविति भयशान्ति मृग चिन्ता करू नये ।

तेषां संवादतां तत्र वायु: प्रादुर्बभूव ह ॥13॥
कम्पयन्‍ मेदिनी सर्वां पातयन्श्च महाद्रुमान्‍ ।
तमसा संवृत: सूर्य: सर्वे नावेदिषुर्दिश:॥14॥
भस्मना चावृतं सर्वं सम्मूढमिव तद्बलं ।

संवाद चालता त्यांचा वायु प्रबल वाहि तो ॥13॥
त्यामुळे कांपते पृथ्वी पडती वृक्ष उन्मळूनि ।
अंधार सूर्यावरी माजे दिशांचे भान ना उरे ॥14॥
धुळीने माखुनी सेना जणु मूर्च्छित होतसे ।

वसिष्ठ ऋषयश्चान्ये राजा च ससुतस्तदा ॥15॥
ससंज्ञा इव तत्रासन् सर्वमन्यद्विचेतनम् ।
तस्मिंस्तमसि घोरे तु भस्मच्छन्नेव सा चमू:॥16॥

ऋषि वसिष्ठांसह ते पुत्रांसह दशरथ ॥15॥

यांच्याशिवाय अन्य सर्व होत अचेतन ।
घोर काळोखात सर्व सेना धूलि आच्छादित ॥16॥

ददर्श भीमसंकाशं जटामण्डलधारिणम् ।
भार्गवं जामदग्न्येयं राजा राजविमर्दनम् ॥17॥
कैलासमिव दुर्धर्षं कालाग्निमिव दु:सहम् ।
ज्वलन्तमिव तेजोभिर्दुर्निरीक्ष्यं पृथग्जनै: ॥18॥
स्कन्धे चासज्ज्य परशुं धनुर्विद्युद्गणोपमम् ।
प्रगृह्य शरमुग्रं च त्रिपुरनं यथा शिवम् ॥19॥

भीमकाय जटाधारी क्षत्रियकुलनाशक ।
भार्गवा परशुरामा पाही राजा दशरथ ॥17॥
कैलासासम दुर्घर्ष कालाग्निसम दु:सह ।
जाज्वल्य तेजे त्याच्या जन जाती दिपूनिया॥18॥
खांद्यावर परशू त्याच्या धनु तळपे विजेसम ।
उग्र बाणासवे भासे त्रिपुरारि शिवासम ॥19॥

तं दृष्ट्वा भीमसंकाशं ज्वलन्तमिव पावकम् ।
वसिष्ठप्रमुखा विप्रा जपहोमपरायणा: ॥20॥

संगता मुनय: सर्वे संजजल्पुरथो मिथ: ।

पाहुनि त्या भीमकाय अग्नीपरि ज्वलन्त जो ।
जपहोमपरायण सर्व वसिष्ठांसह विप्र ते ॥20॥
परस्परां पाहुनिया लागती बोलण्या असे ।

कच्चित पितृवधामर्षी क्षत्रं नोत्सादयिष्यति ॥21॥
पूर्वं क्षत्रवधं कृत्वा गतमन्युर्गतज्वर:।
क्षत्रस्योत्सादनं भूयो न खल्वस्य चिकीर्षितम ॥22॥

सूडास्तव पितृवधाच्या संहार करण्यास्तव ॥21॥

येतसे काय परि पूर्वी क्षत्रियां नाशिल्यामुळे।
शान्त असे झालेला त्यामुळे आता नसे भय ॥22॥

एवमुक्त्वार्यमादाय भार्गवं भीमदर्शनम्।
ऋषयो राम रामेति मधुरं वाक्यमब्रुवन् ॥23॥

चिन्तुनिया ऐसे अर्घ्य भार्गवा भीमकाय त्या।
देउनी मधुर स्वरे "राम राम" म्हणती ते ऋषि ॥23॥

प्रतिगृह्य तु तां पूजामृषिदत्तां प्रतापवान्।
रामं दाशरथिं रामो जामदग्न्योऽभ्यभाषत ॥24॥

पूजा ऋषींनी केलेली स्वीकारूनि प्रतापि तो ।
जामदग्न्य असे बोले श्रीरामा दशरथसुता ॥24॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे चतु:सप्ततितम: सर्ग:॥74॥**

# बालकाण्ड सर्ग 75

राम दाशरथे वीर वीर्यं ते श्रूयतेऽद्भुतम् ।
धनुषो भेदन्‍ चैव निखिलेन मया श्रुतम् ॥1॥

दशरथसुता रामा ऐकले शूर तू बहू ।
भंगिले शिवधनुष्या हेहि ज्ञात असे मज ॥1॥

तदद्भुतमचिन्त्यं च भेदनं धनुषस्तथा ।
तच्छ्रुत्वाहमनुप्राप्तो धनुर्गृह्यापरं शुभम् ॥2॥

अचिन्त्य अद्भुत ऐसे धनुभेदन हे तव ।
ऐकुनिया ते मी आलो दुसरे उत्तम घेउनी ॥2॥

तदिदं घोरसंकाशं जामदग्न्यं महद्धनुः।
पूरयस्व शरणैव स्वबलं दर्शयस्व च ॥3॥

जामद्ग्न्याचे हे आहे विशाल भयंकर धनु ।
बाण लावुनिया त्यास शौर्य सिद्ध करी तुझे ॥3॥

तदहं ते बलं दृष्ट्वा धनुषोऽप्यस्य पूरणे ।
द्वंद्वयुद्धं प्रदास्यामि वीर्यश्लाघ्यमहं तव ॥4॥

पाहुनिया तुझे शौर्य धनुष्या तीर लावण्या।
द्वंद्व युद्धा पुकारेन पराक्रमा तव भूषण ॥4॥

तस्य तद् वचनं श्रुत्वा राजा दशरथस्तदा।
विषण्णवदनो दीन: प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत ॥5॥

वचन ऐकुनिया त्याचे नृप दशरथ तेधवा।
दीनववदन होऊनी हात जोडुनि बोलती ॥5॥

क्षत्ररोषात प्रशान्तस्त्वं ब्राहमणश्च महातपा:।
बालानां मम पुत्राणामभयं दातुमर्हसि ॥6॥

भार्गवाणां कुले जात: स्वाध्यायव्रतशालिनाम् ।
सहस्राक्षे प्रतिज्ञाय शस्त्रं प्रक्षिप्तवानसि ॥7॥

भार्गवकुळि जन्मूनी स्वाध्यायव्रतमंडित ।
क्षत्रियां नाशुनी क्रोधा आपण शमविले असे ॥6॥
पुत्रां क्षमा करी माझ्या शस्त्रसंन्यास आपण ।
प्रतिज्ञा करुनी तुम्ही घेतला असल्यामुळे ॥7॥

स त्वं धर्मपरो भूत्वा कश्यपाय वसुंधराम् ।
दत्त्वा वनमुपागम्य महेन्द्रकृतकेतन:॥8॥

धर्मतत्पर होऊन कश्यपास वसुंधरा ।
देउनी गिरि महेन्द्री आश्रमी वास आपला ॥8॥

मम सर्व विनाशाय सम्प्राप्तस्त्वं महामुने ।
न चैकस्मिन् हते रामे सर्वे जीवामहे वयम् ॥9॥

रामास वधता आम्हा अशक्य जगणे असे ।
जणु नाशास्तव माझ्या कशास्तव उपस्थित ॥9॥

ब्रुवत्येवं दशरथे जामदग्न्य: प्रतापवान् ।
अनादृत्य तु तद्वाक्यं राममेवाभ्यभाषत ॥10॥

दशरथ बोलत असता जामदग्न्य पराक्रमी ।
त्याचे न ऐकता काही श्रीरामाशीच बोलती ॥10॥

इमे द्वे धनुषी श्रेष्ठे दिव्ये लोकाभिपूजिते।
दृढे बलवती मुख्ये सुकृते विश्वकर्मणा ॥11॥

धनुष्ये दोन ही रामा प्रबल दृढ दिव्यही ।
लोकपूजित ती साक्षात विश्वकर्माच निर्मिक ॥11॥

अनुसृष्टं सुरैरेकं त्र्यंबकाय युयुत्सवे ।
त्रिपुरगं नरश्रेष्ठ भग्नं काकुत्स्थ यत्त्वया ॥12॥

युद्ध करण्या त्रिपुराशी शिवास दिधले देवे ।
धनुष्या त्याच काकुत्स्था तोडिले आहेस तू ॥12॥

इदं द्वितीयं दुर्धर्षं विष्णोर्दत्तं सुरोत्तमैः ।
तदिदं वैष्णवं राम धनुः परपुरंजयम् ॥13॥

अन्य मम हस्ती देवे विष्णूस दिधले असे ।
शत्रूस जिंकणारे हे वैष्णव धनुष्य असे ॥13॥

समानसारं काकुत्स्थ रौद्रेण धनुषा त्विदम् ।
तदा तु देवताः सर्वाः पृच्छन्ति स्म पितामहम् ॥14॥

शितिकण्ठस्य विष्णोश्च बलाबलनिरीक्षया ।

शिवधनुष्यासम हेही तेवढेच भयंकर ।
शिव विष्णु यांत कोण जास्त बलशाली असे ॥14॥
ब्रह्म्यास असे रामा देवतांनी विचारले ।

अभिप्रायं तु विज्ञाय देवतानां पितामह ॥15॥
विरोधं जनयामास तयो: सत्यवतां वर:॥

जाणुनि घेण्यासाठी देवतांचे पितामह ॥15॥
वैर दोघात उत्पन्न करती सत्यवादि ते ॥

विरोधे तु महद्युद्धमभवद् रोमहर्षणम् ॥16॥
शितिकण्ठश्च विष्णोश्च परस्परजयैषिणौ ।

वैरामुळे करती दोघे युद्ध जे रोमहर्षक ॥16॥
नीलकण्ठ आणि विष्णु जिंकण्यास परस्परा ।

तदा तु जृम्भितं शैवं धनुर्भीमपराक्रमम् ॥17॥
हुंकारेण महादेव स्तम्भितोऽथ त्रिलोचनः।

हुंकारे आपल्या विष्णू शिवधनुष्यास शिथिल ॥17॥
करीतसे महादेवा स्तंभित त्याचबरोबरी ।

देवैस्तदा समागम्य सर्षिसङ्घ: सचारणै:॥18॥
याचितौ प्रशमं तत्र जग्मतुस्तौ सुरोत्तमौ ।

ऋषिजन चारणांसंगे येउनी मग देवता ॥18॥
शान्तिची करती इच्छा तेव्हां शान्त होति ते ।

जृम्भितं तद् धनुर्दृष्ट्वा शैवं विष्णुपराक्रमै:॥19॥
अधिकं मेनिरे विष्णुं देवा: सर्षिगणास्तदा ।

पाहुनी शिथिल झालेल्या शिवधनुष्यास देवता ॥19॥
ऋषींसमवेत ते श्रेष्ठ भगवान् विष्णूस मानती ।

धनू रुद्रस्तु संकृद्धो विदेहेषु महायशा:॥20॥
देवरातस्य राजर्षेर्ददौ हस्ते ससायकम्।

बाणासह धनुष्या त्या देई कोपित शंकर ॥20॥
हातात देवराताच्या विदेहनृप जो असे।

इदंच वैष्णवं राम धनु: परपुरंजयम् ॥21॥
ऋचीके भार्गवे प्रादाद् विष्णु: स न्यासमुत्तमम्।

रामा शत्रुविजयी त्या धनुष्या विष्णु देतसे ॥21॥
ऋचिक मुनिंना ठेव म्हणुनी जे भृगुवंशज।

ऋचीकस्तु महातेजा: पुत्रस्याप्रतिकर्मण:॥22॥
पितुर्मम ददौ दिव्यं जमदग्नेर्महात्मन:।

ऋचिक महातेजस्वी जमदग्नी स्वपुत्र जो ॥22॥
पिता जो मम त्या देई सूडबुद्धि नसे जया ।

न्यस्तशस्त्रे पितरि मे तपोबलसमन्विते॥23॥
अर्जुनो विदधे मृत्युं प्राकृतां बुद्धिमास्थित:।

शस्त्रत्याग करोनीया तप करी पिता मम ॥23॥
अर्जुन जो कृतवीर्यसुत वधी त्या दुष्टबुद्धिने।

वधमप्रतिरूपं तु पितु: श्रुत्वा सुदारुणम् ।
क्षत्रमुत्सादयं रोषज्जातं जातमनेकश:॥24॥

पित्याचा वध पाहून भयंकर अयोग्य जो ।
क्रोधाने संहार मी केला क्षत्रियांच्या पिढ्यापिढ्या ॥24॥

पृथिवीं चाखिलां प्राप्य कश्यपाय महात्मने।
यज्ञस्यान्तेऽददं राम दक्षिणां पुण्यकर्मणे ॥25॥

जिंकुनी अवघी पृथ्वी यज्ञ एक करोनिया ।
महात्मा कश्यपा अंती दक्षिणा म्हणुनी दिली ॥25॥

दत्त्वा महेन्द्रनिलयस्तपोबलसमन्वित:।
श्रुत्वा तु धनुषो भेदं ततोऽहं द्रुतमागत:॥26॥

नंतर करिता तप मी महेन्द्र पर्वतावरी।
शिवधनुर्भंग वृत्त ऐकुनी शीघ्र येत मी ॥26॥

तदेव वैष्णवं राम पितृपैतामहं महत्।
क्षत्रधर्मं पुरस्कृत्य गृण्हीश्व धनुरुत्तमम् ॥27॥
योजयस्व धनु:श्रेष्ठेशरं परपुरंजयम्।
यदि शक्तोऽसि काकुत्स्थ द्वंद्वं दास्यामि ते तत:॥28॥

विष्णुचे धनुष्य तेच वंशात मम जे असे।
क्षात्रधर्मास जागून त्यास हाती धरूनिया ॥27॥
शर लावि तया ऐसा शत्रूवर विजयी ठरे ।
करसी जर तू तैसे द्वंद्वा तुज पुकारतो ॥28॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मीकिये आदिकाव्ये बालकाण्डे पञ्चसप्ततितम: सर्ग:॥75॥**

# बालकाण्ड सर्ग 76

श्रुत्वा तु जामदग्न्यस्य वाक्यं दाशरथिस्तदा ।
गौरवाद्यन्त्रितकथ: पितू राममब्रवीत ॥1॥

वाक्य ते परशुरामाचे शान्त राघव ऐकुनि ।
गौरवार्थ पित्याच्या तो मौन सोडुनि बोलला ॥1॥

कृतवानसि यत कर्म श्रुतवानस्मि भार्गव ।
अनुरुध्यामहे ब्रह्मन पितुरानृण्यमास्थित:॥2॥

कृत्य जे आपण केले ज्ञात ते मज भार्गवा ।
मान्यही मज ते आहे पितृवधसुडास्तव ॥2॥

वीर्यहीनमिवाशक्तं क्षत्रधर्मेण भार्गव ।
अवजानासि मे तेज: पश्य मेऽद्य पराक्रमम् ॥3॥

अशक्त नि वीर्यहीन अवमानसि मज मानुनी ।
युक्त मी क्षत्रियधर्मे पराक्रम माझा पहा ॥3॥

इत्युक्त्वा राघव: कृद्धो भार्गवस्य वरायुधम् ।
शरं च प्रतिजग्राह हस्ताल्लघुपराक्रम: ॥4॥

बोलुनी कृद्ध हे राम भार्गवाच्या हातातुनी।
उत्तम धनुष्य बाण घेतसे त्याबरोबरी ॥4॥

आरोप्य स धनू रामः शरं सज्यं चकार ह ।
जामदग्न्यं ततो रामः क्रुद्धोऽब्रवीदिदम् ॥5॥

धनुष्या बाण लावून प्रत्यंचा ताणुनी वदे।
क्रुद्ध स्वरामध्ये राम परशुरामा वदे असे ॥5॥

ब्राह्मणोऽसीति पूज्यो मे विश्वामित्रकृतेन च ।
तस्माच्छक्तो न ते राम मोक्तुं प्राणहरं शरम् ॥6॥

संबंधित विश्वामित्रां पूज्य ब्राह्मण म्हणूनिया ।
सोडी न म्हणुनी बाण प्राणहारी तुम्हावर ॥6॥

इमां वा त्वद्गतिं राम तपोबलसमर्जितान् ।
लोकानप्रतिमान् वापि हनिष्यामीति मे मति:॥7॥
न ह्ययं वैष्णवो दिव्य: शर:परपुरंजय:।
मोघ: पतति वीर्येण बलदर्प्विनाशन: ॥8॥

शीघ्र गति आपणा प्राप्त असे तैसे तपोबले ।
अनुपम लोक प्राप्त करण्यास नष्ट तयां ॥7॥

दिव्य हा वैष्णव बाण सोडतो त्यांच्यावरी ।
करि अरिगर्वहरण हा व्यर्थ न जातसे ॥8॥

वरायुधधरं रामं द्रष्टुं सर्षिगणा: सुरा:
पितामहं पुरस्कृत्य समेतास्तत्र सर्वश:॥9॥

दिव्यास्त्रधारी रामास पाहण्या ऋषिगणांसह ।
ब्रह्मदेवासह सर्व देव एकत्र येति ते ॥9॥

गन्धर्वाप्सरसश्चैव सिद्धचारणकिन्नरा:।
यक्षराक्षसनागाश्च तद् द्रष्टुं महदद्भुतम् ॥10॥

गन्धर्व अप्सरा सिद्ध यक्षचारण किन्नर ।
नाग राक्षसही जमती दृष्या अद्भुत पाहण्या ॥10॥

जडीकृते तदा लोके रामे वरधनुर्धरे।
निर्वीर्यो जामदग्न्योऽसौ रमो राममुदैक्षत ॥11॥

भारुनी जाइ त्रैलोक्य धनुष्या बाण लावता ।
बलहीन जामदग्न्य पाहता रामाकडे ॥11॥

तेजोभिर्हतवीर्यत्वाज्जामदग्न्यो जडीकृत:।
रामं कमलपत्राक्षं मन्दं मन्दमुवाच ह ॥12॥

भार्गव होउनि बलहीन तेजोहीनच भारित ।
रामाकडे कमलाक्ष पाहुनी हलके बोलतो ॥12॥

कश्यपाय मया दत्ता यदा पूर्वा वसुंधरा ।
विषये मे न वस्तुमिति मां मां कश्यपोऽब्रवीत ॥13॥

कश्यपा दिधली पूर्वी होती मीच वसुंधरा ।
येथे मी राहणे योग्य नसे कश्यप बोलला ॥13॥

सोऽहं गुरुवच: कुर्वन् पृथिव्यां न वसे निशाम् ।
तदाप्रभृति काकुत्स्थ कृता मे काश्यपस्य ह ॥14॥

गुरुवचना ऐकोनी तेव्हांपासुन रात्रि मी ।
राहतो न पृथ्वीवरती काश्यपा बोललो जसा॥14॥

तामिमां मद्गतिं वीरं हन्तुं नार्हसि राघव ।
मनोजवं गमिष्यामि महेन्द्रं पर्वतोत्तमम्॥15॥

म्हणुनी गतीस माझ्या नष्ट ना करि राघवा ।
मनोगतीने जातो मी महेन्द्र पर्वतावरी ॥15॥

लोकास्त्वप्रतिमा राम निर्जितास्तपसा मया ।
जहि ताञ्छरमुख्येन मा भूत् कालस्य पर्यय:॥16॥

करी नष्ट अनुपम लोकां जिंकले ज्या तपोबले।
शराने तव या रामा विलंब न करी आता ॥16॥

अक्षय्यं मधुहन्तारं जानामि त्वां सुरेश्वरम्।
धनुषोऽस्य परामर्शात् स्वस्ति तेऽस्तु परंतप ॥17॥

धनुष्या योजिले जैसे आपण तेव्हां कळे मज।
देवेश्वर आपण विष्णु मधुदैत्य संहारक ॥17॥

एते सुरगणा: सर्वे निरीक्षन्ते समागता:।
त्वामप्रतिमकर्माणमप्रतिद्वंद्वमाहवे ॥18॥

देवता सर्व येवोनी पाहती आपणाकडे।
अप्रतिम तव कर्म द्वंद्वा तोड नसे तुज ॥18॥

न चेयं मम काकुत्स्थ व्रीडा भवतुमर्हति।
त्वया त्रैलोक्यनाथेन यदहं विमुखीकृत:॥19॥

आपल्यापुढे हरणे लज्जास्पद न वाटते ।
कारण त्रैलोक्यनाथ विष्णुकडुनी मी जित ॥19॥

शरमप्रतिमं राम मोक्तुमर्हसि सुव्रत ।
शरमोक्षे गमिष्यामि महेन्द्रं पर्वतोत्तमम् ॥20॥

उत्तम व्रतपालक रामा बाण अनुपम सोडि तो ।
जाईन मी सोडता तो महेन्द्र पर्वतावरी ॥20॥

तथाब्रुवति रामे तु जामदग्न्ये प्रतापवान्।
रामो दाशरथि: श्रीमांश्चिक्षेप शरमुत्तमम् ॥21॥

परशुरामे म्हणता ऐसे रामास प्रतापवान् ।
श्रीमान् दाशरथी राम सोडी शर उत्तम ॥21॥

स हतान् दृष्य रामेण स्वांल्लोकांस्तपसार्जितान् ।
जामदग्न्यो जगामाशु महेन्द्रं पर्वतोत्तमम् ॥22॥

रामबाणे नष्ट होती पुण्यलोक तपार्जित ।
पाहुनी हे जामदग्न्य जाई महेन्द्र पर्वती ॥22॥

ततो वितिमिराः सर्वा दिशश्चोपदिशस्तथा।
सुराः सर्षिजणा रामं प्रशशंसुरुदायुधम् ॥23॥

तेव्हां उजळती सर्व दिशा उपदिशा तदा ।
ऋषिगणांसह देव प्रशंसति रामा पुन:पुन्हा ॥23॥

रामं दाशरथिं रामो जामदग्न्यः प्रपूजितः।
ततः प्रदक्षिणीकृत्य जगामात्मगतिं प्रभुः॥24॥

पूजिले दाशरथी रामे परशुरामा यथोचित ।
प्रदक्षिणा करुनी त्यास स्वस्थानास जाति ते ॥24॥

**इत्यार्थे श्रीमद्रामायणे वाल्मिकीये आदिकाव्ये बालकाण्डे षट्सप्ततितमः सर्गः॥76॥**

# बालकाण्ड सर्ग 77

गते रामे प्रशान्तात्मा रामो दाशरथिर्धनु:।
वरुणायाप्रमेयाय ददौ हस्ते महायशा:॥1॥

जाता भार्गव श्रीराम दाशरथी शान्त होउनी।
शक्तिशाली वरुणाच्या हाती धनुष्य देतसे ॥1॥

अभिवाद्य ततो रामो वसिष्ठप्रमुखान् ऋषीन् ।
पितरं विकलं दृष्ट्वा प्रोवाच रघुनन्दन ॥2॥

तदा वंदुनि श्रीराम वसिष्ठप्रमुखां ऋषीं।
पिता विकल झालेला पाहुनीया तया वदे ॥2॥

जामदग्न्यो गतो रामः प्रयातु चतुरंगिणी।
अयोध्याभिमुखी सेना त्वया नाथेन पालिता॥3॥

भार्गव गेले आता जे चतुरंगदल आपले ।
नाथ ज्या आपण आता निघावे अयोध्येप्रति ॥3॥

रामस्य वचनं श्रुत्वा राजा दशरथः सुतम् ।
बाहुभ्यां सम्परिष्वज्य मूर्ध्नुपाघ्नाय राघवम् ॥4॥

गतो राम इति श्रुत्वा हृष्टः प्रमुदितो नृपः।
पुनर्जातं तदा मेने पुत्रमात्मानमेव च ॥5॥

श्रीरामवचन ऐकोनी पुत्रा राजा दशरथ ।
करी अवघ्राण मस्तका त्याला मिठीत घेउनी॥4॥
गेले भार्गव ऐकोनी आनंदित नृप होतसे ।
पुनर्जन्म जणु झाला पुत्राचा त्यांस वाटते ॥5॥

चोदयामास तां सेनां जगामाशु ततः पुरीम् ।
पताकाध्वजिनीं रम्यां तूर्योद्घुष्टनिनादिताम् ॥6॥

सेनेस आज्ञापुनि ते अयोध्या शीघ्र पोचती ।
पताकाध्वजे जी रम्य वाद्यध्वनि निनादित ॥6॥

सिक्तराजपथारम्यां प्रकीर्णकुसुमोत्करम् ।
राजप्रवेशसुमुखैः पौरैर्मङ्गलपाणिभिः ॥7॥
सम्पूर्णा प्राविशद् राजा जनौघैः समलंकृताम्।
पौरैः प्रत्युद्गतो दूतं द्विजैश्च पुरवासिभिः ॥8॥

जलसिंचने हो रम्य पसरुनी मार्गी फुले ।
प्रवेशमार्गी नृपाच्या मंगलवस्तूंसवे जन ॥7॥

अयोध्येत अश्या राजा जनसमुदाय अलंकृत ।
प्रवेशे स्वागता जाती पुरवासी तयासवे ॥8॥

पुत्रैरनुगत: श्रीमान् श्रीमद्भिश्च महायशा:।
प्रविवेश गृहं राजा हिमवत्सदृशं प्रियम् ॥9॥

पुत्रांसह कांतियुक्त श्रीमान् राजा दशरथ।
हिमालयसम उत्तुंग राजभवनी प्रवेशित ॥9॥

ननन्द स्वजनै: राजा गृहे कामै: सुपूजित:।
कौसल्या च सुमित्राच कैकेयी च सुमध्यमा ॥10॥

वधुप्रतिग्रहे युक्ता याश्चान्या राजघोषित:।

गृही पूजित वस्तूंनी प्रिय राजा आनंदित ।
कौसल्या,सुमित्रा संगे कैकेयीहि सुमध्यमा ॥10॥
अन्य राण्याहि सुनांच्या स्वागतास्तव धावती ।

तत: सीतां महाभागामूर्मिलां च यशस्विनीम् ॥11॥
कुशध्वजसुते चोभे जुगृहुर्नृपयोषित:।
मंगलालापनैर्होमै: शोभिता: क्षौमवासस: ॥12॥

राजस्त्रियां या सर्व मंगलगीते गाउनी ॥11॥

करती स्वागता सीता,उर्मिला,माण्डवीसह ।
श्रुतकीर्ती स्नुषा सर्व वस्त्रे मंगल भूषित ॥1२॥

देवतायतनान्याशु सर्वास्ता: प्रत्यपूजयन् ।
अभिवाद्याभिवाद्यांश्च सर्वा राजसुतास्तदा ॥13॥
रेमिरे मुदिता: सर्वा भर्तृभिर्मुदिता रह:।

करिती पूजन जात स्नुषांसह मन्दिरामधे ।
वंदती वंदनीयांस सर्वा राजकुमारि त्या ॥13॥
पतीसंगति एकांती आनंदे काळ कण्ठती ।

कृतदारा: कृतास्त्राश्च सधना: ससुहृज्जना:॥14॥
सुश्रूषमाणा: पितरं वर्तयन्ति नरर्षभा:।
कस्यचित्त्वथ कालस्य राजा दशरथ: सुतम् ॥15॥
भरतं कैकयीपुत्रमब्रवीद् रघुनन्दन:।

विवाहित बंधू चार अस्त्रविद्येत सज्ज ते ॥14॥
सेवती वडिलधाऱ्यां धनमित्रांसह राहती ।
कालानन्तर काही वदे राजा दशरथ ॥15॥
कैकेयीपुत्र भरतास नृप रघुकुलनन्दन ।

अयं केकयराजस्य पुत्रो वसति पुत्रक ॥16॥
त्वां नेतुमागतो वीरो युधाजिन्मातुलस्तव ।

पुत्रा केकयराजाचा युधाजित तव मातुल ॥16॥
तुला नेण्यास येवोनी बहु दिन येथ राहिला ।

श्रुत्वा दशरथस्तैतद् भरत: कैकयीसुत:॥17॥
गमनायाभिचक्राम शत्रुघ्नसहितस्तदा ।

दशरथास ऐकुनिया भरत कैकेयीसुत ॥17॥
विचार करि जाण्याचा शत्रुघ्नासह तेधवा ।

आपृच्छ पितरं शूरो रामं चाक्लिष्टकारिणम् ॥18॥
मातृश्चापि नरश्रेष्ठ: शत्रुघ्नसहितो ययौ ।

मोठ्यांची तशी रामाची जो कृत्ये महान करी ॥18॥
मातांची आज्ञा घेऊन जात भरत शत्रुघ्नासह ।

युधाजित प्राप्य भरतं सशत्रुघ्न प्रहर्षित:॥19॥
स्वपुरं प्राविशद् वीर: पिता तस्य तुतोष ह ।

भरता शत्रुघ्नासह युधाजित घेउनी सवे ॥19॥
प्रवेश करि स्वपुरात पित्या संतोष होतसे ॥

गते च भरते रामो लक्ष्मणस्य महाबल:॥20॥
पितरं देवसंकाशं पूजयामासतुस्तदा।

जाता भरत श्रीराम आणि लक्ष्मण महाबली ॥20॥
पित्याच्या सेवेत पूजेत राहती देवतासम।

पितुराज्ञां पुरस्कृत्य पौरकर्माणि सर्वश:॥21॥
चकार राम: सर्वाणि प्रियाणि च हितानि च।

पित्याची मानुनी आज्ञा कृत्ये पौरजनास्तव ॥21॥
हितकारक तशी सर्वा प्रिय राम करीतसे।

मातृभ्यो मातृकार्याणि कृत्वा परमयन्त्रित: ||22||
गुरूणां गुरुकार्याणि काले कालेऽन्ववैक्षत |

संयमी सदा राहूनी कर्मे मातांसाठि सदा ||22||
गुरूंसाठी थोर कार्ये करती दक्ष राहुनी |

एवं दशरथ: प्रीतो ब्राह्मणा नैगमास्तथा ||23||
रामस्य शीलवृत्तेन सर्वे विषयवासिन:|

त्यामुळे दशरथ तैसे ब्राह्मण वैश्यगणांसह ||23||
रामाच्या शील सद्व्यवहारे पौरजन संतुष्ट ते |

तेषामतियशा लोके राम: सत्यपराक्रम:॥24॥
स्वयंभूरिव भूतानां बभूव गुणवत्तर:।

सर्व पुत्रांत श्रीराम गुणवान सर्वजनप्रिय ॥24॥
जसा सर्व भूतांत ब्रह्मा गुणवत्तर ।

रामस्य सीतया सार्धं विजहार बहूनृतून् ॥25॥
मनस्वी तद्गतमनास्तस्या हृदि समर्पित:।

सीतेच्या हृदि श्रीराम त्याच्या मनि सीता वसे॥25॥
विहार करती दोघे संगे बहु ऋतूंमध्ये ।

प्रिया तु सीता रामस्य दारा: पितृकृता इति ॥26॥
गुणाद्रूपगुणाच्चापि प्रीतिर्भूयोऽभिवर्धते ।
तस्याश्च भर्ता द्विगुणं हृदये परिवर्तते ॥27॥

सीता बहु प्रिय रामा पित्याकडुनि अर्पित ॥26॥
पातिव्रत्य गुणे रूपे प्रीती अधिक वाढते ।
तिचेही द्विगुणित प्रेम श्रीरामाच्या रुपे गुणे ॥27॥

अन्तर्गतमपि व्यक्तमाख्याति हृदयं हृदा ।
तस्य भूयो विशेषेण मैथिली जनकात्मजा ।

देवताभि: समा रूपे सीता श्रीरिव रूपिणी ।।28।।

मैथिली जनककन्या जाणे राम मनोगत ।
हृदयी जाणूनि बोलूनी दाखवी स्पष्ट त्यास ते ।
देवतासम ती रूपे सीता लक्ष्मीच मूर्त ती ।।28।।

तया स राजर्षिसुतोऽभिकामया समेयिवानुत्तमराजकन्यया ।
अतीव राम: शुशुभे मुदान्वितो विभु: श्रिया विष्णुरिवामरेश्वर:।।29।।

जशी कामना तिज श्रीरामाची श्रीरामही वांच्छि तिलाच एक।
प्रसन्न अतीव राम तिच्यासवे जसा देवेश विष्णु लक्ष्मीसवे ।।29।।


## इत्यार्षे श्रीमद्रामायणे वाल्मीकीये आदिकाव्ये बालकाण्डे सप्तसप्ततितम:सर्ग:॥77॥

# बालकाण्ड समाप्त


श्री. श्याम कुलकर्णी यांची ई साहित्यवरची इतर नऊ पुस्तकं.
यांवर टॅप किंवा क्लिक करा. थोडं थांबा. ते उघडेल. वाचा.









श्याम कुलकर्णी
तुझी माझी जोडी



हास्यरंगी रंगले
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी
हसरी वारी
INSURANCE
STAMPING
VISA
IMMIGRATION


महाकविकालिदासविरचित
मेघदूत
श्याम कुलकर्णी


श्याम कुलकर्णी


तिची सतार


मराठी श्लोकानुवाद- श्री श्याम कुलकर्णी
॥ श्रीमदभगवदगीता ॥

लवकरच येत आहे.

श्री श्याम कुलकर्णी अनुवादित

मूळ वाल्मिकी रामायण मराठी श्लोकमय पाचवा भाग